


सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

**आजचा सामना**

मुंबई इंडियन्स वि. राजस्थान रॉयल्स

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर

सोलापूर | गुरुवार, १ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १७३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



कोणताही समाज समर्थ होण्यासाठी आणि ती शक्ती सदा-सर्वदा कायम राहण्यासाठी, समाजात समाजहितैषी, प्रामाणिक, कष्ट करण्यास तत्पर, उद्योगशील, कर्तव्यदक्ष आणि त्याग करणाऱ्या कार्यकर्त्यांची उज्ज्वल परंपरा निर्माण झाली पाहिजे आणि हे कार्य सतत चालू राहिले पाहिजे. हे मूलगामी परिस्थिती निरपेक्ष प्रवाहाचे कार्य संघाने हाती घेतले आहे.

**- भय्याजी दाणी**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## नरेंद्र मोदींचा रशिया दौरा रद्द

**मॉस्को** : येत्या ९ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रशियाच्या विजय दिवसाला प्रमुख पाहुणे म्हणून जाणार होते. यानंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन भारताच्या दौऱ्यावर येणार होते. परंतु पुतीन यांचे माध्यम सचिव दिमित्री पेस्कोव यांनी पंतप्रधान मोदी यांनी रशियाचा आगामी दौरा रद्द केला असल्याची माहिती दिली.

सोलापूर तरुण भारत — प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

## उद्या अंक नाही !

बुधवार दि. १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन निमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयाला सुट्टी आहे. त्यामुळे गुरुवार, दि. २ मे २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

# जातनिहाय जनगणनेला हिरवी झेंडी

## केंद्र सरकारचा महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय

### २०२६ मध्ये होणार; सर्वच राजकीय पक्षांनी केले स्वागत

**नवी दिल्ली, ३० एप्रिल**

२०२६ मध्ये होणाऱ्या जनगणनेसोबत जातनिहाय जनगणना करण्याचा महत्वपूर्ण धोरणात्मक निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मोदी सरकारच्या या निर्णयाचे दूरगामी राजकीय परिणाम होणार आहेत. गेल्या काही महिन्यांपासून जातनिहाय जनगणनेची मागणी काँग्रेसने लावून धरली होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे सर्व राजकीय पक्षांनी स्वागत केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहार समितीच्या बैठकीत आज काही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. राजकीय व्यवहार समितीच्या या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन तसेच वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल उपस्थित होते.

नंतर एका पत्रपरिषेत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती दिली. २०२६ मध्ये केंद्र सरकारने जनगणना करण्याचा निर्णय घेतला असून त्याजनगणनेतच जातीय जनगणनाही केली जाईल, असे वैष्णव म्हणाले. आतापर्यंत झालेल्या जनगणनेत जातीय जनगणनेचा कधी समावेश झाला नव्हता, यावेळी प्रथमच जनगणनेसाबेत




जातीय जनगणनाही होणार आहे.

काही राज्यांनी आपल्या पातळीवर जातीय सर्वेक्षण केले, मात्र देशातील सामाजिक जडणघडण कायम ठेवण्यासाठी व्यापक दृष्टिकोनाची गरज आहे, त्यामुळे आज झालेल्या राजकीय व्यवहार समितीच्या बेठकीत जनगणनेसोबत जातीय जनगणना करण्याचाही निर्णय घेण्यात आला, जेणेकरुन यापुढे कोणत्याही राज्यावर जातीय सर्वेक्षण करण्याची वेळ येणार नाही, असे वैष्णव यांनी सांगितले. जातनिहाय जनगणनेच्या मुद्यावरुन काँग्रेसवर हल्ला चढवतांना वैष्णव म्हणाले की, काँग्रेसनेच सुरुवातीपासून जातीय जनगणनेला विरोध केला, देशात आजपर्यंत झालेल्या एकाही जनगणनेत जातीय जनगणनेचा समावेश करण्यात आला नाही.

२०१० मध्ये तत्कालिन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी लोकसभेत जातीय जनगणनेबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत विचार करण्याचे आश्वासन दिले होते. नंतर या मुद्यावर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या एका उपसमितीचेही गठन करण्यात आले होते, या समितीसमोर अनेक राजकीय पक्षांनी जातीय जनगणनेची आग्रही मागणी केली होती, याकडे लक्ष वेधत वैष्णव म्हणाले की, मात्र यानंतरही काँग्रेसच्या सरकारने जातीय जनगणनेबाबत ठोस असा कोणताही निर्णय घेतला नाही. उलट जातीय सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला. *(तभा वृत्तसेवा)*

### इंडिया आघाडीकडून राजकीय फायद्यासाठी जातीय जनगणनेचा उपयोग

काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटकपक्षांनी जातीय जनगणनेचा आपल्या राजकीय फायद्यासाठी उपयोग करुन घेला असा आरोप करत वैष्णव म्हणाले की, जनगणना हा विषय संविधानाच्या अनुच्छेद २४६ च्या केंद्रीय सूचीत ६९ व्या क्रमांकावर आहे, तरीसुध्दा काही राज्यांनी आपल्या अधिकारात जातीय सर्वेक्षण केले. समाज आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मजबूत व्हावा तसेच देशाची प्रगतीही विनाअडथळा व्हावी म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे. सामाजिक वीण उसवणार नाही, याची काळजी हा निर्णय घेतांना सरकारने घेतली आहे, असे ते म्हणाले.

### जातनिहाय जनगणनेचा इतिहास...

- १८८१ मध्ये पहिल्यांदा झाली होती जनगणना
- १९३१ प्रथमच पूर्णरूपाने जातीय जनगणना झाली.
- १९४१ मध्ये जातनिहाय जनगणना झाली पण दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीत आकडेवारी जाहीर केली नाही.
- स्वतंत्र भारतात १९५१ मध्ये पहिल्यांदा जनगणना करण्यात आली.

### कोणत्या राज्यांनी केली जातगणना

- बिहारच्या आधी कर्नाटकात झाली होती जातनिहाय जनगणना
- कर्नाटकच्या सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षणावर आतापर्यंत १५ कोटी रुपये खर्च.
- कर्नाटकात सर्वेक्षणाचे आकडे सार्वजनिक करण्यात आलेले नाहीत.

### जातनिहाय जनगणनेची प्रमुख उद्दिष्टे

- जनतेतील विविध जातींचे अचूक प्रमाण जाणून घेणे
- मागास, वंचित व अल्पसंख्यांक घटकांची खरी स्थिती समजून घेणे
- जातनिहाय जनगणनेनुसार सामाजिक व आर्थिक योजनांची नीट आखणी

जातिनिहाय जनगणना करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णयाचे आम्ही मनापासून स्वागत करतो. या माध्यमातून समाजातील खऱ्या गरजू लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत मिळणार असून त्यांच्या उन्नतीसाठी सखोल विचार करून प्रभावी योजना आखता येणार आहेत.
**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

आम्ही सरकारच्या या निर्णयाचे पूर्ण समर्थन करतो. मात्र आमचे काही प्रश्न आहेत की या जनगणनेची रचना कशी असेल? केवळ आरक्षणाचाच विचार केला जाणार की त्यापुढील तयारी केली आहे? खाजगी शिक्षण संस्थांमधील आरक्षणाचे काय? जनगणना कधी करणार आणि याची अंमलबजावणी कशी करणार?
**राहुल गांधी,** विरोधी पक्षनेता

केंद्र सरकारचा जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असून यामुळं सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळवून देण्यास मदत करेल. सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचित व उपेक्षित घटकांच्या विकासासाठी सरकारला अधिक निधी प्रदान करता येईल.
**अजित पवार,** उपमुख्यमंत्री

जातीनिहाय जनगणना करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात केंद्र सरकारने घेतलेला निर्णय क्रांतिकारक आहे. जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात हा निर्णय घेण्याची हिंमत दाखवली नाही. आता, राहुल गांधींनी यावर टीका करू नये. सर्व जातींना न्याय देण्यासाठी ही जातीनिहाय जनगणना उपयोगी ठरेल.
**रामदास आठवले,** रिपाई (आठवले) नेते

● जिल्ह्यातील २ लाख १० हजार ६६३

# शेतकऱ्यांना मिळणार २८२ कोटींचा पिकविमा

- ✓ ऑनलाईनने खात्यावर होणार जमा
- ✓ २०२५ चा खरिपाचा पिकविमा भरण्यात होणार बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

जिल्ह्यातील २ लाख १० हजार ६६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर खरीप २०२४चा पीकविमा नुकसान भरपाईचे पैसे जमा व्हायला सुरूवात झाली असून, या शेतकरी बांधवांना ओरिएंटल पीक विमा कंपनीकडून २८२ कोटी २० लाख इतकी रक्कम मंजूर झाल्याची माहिती सोलापूर कृषी विभागाकडून मिळाली.

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना पीकविमा मिळावा म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे वारंवार प्रयत्न करताना दिसत होते. त्यांनी काही वेळा पिक विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबत संवादही साधला आहे. त्यांच्यासह कृषी खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना पिकविमा मिळू लागला आहे. यामध्ये शेतकरी संख्यांचे विमा वाटप करताना पुढील पध्दतीने विभाजन पिक विमा कंपनीने केले आहे. यामुळे व्यापक आपत्ती:- २९, ८८५ शेतकरी लाभार्थी ठरले आहेत. तर स्थानिक नैसर्गिक आपत्तीमध्ये १,२९,०८६, काढणी पश्चात नुकसान:- ४९,७८० एवरेज बेस:- १,९१२ अशा एकुण २ लाख १० हजार ६६३ शेतकऱ्यांना या पिकविमा नुकसान भरपाईचा लाभ होणार आहे. तर मंजूर झालेल्या रकमेमध्ये व्यापक आपत्ती साठी १८ कोटी ०७ लाख, स्थानिक नैसर्गिक आपत्ती १८३ कोटी ९० लाख, काढणी पश्चात नुकसान ८० कोटी ०२ लाख, एवरेज बेससाठी एकूण ०.२१ लाख आणि एकुण शेतकऱ्यांना २८२ कोटी २० लाखाची पिकविमा रक्कम वाटप ऑनलाईन पध्दतीने सुरू झाले आहे.

## ज्येष्ठ भाजपा नेते डॉ. रामदास आंबटकर यांचे देहावसान

**हिंगणघाट/नागपूर, ३० एप्रिल-**



हिंगणघाट तालुक्यातील वडनेर येथील ज्येष्ठ भाजपा नेते स्व. भगवान आंबटकर यांचे चिरंजीव माजी विधानपरिषद सदस्य डॉ. रामदास भगवान आंबटकर यांचे आज दुपारी चेन्नई येथील रुग्णालयात किडनीच्या आजाराने निधन झाले.

त्यांचे वय ६५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले व बराच मोठा आप्तपरिवार आहे. डॉ. रामदास आंबटकर बालपणापासूनच संघ स्वयंसेवक होते. त्यांचे शिक्षण वडनेर, वर्धा व यवतमाळ येथे झाले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात सोलापूर देशात प्रथम

## ●जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद : एआय उपक्रमात सोलापूर जिल्हा परिषदेचे विशेष योगदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

उडान २०२५ अंतर्गत प्रशासकीय कामात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता कॉलिंग सेंटरद्वारे जिल्ह्यातील नागरिकांना फोन करून त्यांच्याकडून शासकीय योजनांच्या अनुषंगाने प्रश्न विचारून त्यांच्या विभागाकडे तक्रारी असतील तर त्याच्या डॅशबोर्डवर नोंदी घेतल्या जात आहे व त्या नोंदीच्या आधारे संबंधित तालुकाप्रमुख व विभाग प्रमुख त्यांच्या तक्रारीचे निवारण आठ दिवसात करतील. यातून संबंधित लाभार्थ्यांना शासकीय योजना व प्रशासकीय कामकाजचा लाभ गतिमान पद्धतीने मिळण्यास मदत होणार आहे. तरी सर्व संबंधित विभाग प्रमुख व तालुकाप्रमुख यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित उड्डाण २०२५ अंतर्गत प्रशासनात एआय वापर उद्घाटन तसेच प्रशिक्षण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी



अधिकारी स्मिता पाटील, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, जिल्हा परिषद बांधकाम कार्यकारी अभियंता अभियंता नरेंद्र खराडे, महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले आदी उपस्थित होते.

आशीर्वाद पुढे म्हणाले, प्राथमिक स्तरावर पुरवठा, शिक्षण, आरोग्य महिला व बालविकास आणि पशुसंवर्धन या पाच विभागाचा समावेश असून कॉलिंग सेंटर मार्फत दररोज १५ ते २० हजार नागरिकांना मोबाईलवर फोन केले जात असून त्यातील सहा ते सात हजार कॉलवर नागरिक विचारलेला प्रश्नाचे उत्तरे देऊन संबंधित विभागाशी आपले मत मांडत आहे. त्यानुसार डॅशबोर्डवर माहिती तयार होत असून कोणत्या विभागाशी जास्त तक्रारी आहेत तसेच कोणत्या ठिकाणी काय करणे आवश्यक आहे याची माहिती प्रशासनाला उपलब्ध होत असून त्यावर पुढील उपाययोजना करून शासकीय योजनांचा लाभ तसेच प्रशासकीय कामकाज अत्यंत गतिमान व सुलभ पद्धतीने करण्यासाठी याचा वापर सुरु झाला आहे.

जिल्ह्यात पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पशुसंवर्धन विभाग, महिला व बाल विकास विभाग या विभागांचे लाभार्थी अधिक असल्याने ख कॉलिंग सेंटर साठी त्यांचा प्राधान्याने विचार केलेला असून त्यानंतर सर्व शासकीय विभागात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ए आय कॉलिंग सेंटर द्वारे कॉल केल्यानंतर संबंधित व्यक्तीचे किंवा लाभार्थ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे त्यांनी केलेल्या माहितीचा डेटा संकलित करून संबंधित तालुका प्रमुख अथवा विभाग प्रमुख पहिल्या आठवड्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करतील तर प्रत्येक महिन्याला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी स्वतः तक्रारीच्या अनुषंगाने आढावा घेऊन त्या तक्रारींचे निवारण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

### योजनेचे लाभार्थी राहणार असे

जिल्ह्यात ३२५० शासनमान्य स्वस्त धान्य दुकाने आहेत. या अंतर्गत १६ लाख ५० हजार लोक प्रत्येक महिन्याला दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू घेतात. या सर्व यंत्रणेवर नियंत्रण असणे आवश्यक आहे त्यामुळे ए आय कॉलिंग सेंटरच्या माध्यमातून यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. तसेच शिक्षण विभाग अंतर्गत अडीच ते तीन हजार शाळा व दहा ते बारा हजार शिक्षक तसेच लाखो विद्यार्थी आहेत त्याचप्रमाणे आरोग्य विभागाकडे लाभार्थींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे यामुळे या विभागाच्या योजना कार्यपद्धती व नागरिकांना या योजनांचा लाभ मिळतो की नाही या अनुषंगाने या उपक्रमा अंतर्गत नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

## महत्त्वाचे...



### संभाजी ब्रिगेडच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

समता नायक क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त संभाजी ब्रिगेड च्या वतीने महात्मा बसवेश्वर सर्कल येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे महिला जिल्हा अध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, शहर सचिव सिद्धाराम सवळे, शहर संघटक सतीश वावरे, शहर कार्याध्यक्ष जयश्री जाधव, सोहन होणराव, वैभव धुमाळ, शेखर कंटेकर, दिलीप निंबाळकर आदी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते दि. १ मे २०२५ रोजी सकाळी ७.१० वाजता ध्वजारोहण होणार आहे. तरी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विहित वेळेच्या पंधरा मिनिटे अगोदर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय पोशाखात उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले आहे.



### महापालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त कोंतम चौक येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात पूज्य महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार व अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहायक आयुक्त शशिकांत भोसले,मनिष काळजे, जगदीश पाटील, सफाई अधिकारी नागनाथ बिराजदार,कामगार कल्याण व जनसंपर्क, ओमप्रकाश वाघमारे पशु वैद्यकीय अधिकारी सतीश चौगुले, नितीन गायकवाड, शुभम चव्हण, परशुराम चाबुकस्वार उपस्थित होते.



### अक्षय्य तृतीयानिमित्त गोमय मूल्यवर्धित उत्पादन विक्री दिन साजरा

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमानाने अक्षय तृतीया निमित्त गोमय मूल्यवर्धित उत्पादन विक्री दिवस साजरा करण्यात आला. सोलापूर पांजरापोळ गोरक्षण संस्थेच्या वतीने श्री सिद्धेश्वर मंदिर येथे स्टॉल लावले त्या स्टॉलचे उद्घाटन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ धनराज गीड्डे, संस्थेचे अध्यक्ष गुरुराज माळगे, विश्वस्त नीलकंठप्पा कोनापुरे, मनोज सोळसे, वैशाली कुलकर्णी उपस्थित होते.

### जिल्ह्यात पाच कृषी पर्यटन केंद्रासाठी १५ मे पर्यंत अर्ज करा

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर जिल्हा प्रशासन व प्रकल्प संचालक (आत्मा), सोलापूर कार्यालयाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत, जिल्ह्यातील स्थानिक संस्थांच्या (विशेषत: शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, उत्पादक गट इत्यादी) माध्यमातून एकूण ५ पथदर्शी कृषी पर्यटन केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे. हे प्रस्तावित कृषी पर्यटन केंद्रे पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी आणि करमाळा या ४ प्रमुख मंदिरांच्या परिसरात प्रत्येकी एक केंद्र, तसेच उजनी धरणाच्या जलाशयालगतच्या गावात एक केंद्र उभारणे अभिप्रेत आहे. यामध्ये सी.एल.एफ., सी.एम.आर.सी. यांचा समावेश आहे. प्राप्त अर्जांवर जिल्हास्तरीय तांत्रिक समितीमार्फत ठरवलेल्या निकषानुसार निवड केली जाईल. अर्ज व इतर अनुषांगिक माहिती प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालय नवीन आरटीओ ऑफिसच्या मागे, विजापूर रोड, सोलापूर येथे उपलब्ध असणार आहे. अर्जाचे शुल्क १०० रूपये असून श्री. फुटाणे विक्रम (एटिएम) मो. ९४२३२३२५६९ यांच्या कडून प्राप्त करून घ्यावा. अर्ज वाटपाचा कालावधी दि. ५ ते १५ मे असेल. विहित नमुन्यास परिपूर्ण अर्ज प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालयात सादर करण्याची अंतिम तारीख २० मे रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असेल, विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत, अशी माहिती प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर यांनी दिली आहे.

## शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे कर्मचारी चालक व वाहकास मारहाण केल्या प्रकरणी प्रमुख जिल्हा न्यायाधीश एम . एस शर्मा यांनी दोन्हीं आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

यातील फिर्यादी शरण बसवेश्वर शिवप्पा शिंदे हे दिनांक २६- ०१- २०२५ रोजी नेहमीप्रमाणे अक्कलकोट आगार ते किणी कडे निघाले असता किणी येथील बस थांबा येथे प्रवासी सोडून निघतांना अचानक गाडी समोर उभी असलेली दुचाकी वाहन पाहून यातील वाहक दुचाकी वाहन कोणाचे आहे.

याची विचारपूस केली असता लागलीच तेथील दोन इसम येऊन वाहकास गच्ची पकडून मारहाण व शिवीगाळ करताना चालक सोडवण्यास आले असता चालकास ही बेदम मारहाण करण्यात आली अशा आशयाची फिर्याद दाखल करण्यात आले त्यानुसार पोलिसांनी यातील आरोपींवर भारतीय दंड संहिता कलम ३५३,३३२,५०४,५०६, व ३४ अन्वये आरोपी शिवराम बाबुराव उकरंडे व लक्ष्मण बाबुराव उकरंडे यांचे विरुद्ध अक्कलकोट नॉर्थ पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आले होते. सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपी विरुद्ध दोषारोप दाखल करण्यात आले होते प्रकरणातील सुनावणी दरम्यान सरकार पक्षाच्या वतीने एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले तथापि साक्षीदाराच्या जबाबातील महत्वपूर्ण कबुली व विसंगती लक्षात घेऊन आणि आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन में न्यायालयाने यातील आरोपींचे निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात आरोपींच्या वतीने ॲड. शांतवीर महिंद्रकर, ॲड वैशाली महिंद्रकर, ॲड. ॲड ओंकार बिराजदार ॲड. इरेश केंचीगुंडी यांनी काम पाहिले.

## शेतीच्या कारणावरून दोन गटात हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**

मोहोळ तालुक्यातील पेनुर शिवारात शेतीच्या बांधाच्या कारणावरून तसेच पूर्वी झालेल्या भांडणाच्या रागातून दोन गटात हाणामारीची घटना घडली. यामध्ये दोन्ही गटातील लोक जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शिवाजी चवरे (वय ६५), दशरथ लिंबा माने ( वय ४८), हनुमंत शिवाजी चवरे (वय २४) राजाबाई शिवाजी चवरे (वय ५५) व संभाजी शिवाजी चवरे (वय ४५, सर्व रा. पेनुर ता. मोहोळ) अशी एका गटातील जखमी झालेल्या लोकांची नावे आहेत. तर धनाजी बाळासाहेब माने (वय ३२), सुनील बाळासाहेब माने (वय ३१, दोघे रा. पेनुर ता मोहोळ) अशी दुसऱ्या गटातील जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत.

यातील दुसऱ्या गटातील सुनील व धनाजी माने यांची पहिल्या गटातील शिवाजी चवरे व इतरांबरोबर तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर सुनील व धनाजी माने यांनी त्याबाबत पोलिसात तक्रार दिली होती. ही तक्रार मागे घे म्हणून शिवाजी चवरे व इतर लोक माने यांना तगादा लावत होते. कारणातूनच बुधवारी सकाळी ११ वाजता धनाजी व सुनील यांना शिवाजी चवरे व इतर लोकांनी कोयता, लाकूड दगड तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात धनाजी यांच्या दोन्ही हाताला तसेच डोक्याला जखम झाली. तर सुनील याच्या डोक्याला जखम होऊन सर्वांगास मुक्कामार लागला. ते दोघे दुपारी ३:४५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता स्वतः दाखल झाले. दरम्यान पहिल्य गटातील शिवाजी चवरे यांच्यासह पाच जणांना शेतीच्या बांधाच्या कारणावरून तसेच पूर्वी झालेल्या भांडणाच्या रागातून धनाजी माने, सुनील माने व इतर चार जणांनी कोयत्याने व काठीने मारहाण करून जखमी केले. यात शिवाजी यांच्या डोक्याला तसेच पायाला जखम झाली. तसेच दशरथ व हनुमंत यांच्याही डोक्याला जखम झाली आहे. त्याचबरोबर राजाबाई यांच्या डोक्याला जखम होऊन सर्वांगास मुका मार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून सर्वजण सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल झाले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



## चांगल्या कर्माची जाणीव ठेवून कर्तव्यदक्ष रहा : प्रा.डॉ. बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरानी सामाजिक, धार्मिक,साहित्यिक व आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले.त्यानी देवाला ईष्टलिंगरुपात आपल्या हातात दिले. आचारवे स्वर्ग म्हणजे चांगल्या कामामुळे जे समाधान शांती मिळेल ते स्वर्गीय आनंद बनते. विश्वगुरु भक्ती भंडारी, क्रांतिकारी समाजसुधारक महात्मा बसवेश्वरांचे विचार आधुनिक काळात ही नंदादीप्रमाणे मार्गदर्शन करतात, असे विचार श्रीमद् वीरशैव महा-जन सभा ट्रस्ट संचलित ब ना बिराजदार वसतीगृहात बसवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना ट्रस्टी डॉ भीमाशंकर बिराजदार यांनी व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी मल्लिनाथ विभूते हे होते. व्यासपीठावर ट्रस्टी राजेंद्र कोठावळे अधिक्षक सोमेश्वर लवंगे बाबासाहेब कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी म. बसवेश्वरांच्या प्रतिमेची पूजा करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.राजेंद्र कोठवळे महात्मा बसवेश्वर एक युगप्रवर्तक होत असे सांगून म्हणाले ईष्टलिंगरुपात देव म. बसवेश्वरानी आपल्या हातात देवून नित्य पूजा करण्यास सांगितले. संस्थाध्यक्ष मल्लिनाथ विभूते यांनी महात्मा बसवेश्वर जयंती व अक्षय्यतृतियेच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना म बसवेश्वरांचे जीवन चरित्र स्पष्ट केले. अधिक्षक सोमेश्वर लवंगे यानी आभार मानले. सचिन सोळसे यांनी विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप केले.

## नागरी प्रश्नांसाठी सुरेश पाटील यांनी झोन कार्यालयात केले आंदोलन

### उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

पाणी, ड्रेनेज, कचरा, रस्ता, दिवाबत्ती व नाला या संदर्भातील विविध मागण्यांसाठी विभागीय कार्यालय क्र. तीन येथे माजी नगरसेवक सुरेश पाटील यांचे बुधवारी आंदोलन केले. महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मध्यस्थीनंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

शहरातील विकास कामे संथ गतीने सुरू आहेत यासह विविध नागरी प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी महापालिका प्रशासनाला जागे करण्यासाठी माजी नगरसेवक सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली विभागीय कार्यालय क्रमांक ३ मध्ये आंदोलन करण्यात आले. रस्ता, पाणी, ड्रेनेज, लाईट आदी कामे होत नसल्याने विविध समस्या भेडसावत आहेत. यासाठी आंदोलन केल्याचे सुरेश पाटील यांनी सांगितले. दरम्यान या आंदोलनाची माहिती मिळताच उपायुक्त आशिष लोकरे, विभागीय कार्यालयाचे अधिकारी सुनीता हिबारे यांच्या मध्यस्थीनंतर सुरेश पाटील यांनी आंदोलन स्थगित केले. प्रभाग क्रमांक ३ मध्ये ड्रेनेज भरत असून मॅन होल मध्ये गाळ साचले आहे. त्यामुळे ड्रेनेजचे पाणी नागरिकांच्या घरात येत आहे. विभागीय कार्यालयाला वारंवार सांगुनही साफसफाई होत नाही. ब्रिटिशकालीन पाण्याचे व ड्रेनेजचे पाईपलाईन गंजलेले असून त्याची पाहणी करून लाईन बदलून घ्यावे, अशी मागणी सुरेश पाटील यांनी यावेळी केली. याप्रसंगी संदीप महाले, रवी गड्डम, प्रशांत कलशेट्टी, शरणु मुडल, माऊली जांभळे, भारत माने, राहुल कांबळे, सिद्राम दासरी, सिद्दु गंधाळकर, रसोलगीकर, प्रथमेश गुल्लापल्ली आदी उपस्थित होते.



### अनेक भागात दूषित पाणीपुरवठा

शहरात पाणीपुरवठा ५ दिवसाआड होत असताना घोंगडे वस्ती, मड्डी वस्ती, इंदिरा वसाहत, सोना नगर, मुनाळे बोळ, गणेश नगर, दाळगे प्लॉट या परिसरात अनियमित, दूषित व पिवळसर पाणीपुरवठा होत आहे. जोडभावी पेठ परिसरातील स्मार्ट सिटी भागात रस्त्यावर लाखो लिटर पाणी वाहत असते. फुटपाथ धुवणे, गाडी धुवणे असे प्रकार सरार्स होत असून पाणीपुरवठा वेळेत बदल करण्यात यावा. या भागात अनेकांच्या घरात बेकायदेशीर नळ कनेक्शन दिले असल्याने पाण्याचा वापर जास्त होत आहे, असे सुरेश पाटील यांनी निदर्शनास आणून दिले.

## संस्था पदाधिकारी आत्महत्या प्रकरणी दोघांना जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

येथील रहिवासी गणेश अशोक थोरात वय ४२ वर्षे, रा. सोलापूर व निलेश चंद्रकांत कांबळे, वय ४५ वर्षे, रा. सोलापूर या दोघांनी संस्थापक पदाधिकारी एस.डी. कांबळे यांना आत्महत्येस प्रवृत्त केले प्रकरणीच्या गुन्ह्यात सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी काही अटीसह जामीन मंजूर केला.

मयत एस.डी. कांबळे हे एका संस्थेचे पदाधिकारी होते यातील आरोपी निलेश चंद्रकांत कांबळे हे सदर संस्थेचे सदस्य होते. सदर निलेश कांबळे यांनी त्यांचे नावे प्लॉटधारक म्हणून लावावे म्हणून अर्ज दिला होता. सहनिबंधक यांचे समोर याचा वाद चालू होता. दि. १७/०३/२०२५ रोजी मयत एस.डी. कांबळे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या खिशात एक चिट्ठी सापडली त्यामध्ये निलेश कांबळे व गणेश अशोक थोरात व अन्य एक यांनी मयत एस.डी. कांबळे यांना खोट्या तक्रारी करुन त्रास दिला, त्यामुळे त्यांनी आत्महत्या केली अशा आशयाची फिर्याद मयताचा मुलगा एस. एस. कांबळे यांनी दिली, त्यावरुन गुन्हा दाखल होऊन आरोपीस फौजदार चावडी पोलीसांनी अटक केली होती.

त्याबाबत त्यांनी सोलापूर सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता, त्या जामीन अर्जाची सुनावणी होऊन त्यामध्ये आरोपीने कायदेशीर मार्गासाठी तक्रार करणे हा गुन्हा नाही, फिर्यादीतील कथानक तयार केलेले आहे, यातील आरोपीने त्यांना कधीच कोणताही त्रास दिला नाही, प्रकरणातील तपास पूर्ण झाला आहे, असा युक्तीवाद आरोपीचे वकिल ॲड. शशी कुलकर्णी यांनी केला त्यावर विचार होऊन सत्र न्यायालयाने आरोपींची रु. ५०,०००/- च्या जामीनावर मुक्तता करण्याचा आदेश दिला. यात आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगावकर, ॲड. रणजित चौधरी, ॲड. प्रणव उपाध्ये, ॲड. प्रसाद अग्निहोत्री यांनी तर सरकारतर्फे ॲड. दत्ता पवार यांनी काम पाहिले.

## निलकंठेश्वर शिक्षण संस्था संचालकपद रद्दचा बदल अहवाल फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर मधील नामांकित श्री निलकंठेश्वर शिक्षण संस्था सोलापूर या न्यासातील निवडणूकीत बहुमताने निवडून आलेल्या संचालक श्रीनिवास शंकर बंदगी यांच्या संचालक पद रद्दचा बदल अहवाल धर्मादाय उपायुक्त कुंभोजकर यांनी फेटाळला.

श्री निलकंठेश्वर शिक्षण संस्था सोलापूर मधील चुकीच्या निर्णयाविरुध्द संचालक म्हणून श्रीनिवास शंकर बंदगी यांनी वेळोवेळी आवाज उटविला. याचाच राग मनातठेवून सत्ताधारांनी त्यांचे संचालक मंडळ व्यवस्थापन सभेत श्रीनिवास शंकर बंदगी यांचे संचालक पद चुकीच्या पदत्तीने रद्द करण्याचा ठराव केला व तसा बदल अहवाल धर्मादाय उपायुक्त यांच्याकडे दाखल केला. सदर बदल अहवालाचा प्रकरणात श्रीनिवास शंकर बंदगी यांनी त्यांचे वकिलांनी रितसर हरकत घेतली. संचालक पद रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापन मंडळाला नाही व ते केवळ धर्मादाय उपायुक्तांनाच असल्याने सदर बदल अहवाल रद्द होण्यास पात्र असल्याचा युक्तिवाद वकिलांनी मांडला. युक्तिवाद ग्राह्य धरून धर्मादाय उपायुक्त यांनी प्राथमिक मुद्दा काढून संचालक रद्दचा बदल अहवाल फेटाळला. या प्रकरणात हरकतदार यांच्याकडून विधिज्ञ ॲड. मनोज पामुल, ॲड. श्रीनिवास बंडी, ॲड. ज्योती अल्ली, ॲड. राकेश कोपेल्ली, ॲड. बालराज कैरमकोंडा, ॲड. तुषार पामुल व ॲड. स्वप्नील पुंजाल यांनी काम पाहिले व संस्थेतर्फे ॲड. अंबादास रायनी यांनी काम पाहिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अक्षय तृतीया ठरली मुख्यमंत्र्यांसाठी महत्वाची!

## ● वर्षा निवासस्थानी सहकुटुंब गृहप्रवेश तर कन्येचे दहावीत मोठे यश

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ३० एप्रिल -**

हंदू धार्मियात अक्षयतृतीया मोठी महत्त्वाची मानली जाते. साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या हा दिवस राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी खूप महत्वाचा ठरला. मुख्यमंत्र्याचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यामध्ये त्यांनी सहकुटुंब गृहप्रवेश केला. तर त्यांची कन्या दिविजा फडणवीस हिने दहावीच्या परीक्षेत ९२.६० टक्के गुण पटकावित घवघवीत यश मिळविले. अमृता फडणवीस यांनी एक्सवर ट्विट करून आणि त्याबाबतची माहिती दिली.



गेल्यावर्षी नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीच्या विजयाचे प्रमुख शिल्पकार फडणवीस यांनी पुन्हा मुख्यमंत्री बनले. मात्र ते वर्षा या शासकीय निवासस्थानी वास्तव्यास गेलेले नव्हते. सागर या बंगल्यात राहत होते त्याबाबत वर्तुळात विविध चर्चा व्यक्त करण्यात येत होती. विरोधकाकडून त्याबाबत करण्यात आलेल्या टीकेला उत्तर देताना कन्येची दहावीची परीक्षा झाल्यानंतर वर्षा मध्ये जाणार असल्याचे सांगितले होते. मुख्यमंत्री बनल्यानंतर अखेर जवळपास ५ महिन्यानंतर आज अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर वर्षा निवासस्थानी गृह प्रवेश केला. त्यांची कन्या दिविजा हिचा दहावीचा निकाल जाहीर झाला. अमृता फडणवीस यांनी काही मिनिटांपूर्वी त्यांच्या अधिकृत ट्विटरवरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लेक दिविजा फडणवीस हिचा दहावीचा निकाल जाहीर झाल्याचे सांगितले आहे. त्यासोबतच फडणवीस कुटुंबाने अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर वर्षा या निवासस्थानी गृहप्रवेश केल्याचेही त्यांनी सांगितले. पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, ''सर्वांना अक्षय तृतीयेनिमित्त हार्दिक शुभेच्छा. आजच्या शुभमुहूर्तावर वर्षा या निवासस्थानी आम्ही छोटीशी पूजा संपन्न करीत गृहप्रवेश केला. आजच्या दिवशीची आणखी एक अत्यंत आनंदाची बातमी आपल्या सर्वांना सांगताना मन खुशीने भरून गेलंय, आमची सुकन्या दिविजा ही १०वी च्या बोर्ड परीक्षेत ९२.६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे'', असे त्यांनी म्हटले आहे.

## ॥ उसंतवाणी ॥

१४९६

शिरच्छेद केला । मोदींच्या फोटोचा ।
खेळ विकृतीचा । काँग्रेसींनी ॥१॥

'एक्स'वरती या । टीकेचा ये पूर ।
संतापाचा धूर । धुसमसे ॥२॥

टीकेच्या या ऐसे । बूमरँग झाले ।
डिलीटच केले । घाबरून ॥३॥




आधीच पेटले । सिंधूचे ते पाणी ।
ओठी रडगाणी । पाकड्यांच्या ॥४॥

होता त्यांची कोंडी । आणीबाणी वेळ ।
तेव्हा असा खेळ । कशासाठी? ॥५॥

देशद्रोही का हा । काँग्रेसचा मेंदू ।
टीकेसाठी चेंडू । लूज दिला ॥६॥

कांत म्हणे यांना । तारतम्य नाही ।
विकृतीच वाही । रक्तांतून ॥७॥


श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
३० एप्रिल २०२५

## मुंबईत भाजपातर्फे महाराष्ट्र दिनाचे आज विविध १०६ कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ३० एप्रिल**

मुंबई भाजपातर्फे १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले असून १०६ मंडलात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

मुंबईत सर्वच उत्सव आणि जयंती उत्सव जोरदार साजरे करण्यात येतात त्याच पध्दतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि काम गार दिनाचे कार्यक्रम ही मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात येणार आहे. भाजपाने संघटनात्मक पातळीवर नवीन मंडल रचना केली असून पुर्वीच्या एका मंडलात तीन नवीन मंडले करण्यात आली आहेत त्यानुसार नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या ही करण्यात आल्या आहेत. नवनियुक्त मंडल आणि वॉर्ड अध्यक्षांची नुकतीच बैठक घेऊन मुंबई भाजपा अध्यक्ष आणि मंत्री अँड आशिष शेलार यांनी सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रम ाचे आयोजन करण्याच्या सूचना केल्या आहेत. नियोजना नुसार उद्या १ मे राजी मुंबईत १०६ ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करुन ढोल ताशांच्या गजरात चौकाचौकात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात येणार आहे. काही ठिकाणी छत्रपती शिवाजी म हाराज यांच्यावरील शाहीरी आणि पोवाडा. गीतांचे कार्यक्रम ही आयोजित करण्यात येणार आहेत.






सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# वारसा संवर्धनातून विकास भरारी

कुठलेही सरकार सत्तेवर आले की त्या सरकारतर्फे ज्या अनेक घोषणा केल्या जातात, त्या घोषणांमध्ये संस्कृती आणि परंपरांची जपणूक आणि संवर्धनासाठी प्रयत्न करणार तसेच आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा जपण्यासाठी पावले उचलणार या घोषणांचा अग्रक्रमाने समावेश असतो. या घोषणा त्या त्या सरकारतर्फे सत्तेत येताच अहमहमिकेने केल्या जातात. तथापि, त्याबाबत भरीव असे काही होईलच याची काही शाश्वती नसते. अनेकदा तर सरकारच्या कार्यक्रम पत्रिकेवर इतके सारे विषय असतात की सांस्कृतिक, सामाजिक, आध्यात्मिक मुद्दे कुठेतरी धूळ खात पडून राहतात. रामजन्मभूमीचा मुद्दा असो, कृष्णजन्मभूमीचा असो, गुटख्यावरील बंदीचा असो, शंकरपट, दहीहंडी आणि जलीकट्टूच्या आयोजनाबाबतचा असो की शिवाजीची वाघनखे आणण्याचा, गडकिल्ले संवर्धनाचा अन् एखादा चित्रपट करमुक्त करण्याचा असो... या साऱ्या आपल्या प्राचीन वारशाशी संबंध जोडणाऱ्या विषयांकडे निरनिराळ्या सरकारांच्या झालेल्या दुर्लक्षामुळे समाजाचेही नुकसान झाल्याचा आणि आपसी सद्भावही दुभंगल्याचा अनुभव आपण घेतला आहे. त्या अर्थाने राज्यातील देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या त्रयींच्या सरकारने याबाबत केलेले काम समाधानकारक म्हणावे लागेल. नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची लंडनमध्ये लिलावात निघालेली ऐतिहासिक तलवार खरेदी करून राज्य शासनाने राज्याचा अनमोल ठेवा परत मिळविला आहे. यानिमित्ताने आपल्या मराठा साम्राज्यातील, आपल्या मराठी मुलुखातील (ज्यात अठरापगड जातींचा समावेश होतो), त्यांच्या साम्राज्याचा एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेवा आपल्या महाराष्ट्रात येणार आहे. यासाठी राज्य सरकारचे नेतृत्व करणारे तिन्ही पुढारी, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन करायला हवे. कारण आम्ही केवळ बोलके सेनापती नसून, कर्ते सेनापती असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. ही तलवार अर्जित करण्यासाठी ४७.१५ लाख रुपये सरकार देणार आहे. या कृतीसाठी भोसले घराण्याचे वंशज राजे मुधोजी भोसले यांनी सरकारचे आभार मानले आहेत. सरकारने ही तलवार परत आणून महाराष्ट्र आणि भोसले राजघराण्याच्या अस्मितेच्या रक्षणाचीच भूमिका पार पाडली आहे. रघुजी भोसले हे छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार होते. त्यांची युद्धनीती आणि शौर्य यावर प्रसन्न होत छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही उपाधी दिली होती. रघुजी भोसले यांनी १७४५ च्या दशकात बंगालच्या नवाबांविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करीत मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला होता. दक्षिण भारतात सुद्धा त्यांनी आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला होता. पुरीतील जगन्नाथ मंदिराला भेट दिल्यानंतर, रघुजी भोसले यांनी यात्रेचे महत्त्व ओळखून, त्यास अधिक प्रसिद्ध आणि प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्याच प्रयत्नांमुळे, जगन्नाथ रथयात्रा अधिक प्रसिद्ध झाली आणि लोकांना यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

रघुजी भोसलेंची जी तलवार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणार आहे, ती तलवार मराठा शैलीच्या फिरंग पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. एकधारी पाते, सोन्याचे नक्षीकाम हे त्या तलवारीचे वैशिष्ट्य आहे. युरोपीय बनावटीचे पाते हे त्या काळात प्रसिद्ध होते. या पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा' असे सोन्याच्या पाण्याने लिहिले आहे. १८१७ मध्ये नागपुरात ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली होती. त्यात ही तलवार पळवून नेली असावी, असा जाणकारांचा अंदाज आहे. राज्याचा समृद्ध वारसा जतन आणि समृद्ध करण्यासाठी राज्याचे तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आणि जगदंबा तलवार ब्रिटनमधून भारतात आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. लंडनस्थित मराठी उद्योजक त्यासाठी पुढे सरसावले. यातून महाराजांची वाघनखे भारतात आली आणि सध्या ती राज्यातील विविध संग्रहालयांत लोकांना बघता यावी म्हणून प्रदर्शनात ठेवली जात आहेत. त्यांचा हा प्रयत्नही केंद्र आणि राज्य शासनाच्या वारसा जतनाच्या घेतलेल्या संकल्पाचाच एक भाग होता. यापुढचा भाग म्हणून ही वाघनखे आणि जगदंबा तलवार कायमस्वरूपी भारताच्या ताब्यात यावी म्हणून ब्रिटिश शासनाला मोठ्या प्रमाणात पत्रे लिहिली जाणार आहेत. देशाचा समृद्ध वारसा काय आहे, याची जाणीव आजच्या पिढीला आहे. पण हा ठेवा तरुण आणि किशोरवयीन पिढीपर्यंत नेण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठीच विविध राज्य सरकारे आणि केंद्र सरकारचे प्रयत्न चाललेले आहेत. हजारो वर्षांपासून चालत आलेला आपला समृद्ध ऐतिहासिक वारसा जपण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारत आणि अमेरिका या देशांमध्ये सांस्कृतिक संपदा करार झाल्याची माहिती आपल्याला आहेच. या कराराअंतर्गत अमेरिकेतून तब्बल ५८८ प्राचीन कलाकृती भारतात परत आणण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे त्यापैकी २९७ कलाकृती या केवळ २०२४ या एका वर्षात आणण्यात आल्या. प्राचीन कलाकृतींची तस्करी रोखण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरले. सरकारी आकडेवारीनुसार, १९७६ ते २०१३ दरम्यान भारताने वेगवेगळ्या देशांमधून फक्त १३ पुरातन वस्तू परत मिळवल्या आहेत. तथापि, २०१४ मध्ये, जेव्हापासून नरेंद्र मोदी सत्तेत आले तेव्हापासून आणि २०२१ मध्ये २०० हून अधिक पुरातन वस्तू परत आल्या आहेत किंवा परत आणण्याच्या प्रक्रियेत आहेत. २००४ ते २०१४ या कालावधीत निवडक प्राचीन वस्तू अमेरिकेतून भारतात परत आल्या. मोदी सरकारने चार दशकांपूर्वीच्या तुलनेत जास्त प्राचीन भारतीय खजिना परत आणला आहे. ज्या वस्तू भारतात आणण्यात आल्या त्या ११ व्या इ.स. ते १४ व्या इ.स. या काळातील आहेत. तसेच २००० इ.स.पू. मधील तांब्याच्या मानवरूपी वस्तू किंवा दुसऱ्या इ.स.मधील टेराकोटा फुलदाण्यासारख्या ऐतिहासिक पुरातन वस्तू परत आणण्यातही ते यशस्वी ठरले आहेत. सुमारे ४५ पुरातन वस्तू सामान्य युगापूर्वीच्या आहेत. कांस्य संग्रहात प्रामुख्याने लक्ष्मी नारायण, बुद्ध, विष्णू, शिव पार्वती आणि २४ जैन तीर्थंकर, कंकलमूर्ती, ब्राह्मी आणि नंदिकेसा यांच्या सुप्रसिद्ध आसनांच्या अलंकृत मूर्ती तसेच इतर अनामित देवता आणि दैवी व्यक्तिरेखा आहेत.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग आणि राष्ट्रीय संग्रहालयाची स्थापना प्राचीन स्थळांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी झाली आहे. यासाठी मोदी सरकारच्या काळात मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याच सरकारच्या कार्यकाळात काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक (उज्जैन), राम मंदिर (अयोध्या) सारख्या धार्मिक स्थळांचे नूतनीकरण झाले. सिंधू सभ्यता संग्रहालयाच्या (धोलावीरा, गुजरात) उभारणीसही चालना मिळाली आहे. केंद्राच्या याच प्रयत्नांचा भाग म्हणून युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारतातील स्थळे जास्त प्रमाणात समाविष्ट होण्यासाठी प्रयत्न होत आहेत. पंतप्रधानांनी तर भारतात समृद्धीचा ओघ वाढावा आणि सुदूर गावांमधील अर्थकारणाला गती यावी म्हणून धनवंतांना त्यांच्या परिवारातील विवाह विदेशात न करता देशातील विविध शहरांमध्ये करण्याचे आवाहन केले असून, त्यांच्या आवाहनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसादही मिळत आहे. काळाची पावले ओळखून भारताचा सांस्कृतिक डिजिटल डेटाबेस तयार करणे, ग्रंथांचे स्कॅनिंग व साठवण करणे या कामांनाही गती आली आहे. दिल्लीतील प्रधानमंत्री संग्रहालयाला देण्यात आलेले नवे रूप हा त्याच प्रयत्नांचा पुढचा भाग आहे. आता या संग्रहालयात आजवर झालेल्या पंतप्रधानांनी केलेली कामगिरी एकाच छताखाली बघण्याची आणि त्याचा अभ्यास, विश्लेषण करण्याची सोय झाली आहे. आदिवासी संग्रहालयांची नव्याने उभारणी करण्याचेही काम हाती घेण्यात आले आहे. उपलब्ध झालेल्या या वारशाच्या संवर्धनातून नव्या पिढीने देशाच्या, पर्यायाने आपल्या समाजाच्या विकासासाठी भरारी घेण्याची आवश्यकता आहे.

# पूज्य मां की अर्चना का एक छोटा उपकरण हूं!

## श्रद्धांजली

-किशोर पौनीकर नर्मदापुरकर, नागपूर

अभाविप विदर्भ प्रदेश व भाजपाचे प्रमुख कार्यकर्ते माजी आमदार स्व. रामदास आंबटकरांना भावपूर्ण श्रद्धांजली. बहुदा ते १९८६ हे वर्ष होते. शुभांग गोरे नागपुरला पूर्णकालिक होते व ते आता व्यक्तिगत जीवनात वापस जाणार होते. विद्यार्थी परिषद कार्यालयात त्यांचा निरोप समारंभ सुरु होता.


एका सुरेल गळ्याच्या कार्यकर्त्याने असु अम्ही सुखाने पत्थर पायातील , हे बापु महाशब्देंने रचलेले गीत गायले. उपस्थित बहुतेक साऱ्यांचेच डोळे पाणावले होते. कार्यक्रम आटोपला व मी उपस्थित कार्यकर्त्यांना बाजूला सारत त्या ज्येष्ठ कार्यकर्त्याजवळ गेलो व त्यांचा परिचय करून घेतला. मी रामदास भगवानजी आंबटकर, अमरावती विभाग संघटनमंत्री आहे. केंद्र अमरावती व गाव वडनेर! माझ्यासारख्या अगदी नवख्या कार्यकर्त्यालाही त्यांनी आपला परिपूर्ण परिचय करून दिला होता. तेंव्हापासून रामदास आंबटकर, रामदासजी या नावाने माझ्या ह्रदयात विराजमान झाले. १९८६ च्या विदर्भ प्रांताच्या वर्धा अधिवेशनात रामदासजी विदर्भ प्रदेश मंत्री झाले. त्यानंतर त्यांच्या नागपूर प्रवासा दरम्यान नित्यभेटी सुरू झाल्या. पुढे नागपूर नगर संघटनमंत्री असलेली अमरावतीची कार्यकर्ती मनिषा बक्षी पण पूर्णकालिक कार्यकाल आटोपून व्यक्तिगत जीवनात जातांना तिचा निरोप समारंभ झाला. त्या कार्यक्रमात रामदासजींनी पुज्य मां की अर्चना का एक छोटा उपकरण हूं! हे गीत गायले होते. रामदासजींचा सुरेल गळा व त्यांच्या घराण्यातील पूर्व परंपरेचे देशभक्तीपर स्पंदनं उपस्थितांना भारतमातेच्या सगुण रुपाचे दर्शन घडवत असे. पुढे यवतमाळ अभ्यासवर्गात रामदासजी प्रांत संघटनमंत्री बनले व त्यांचे केंद्र नागपूर झाले. त्यांच्या विदर्भ प्रांत प्रवासात महिनाभरात अंदाजे दोनदा तरी विस्तृत भेटी होत असत. आमच्याकडे किमान चार पिढ्यांपासून पैठणच्या श्रीएकनाथ महाराजांची पुण्यतिथी एकनाथ षष्ठी असते. यात रात्रभर जागृती भजन असते. रामदासजींना भजनाची आवड असल्याने मी त्यांना भजनासाठी बोलवले. पहिल्यावर्षी त्यांनी आर्ततेने म्हटलेला, बाऽरे पांडुरंगा केंव्हा भेट देसी। झालो मी परदेसी तुजविण... हा अभंग अजूनही कानात घोळत आहे. नंतर दरवर्षीच ते नाथषष्ठी उत्सवात हजरी लावत असत. एरव्ही नागपूर प्रवासा दरम्यान कधी दुपारी घरी जेवायला आले की म्हणायचे, किशोर, जरा पेटी काढ बरं! असे म्हणून दोन चार अभंग म्हणत.

रामदासजी नागपूरच्या संगमचाळ कार्यालयात एकटे दिसले की त्यांना एखादे गीत म्हणण्याचा आग्रह करण्याचा जणू मला छंदच लागला होता. रामदासजी विदर्भ प्रांत संघटनमंत्री आहेत म्हणजे काय आहे? हेच मला त्याकाळी कळत नव्हते.... याला एक महत्वाचे कारणही होते. ते म्हणजे रामदासजींची अगदी साधी राहणी.

मी पूर्णकालिक कार्यकर्ता आहे, मी विदर्भ प्रांत संघटनमंत्री आहे, असा कुठलाही अभिनिवेश त्यांच्या वागणुकीत नसे. थोडे धैर्याने व माफी मागून म्हणतो की रामदासजींच्या काळातील अभाविप संघटनेतील मोकळेपणा त्यानंतर कधी दिसलाच नाही. कुठेही अधिकारपदाचा तुसडेपणा नव्हता, कुठेही गोपनीयतेची पराकाष्ठा नव्हती. बैठकींव्यतिरिक्त त्यांचे साधे बोलणेही हितोपदेशच असे.

माझे अभाविप जीवनात फार काही अभ्यासवर्ग वा अधिवेशनं झाले नाहीत. पण रामदासजींच्या सोबत राहतांनाच सहज बोलण्यातून अनेक विषय समजत. मुंजे चौकातील लक्ष्मीविलास हॉटेल मध्ये चहा पितांना ते सहजच बोलून जात तीन दिवस बुलढाण्याला होतो. चिखलीला बाळासाहेबांकडे जाऊन आलो. बोलतांना अनेक विषय कळले. आपले विद्यार्थी परिषदेचे काम म्हणजे रामदासी घडवण्याचेच काम आहे. महंते महंत करावे युक्तीबुद्धीने भरावे, जाणते करून विखरावे नाना देशी. विदर्भातील प्रवासादरम्यानच्या अनेक गोष्टी ते सहज गप्पांमधून सांगत.

रामदासजी वागण्या बोलण्यात इतके साधे होते की ते आपले नाव फक्त 'रामदास भगवानजी आंबटकर' असेच सांगत. फार फार नंतर कळले की त्यांनी बीएएमएस केले आहे. वैद्य रामदास आंबटकर वा डॉक्टर रामदास आंबटकर असे नाव त्यांनी सांगितले असते तर ते प्रचलित पद्धतीनुसारच ठरले असते. पण संघटना ही सर्वोच्च आहे, चर्चा घडावी ती तत्त्वाचीच. असेच त्यांना वाटत असल्याने त्यांनी संघटनेपेक्षा स्वतःला मोठे वा अलौकिक होऊ दिले नाही. रामदासजी स्वतः बद्दल फारच कमी बोलत. त्यांना दोन लहान बहिणी आहेत. त्यातील एक कॉलेजमध्ये यू आर झाली होती. तो विद्यापीठ निवडणुकीचा काळ होता. ती सुरक्षित राहावी म्हणून मला तिला आणायला बसने पाठवले होते. मी वडनेर गावी गेलो तेंव्हा रात्रच झाली होती. त्याकाळी फोनच क्वचित घरी होते. त्यामुळे संपर्काची आजच्यासारखी स्थिती नव्हती. नागपूर नगर संघटनमंत्री प्रविणजी टेंभेकरांनी मला फक्त वडनेरला अमुकतमुक वार्डात जा, व रामदासजींच्या बहिणींना नागपूरला घेऊन ये, असा परस्पर निरोप दिला होता. हिवाळ्याचे दिवस होते ते. मी रात्री साडेसात च्या दरम्यान वडनेरला पोहचलो. तिथे पोहचल्यावरच आंबटकर परिवाराला गावात किती प्रतिष्ठा आहे ते कळले होते. माझ्याजवळ साधी चिठ्ठीही नव्हती. बिना परिचयाचे दोन मुली रात्री आपल्यासोबत येतील का? हा प्रश्न होता. मी रिक्षाने रामदासजींच्या घरी गेलो. ओळख सांगितली व आपल्याला नागपूरला जायचे आहे, असे त्या दोघी भगिनींना सांगितले.



रामदासजींचा, म्हणजे आपल्या भावाचा मित्र घरी आलाय म्हटल्यावर त्या दोघींनी स्वयंपाक केला व आम्ही जेवण करून रात्रीच बसने नागपूरला आलो. स्वतः साधे असलेल्या रामदासजींचा वडनेरचा संपूर्ण परिवारही साधा आहे हे तेंव्हा लक्षात आले.

रामदासजींचे वडील भगवानजी आंबटकर हे राजकारणात होते व वैदर्भीय राजकारणातले भाजपातले एक आदरयुक्त नाव होते. ते दरवर्षी आपल्याशी संबंधित लोकांना घरी जेवायला बोलवत. त्या एक दोन मेळाव्यांना प्रविण टेंभेकर, सुनील आंबेकर यांच्यासह मी पण गेलो होतो.

होळी धुळवडी दरम्यान रामदासजी नागपूरलाच राहात. त्याकाळी माझ्याकडे टीव्हीएस एक्सटी (प्रचलित नाव टीव्हीएस५०) ही मोपेड होती. तिच्यावर मी, प्रविणजी टेंभेकर व रामदासजी आंबटकर असे तिघं बसून अरुण श्रीवास्तवांचे पाचपावलीतील घर ते शिवाजी नगरचे दत्ताजी डिडोळकरांचे घर व तिथून सुधाकरराव भालेरावांचे बजाज नगरचे घर असे पूर्ण नागपूर आम्ही फिरत असू.

गोपनीयतेचा दिखावा रामदासजींच्या स्वभावातच नव्हता. त्यामुळे ते परिपूर्ण पारदर्शक वाटत. अंदाजे १९८९ च्या दरम्यान रामदासजी पूर्णकालिक म्हणून थांबले व तरुण भारत वृत्तपत्रात सहसंपादक म्हणून रूजू झाले. त्यांना भेटायला मी तरुण भारतात जात असे. चहा प्यायला गेल्यावर ते अभाविपतले आदर्श जीवन व प्रत्यक्ष व्यावहारिक जीवन यातील तफावत फार रंगतदारपणे सांगत.

पुढे मी पण पूर्णकालिक म्हणून पहिले आसाम व नंतर मध्यप्रदेशात गेलो. जाण्यापूर्वी रामदासजींकडून काही मार्गदर्शन घेतले. ते म्हणाले, मी भारतमातेला उच्चासनावर बसवायला काम करत आहे, हा भाव असावा, म्हणजे काम करतांना आलेले सन्मान व अपमान हे त्रास देत नाहीत. भारतमातेसोबत आपले अनुसंधान राहावे म्हणून काम करत असतांना आपल्याला येत असलेले परिषद गीतं गुणगुणत राहावे. तसा आपल्या कार्यप्रणालीत कार्यकर्ता आपोआपच घडत जातो. रामदासजींच्या या पाथेयाने माझा पूर्णकालिक कार्यकाळ चांगला राहीला. मी वापस आलो तोवर रामदासजींनी भाजपाचे पूर्णवेळ काम सुरू केले होते व त्यांना नागपूर बाहेरचे क्षेत्र होते. त्यामुळे कधीतरी पुर्वकार्यकर्त्यांच्या बैठकीत भेट होई. अध्येमध्ये कुठे कोणाकडे लग्नसमारंभातही भेट होई. तेंव्हा ते घरच्या सर्वच मंडळींची आठवण काढत. मधल्या काळात त्यांनी म्हाळगीनगरला अजिंक्य मेडिकल स्टोअरही काढले होते. माझे मोठेभाऊ त्या भागातच राहात असल्याने भावाकडे जातांना रामदासजींची कधी भेट होई.

काहीवर्षांपुर्वी ते विधानपरिषद आमदार झाले. आपल्या वडीलांचीच सर्वांना वर्षातून एकदा सर्व परिचितांना एकत्रित बोलवण्याची पद्धत त्यांनीही सुरू केली. अभाविपच्या विदर्भातील पुर्व कार्यकर्त्यांना एकत्रित आणायला तू माझा सांगाती या नावाने अलग अलग ठिकाणी अशी संमेलने झालीत. नागपूरच्या सम्मेलनाला मी पण गेलो होतो. अगदी याच वर्षी गेल्या २२ जानेवारीला सौ सीमा सालोडकरच्या मुलीच्या लग्नात त्यांची व वहिनींची भेट झाली होती. तेंव्हा मी त्यांना माझ्या अभाविपतील पूर्णकालिक कार्यकाळातील अनुभवांचे पुस्तक छापत आहे, हे सांगितले व काही गरज पडल्यास तुम्हाला भेटायला येईल हे ही सांगितले. तेंव्हा माझ्या मुलाकडे बघत ते गमतीने म्हणाले, आता तू पण अभाविपचे काम करतोय तर वडीलांसारखेच समोर राहून काम कर,

पण कामासाठी बाहेर जाऊ नको. हा पठ्ठा बाहेर जाऊन आला व नंतर कोणाच्याच हातात सापडला नाही . पुढे आठच दिवसांनी त्यांची रेशिमबागला झालेल्या विद्यार्थी परिषदेच्या विदर्भ प्रांत अधीवेशनात भेट झाली. रात्रीच्या जेवणादरम्यान आम्ही सोबतच होतो. तेंव्हा त्यांना माझे पुस्तक दाखवले. पण तोवर अधिवेशनात त्याचे प्रकाशन न झाल्याने त्यांना ते पुस्तक देता आले नाही. ते म्हणाले, किशोर, हे पुस्तक मी तुझ्याकडून विकतच घेईल. नंतर त्यांनी माझे विद्यार्थी परिषदेतून घडतांना हे पुस्तक व माझ्याकडे असलेली राष्ट्रीय दिनदर्शिका माझ्या अकाउंट मध्ये पैसे टाकून खरोखरच विकत घेतले. ते पुस्तक द्यायला त्यांच्याकडे जाणेमात्र जमलेच नाही, म्हणून त्यांना फोन करून ते कोरियरने पाठवले. अधिवेशनात सोबत जेवतांना ही त्यांची शेवटचीच भेट आहे, असे मात्र वाटले नव्हते.

आज अक्षय्य तृतियेच्या शुभमुहूर्तावर त्यांनी आपला देह भारतमातार्पण केला. पुज्य भारतमातेच्या अर्चनेत त्यांनी ऐन तारुण्यात मन समर्पित केलेले होतेच. आता देह नावाचे उपकरणही त्यांनी समर्पित केले व ते अनंताच्या प्रवासाला गेले. आरती भी हो रही है, गीत बनकर क्या करूँगा, पुष्प माला चढ़ रही है, फूल बनकर क्या करूँगा, मालिका का एक तन्तु, गीत का मैं एक स्वर हूँ, पूज्य माँ की अर्चना का एक छोटा उपकरण हूँ..।। विद्यार्थी परिषदेतून घडलेला कार्यकर्ता पुढे भारतीय जनता पार्टीला तळागाळात पोहचवत आपल्या शरीराचा कणन् कण भारतमातेसाठी झिजवत भारतमातेच्या चरणी लीन झाला! स्वर्गीय रामदासजींना भगवंत सद्गती प्रदान करो, ही प्रार्थना!

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।**
**ॐ शांती शांती शांती!**

## वेध

नीलेश जोशी

# 'त्यांचे' जीवन दुसऱ्याच्या रक्तावर

नवदाम्पत्याच्या जीवनातील सर्वांत सुखद क्षण असतो तो चिमुकल्याच्या आगमनाची वार्ता. नवीन पाहुणा घरात येण्याची चाहूल लागताच कुटुंबीयांच्या मनातील आनंदाची तर मोजदाद करता येत नाही. त्याच्या येण्यापूर्वीच विविध स्वप्ने रंगविली जातात आणि त्याच्या येण्याची आतुरता क्षणाक्षणाने वाढत असते. ज्या क्षणी त्याचे, तिचे आगमन होते तो क्षण तर आई-वडील झालेल्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण. मग पुढील काही महिने शिशूच्या बाललीलांमध्ये कसे संपतात ते देखील कळत नाही. पण हा आनंद अनुभवत असतानाच दुर्दैवाने काहींच्या वाटेला दुःख येते. सतत आजारी पडणाऱ्या चिमुकल्याला झाले तरी काय असा प्रश्न उपस्थित राहतो आणि ज्या वेळी वैद्यकीय निदान होते त्यावेळी मात्र त्यांची स्थिती आभाळ कोसळल्यागत होते. कारण वैद्यकीय अहवालात त्याला 'थॅलेसेमिया' आजाराचे निदान झाले असते. 'थॅलेसेमिया' हा रक्ताचा आनुवंशिक आजार आहे. हा आजार असणाऱ्या रुग्णाला जीवनभर दुसऱ्याच्या रक्ताच्या भरवशावर जगावे लागते. रक्तातील विकृतीमुळे 'थॅलेसेमिया' रुग्णाच्या शरीरात हिमोग्लोबिनची निर्मिती होत नाही. खरं म्हणजे ही एक मोठी राष्ट्रीय समस्या आहे. अन् त्यातही या विकाराबाबतची अनभिज्ञता आणि त्याचे उच्चाटन करण्याची उदासीनता त्यामुळे दिवसेंदिवस या विकारग्रस्तांची संख्या वाढत आहे. ही चिंतेची बाब आहे.

थॅलेसेमिया हा एक प्रकारचा आनुवंशिक पंडुरोग आहे. थॅलेसेमिया मायनर आणि थॅलेसेमिया मेजर असे दोन प्रकार या आजाराची असतात. त्यात मायनर असणारी व्यक्ती सामान्य जीवन जगते. तिला नियमित जीवन जगत असताना कुठलीही अडचण येत नाही. अगदी अमिताभ बच्चन, जॅकी श्रॉफ, हार्दिक पंड्या ही आपल्या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती थॅलेसेमिया मायनर असल्याचे सांगितल्यास कुणाला विश्वासही बसणार नाही. पण या आजारातील दुसरा प्रकार म्हणजे थॅलेसेमिया मेजर. या रुग्णाला मात्र असह्य शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागते आणि आधी उल्लेखिल्याप्रमाणे हा रुग्ण जीवनभर दुसऱ्याच्या रक्ताच्या भरवशावर जगतो. एवढेच नव्हे तर उपचार न केल्यास थॅलेसेमिया मेजर व्यक्ती अल्पायुषी ठरते. असे असताना देखील धक्कादायक म्हणजे भारतात दरवर्षी एक लाख थॅलेसेमियाग्रस्त बालके जन्माला येतात. एक नवीन थॅलेसेमियाग्रस्त जन्माला येणे म्हणजे कुटुंबावर, समाजावर, राष्ट्रावर आणि मुख्यतः राष्ट्रीय रक्तसेवेवर मोठा बोझा आहे आणि म्हणूनच थॅलेसेमिया समूळ नष्ट होण्याकरिता समाजातील प्रत्येक घटकाने विशेषतः तरुणांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कुणालाही थॅलेसेमिया मेजर विकार होऊच नये यासाठी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकाने लग्नापूर्वी स्वतःची थॅलेसेमिया तपासणी करणे, ही साधी रक्ताची तपासणी आहे. यात जर थॅलेसेमिया मायनर हा आजार आढळला तर त्या व्यक्तीने लग्न करताना थॅलेसेमिया मायनर असलेल्या व्यक्तीशी लग्न करू नये. काही अपरिहार्य बाबींमुळे जर लग्न करायचे ठरलेच तर गर्भधारणा झाल्यावर वैद्यकीय सल्ल्यानुसार उपाययोजना कराव्यात. ज्यात अपत्य थॅलेसमिया मेजर आजाराचे असणार नाही याची खात्री केली जाते. कारण थॅलेसेमिया मायनर दाम्पत्याला होणारे अपत्य थॅलेसेमिया मेजर विकार घेऊन जन्माला येण्याची दाट शक्यता असते.

वास्तविक थॅलेसेमिया मेजर रुग्णाच्या, त्यांच्या कुटुंबीयांच्या व्यथा अत्यंत वेदनादायी आहेत. नकळत्या वयातील मुला-मुलीला दर महिन्यात द्यावे लागणारे रक्त हा सर्वात मोठा प्रश्न असतो. या शारीरिक समस्येबाबत दुर्दैवाने समाज देखील वेगळ्या नजरेने पाहतो. अनेक वेळा त्यांना सहानभूती मिळते. पण नकळत्या वयात वेगळेपणाची जाणीवही होते. आई-वडील प्रत्येक क्षण या मुलांच्या आरोग्याच्या काळजीत असतात. म्हणूनच थॅलेसेमिया केवळ आजार नव्हे तर भावनिक आणि सामाजिक लढा देखील आहे. हा आजार होऊ नये यासाठी जशी रक्ताची तपासणी आवश्यक आहे तशीच याबाबत जनजागृती देखील महत्त्वाची आहे. ही जनजागृती व्यापक स्वरूपात होऊन प्रत्येक अविवाहित युवक, युवतींनी थॅलेसेमिया तपासणी करणे गरजेचे आहे. यासोबतच समाजात थॅलेसेमिया विकार असलेले रुग्ण देखील समाजाची जबाबदारी आहे यात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे या रुग्णांना नियमित लागणारे रक्त ही गरज पूर्ण करण्यासाठी विविध संस्था, संघटनांनी त्या रुग्णांचे रक्तपालकत्व स्वीकारणे आवश्यक आहे. ८ मे हा जागतिक थॅलेसेमिया दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसानिमित्त थॅलेसेमिया विकाराचे उच्चाटन करण्याचा संकल्प करू या.

९४२२८६२४८४

## वाचक पत्रे

### पाकिस्तानला आधी स्वतःच्या मरणाने मरू द्यावे

पहलगाम प्रकरणानंतर पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याबाबत देशप्रेमी जनतेकडून केंद्र सरकारवर दबाव वाढत आहे आणि ते स्वाभाविकही आहे. मात्र भारताने पाकिस्तानला आधी स्वतःच्या मरणाने मरू द्यावे. तिथे आता स्वतंत्र बलुचिस्तानच्या मागणीने नव्याने जोर धरला आहे. स्वतंत्र पख्तुनिस्तानची मागणीदेखील ७५ पेक्षा जास्त वर्षांहती जुनी आहे. जिये सिंध ही चळवळदेखील तितकीच जुनी असून सध्या सिंधमधील जनता पाकिस्तानातील (पश्चिम) पंजाबव्याप्त विरोधात रस्त्यांवर उतरली आहे. व्याप्त काश्मीरमध्येदेखील जुलमी राजवटीच्या विरोधात बंडाळी होतच असते. तेव्हा पाकिस्तानची शकले होऊन ते स्वतःच्या मरणाने मरणारच आहे. त्यानंतर भारताने शेवटचा घाव घालावा. मेलेल्याला आणखी मारू नये म्हणतात, पण पाकिस्तानच्या बाबतीत स्वतंत्र न्याय लावावा. मात्र भारताने कायम सज्ज राहावे. पाकिस्तानातील असंतुष्ट जनतेचे लक्ष इतरत्र वळविण्यासाठी पाकिस्तानी राज्यकर्ते जेव्हा भारताशी पंगा घेण्याचे दुःसाहस करतील, तेव्हाच त्यांचे कंबरडे मोडणे आवश्यक आहे. त्याआधी सिंधू पाणीकरारास स्थगिती, पाकिस्तानी नागरिकांना त्वरित भारत सोडून देण्याचा आदेश, इत्यादीबाबतची कारवाई होतच आहे. पाकिस्तानची आर्थिक आणि व्यापारविषयक, औषधविषयक कोंडी करण्यात येत आहेच. भारतात आता जी जनजागृती वाढली आहे, त्या वातावरणात देशातील पाकिस्तानबद्दल पुळका असलेले फेक्युलर फुरोगामी, हिंदू नावे धारण करणारे छुपे देशद्रोही, पाकिस्तानची भाषा बोलणारे विरोधी नेते, देशभरात पसरलेले अस्तनीतले निखारे या सर्वांची गठडी वळणे आवश्यक आहे. बाह्यशत्रूंचा बंदोबस्त होईलच, पण देशांतर्गत देशद्रोही शक्तींचा बीमोड या निमित्ताने करणे आवश्यक आहे.

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

### प्लॅस्टिकचा वापर घातकच


प्लॅस्टिकच्या पिशव्या व इतर गोष्टींची रोजच्या जीवनात खूप सवय झाली आहे. प्लॅस्टिक वजनाला हलके व वापरायला सोपे. परंतु प्लॅस्टिकचे परिणाम बघून समाज घाबरला. अनेक जनावरांच्या पोटातून प्लॅस्टिक पिशव्या काढल्यात. गरम पदार्थांसाठी वापरल्यास कर्करोग होतो. भाजी आणायला कापडाची पिशवी वापरू परंतु इतर गोष्टींचे काय? पूर्वी सकाळी उठून दुधासाठी भांडे किंवा बरणी घेऊन जात. तेलासाठी डबकी असायची. खेड्यांतील लोक काचेच्या बाटलीत रिगाबर अर्धा लिटर तेल आणायचे. बाटलीला दोरी बांधून ती हातात किंवा सायकलला अडकवीत. दुकानातून किराणामाल कागदात बांधून देत. खुपदा पुडी फुटत किंवा कागद फाटला तर सर्व किराणा माल एकत्र होत असे. भटक्या समाजातील लोक कपड्यात हळद, तिखट, बेसन बांधून ठेवत. त्यांच्या संसारात पुरचुंड्या असत. लग्नकार्यात कापडाच्या पिशवीत सुपारी, तिखट, दाणे वगैरे ठेवून त्यावर नावे लिहीत.

या पिशव्यांनी अनेक लग्नकार्ये पाहिली. लोणचे, तूप बरणीत. तांदूळ, डाळ वगैरे पोत्यांत. आमच्या वेळी गावाला जाताना फिरकीचा तांब्या किंवा मातीची सुरई. आता बिसलरी वॉटर बाटलीत मिळते. आपण ते वापरतो व फेकून देतो. कचरावेचे ते उचलून विकतात. खूपदा त्यात साधे पाणी असते. खूपदा या पाण्यात केस, माशी, नारू निघाला आहे. पुरचुंडीचा संसार प्लॅस्टिकमध्ये आला. परंतु या पिशव्यांचे जमिनीत मिसळून खत होत नाही. अचानक प्लॅस्टिकचे पेले, प्लेट, पिशव्यांचे वाईट परिणाम माहीत झाले. प्लॅस्टिकवर बंदी आली, दंड आकारण्यात आला. मेडिकल दुकानात कापडाच्या किंवा कागदाच्या पिशव्या वापरू लागले. प्लॅस्टिक मेडिकलसाठी वरदान ठरले आहे.

प्लॅस्टिकच्या इंजेक्शन सिरींजमुळे वापरा व फेका. त्यामुळे गरम पाण्यात उकळणे इन्फेक्शन वगैरेंची भीती राहिली नाही. प्लॅस्टिकचा चहाचा कप प्रकृतीला घातक असल्यामुळे खूप जण स्वतःजवळ कप ठेवून त्यात चहा, कॉफी पितात. प्रत्येक गोष्टीत चांगले-वाईट असते. म्हणून प्लॅस्टिक वापरताना योग्य विचार करावा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### हिंदी संपर्क भाषा म्हणून योग्य



मुलांना चौथीपर्यंत शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे. विषय पण तोच. घरी जी भाषा वापरली जाते, तिचं आकलन लवकर होते. पाचवीपासून इंग्रजी व हिंदी अनिवार्य असावे. उत्तर भारतातील राज्यात हिंदी भाषा वापरली जाते. एक संपर्क भाषा म्हणून ती आवश्यक आहे. ती शिकायला सोपी आहे. सर्वच प्रांतात असे केल्यास नोकरीनिमित्त परप्रांतात गेल्यावर प्रश्न निर्माण होणार नाही. असे मला वाटते. राज ठाकरे यांना यात काय समस्या आहे. त्यांना तर शिकायचं नाही. प्रत्येक गोष्टीत राजकारण करू नये. बघा पटतंय का?

**विभावरी नाईक**/९४२०८५५४७८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# सोलापूरकरांनी लुटला ऐतिहासिक स्थळे पाहण्याचा आनंद

## वारसा फाउंडेशन तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त उपक्रम

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

वारसा फाउंडेशन यांनी आयोजित केलेल्या ऐतिहासिक सहलीत सावरगाव येथील जैन मंदिर, खुंटेवाडी येथील सातवाहन काळातील जकातीचा राझंण , धामणगावातील संत बोधले महाराज मंदिर, सात मुखी वैशिष्ट्यपूर्ण शिवलिंग,मंदिरयुक्त बारव उपळे दुमाला मधील जमिनीखाली शिवमंदिर पाहून सोलापूरकर अक्षरशः आश्चर्य चकित झाले

इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण पर्यटनाला चालना मिळावी म्हणून स्थापन केलेल्या वारसा फाउंडेशन च्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त सावरगाव, काटी, खुंटेवाडी धामणगाव ,वैराग ,उपळे दुमाला येथील वारसा स्थळे पाहण्यासाठी ऐतिहासिक सहल आयोजित केली होती.या ऐतिहासिक सहलीमध्ये ४० सोलापूरकर सहभागी झाले होते .

### जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास व्हावा

आपल्या सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक गावात ऐतिहासिक वारसा स्थळे आहेत.ते पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.त्या दुर्लक्षित स्थळांना विकास झाला पाहिजे.लोक प्रतिनिधींनी पर्यटकांनास चालना देण्यासाठी निधी दिला पाहिजे.

**-नितीन अणवेकर, संस्थापक अध्यक्ष वारसा फाउंडेशन सोलापूर**

सहलीचा प्रारंभ सावरगाव येथील मातीच्या ढिगाऱ्याखाली दडलेल्या जैन मंदिरापासून झाला मंदिर जैन धर्माचे २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ यांचे असून मंदिरातील अधातरी असलेली भगवान नेमीनाथ मूर्ती विलोभनीय आहे त्यानंतर काटी येथील मज्जिद, बारव, देशमुखांची गढी,तुळजाभवानी देवीच्या नावाचा प्रथम उल्लेख असलेला शिलालेख, नीलकंठेश्वर मंदिर, पाहिल्यानंतर खुटेवाडी येथील सातवाहन काळातील दगडी राझंण, धामणगाव येथील माणकोजीराव बोधले यांचे मंदिर, बोधले महाराजांचा वाडा, वाड्यातील धान्य कोठार तुळशी वृंदावन, विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती ,तसेच सातमुखी वैशिष्ट्यपूर्ण शिवलिंग पाहून उपळे धुमाला येथील जमिनीखाली महादेव मंदिराचे अवलोकन पर्यटकांनी केले. त्या मंदिरातील शिवलिंगाच्या खालील भाग पोकळ असून त्यातून सतत जल प्रवाह वाहत असतो.त्यामुळे पावसाळ्यात येथे पाणी असते गर्भगृह देखील पाण्याने भरते उन्हाळ्यात मात्र या वैशिष्ट्यपूर्ण शिवलिंगाचे जवळून दर्शन झाल्यामुळे पर्यटकांनी समाधान व्यक्त केले मंदिर पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले त्यानंतर वैराग येथील संतनाथ मंदिर, तसेच निंबाळकरांची गढी, हत्ती बांधण्याची जागा ,तसेच ऐतिहासिक कमानी पाहून ऐतिहासिक सहलीतील सदस्य सोलापूरला परतले

वारसा फाऊंडेशनच्या वतीने संशोधक नितीन अणवेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. ऐतिहासिक सहलीस आशिष मोरे,सिद्धार्थ परिट,विकास शिंदे यांचे सहकार्य लाभले.




# लाईटच्या खांबाला खासगी बसची धडक

## सात रस्ता येथील घटना

## चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल**

सात रस्ता येथील संगमेश्वर कॉलेजच्या लेडील हॉस्टेलसमोरील हायमास्ट दिव्याच्या खांबाला धडक देणाऱ्या खासगी बसच्या चालकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**सोलापूर : सात रस्ता परिसरात प्रवासी बसचा ब्रेक फेल झाल्याने बस विजेच्या खांबाला धडकली. चालकाच्या सतर्केतेमुळे मोठा अनर्थ टळला. (छायाचित्र : केवल तिवारी)**

याबाबत प्रणोती राजकुमार कदम (वय ३२, रा. भिमाई नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन चालक भैरूनाथ गणपत शिंदे (वय ३६, रा. संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० एप्रिल रोजी सकाळी दहाच्या सुमारास भैरूनाथ शिंदे याने त्याच्या ताब्यातील खासगी बस क्र. एमएच ४३ एच २४७८ ही मसीहा चौकाकडून रंगभवनच्या दिशेने जाताना निष्काळजीपणे चालवून सात रस्ता येथील संगमेश्वर कॉलेजच्या लेडीज हॉस्टेलसमोरी महापालिकेच्या हायमास्ट लाईटच्या खांबास जोरदार धडक दिली. त्यामध्ये ६० हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस नाईक माडे पुढील तपास करीत आहेत.

## दिलीप सोपल ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित पांगरी ता. बार्शी
## स्थावर मालमत्तेचा ताबा घेतल्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी मला प्राप्त म.स.सं. कलम १५६ च्या अधिकारानुसार भी गोपीचंद अरूण तुकशेट्टि, विशेष वसुली व विकी अधिकारी दिलीप सोपल ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित पांगरी ता. बार्शी यांच्या खालील थकबाकीदारास म.स.सं.अधिनियम १०६०, नियम १९६१ अन्वये मागणी नोटीसद्वारे त्यांच्याकडिल येणे रक्कमा भरण्यास कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खालील निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी म.स.सं.नि. १९६१ मधिल नियम १०७ (१०) व १०७ (११) (ड) (१) नुसार रितसर बोजा नोंद करून डोड नोटीसद्वारे सिम्बॉलिक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विकी, गहान, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो दिलीप सोपल ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित पांगरी ता. बार्शी यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, फेडरेशन अंशदान, वसुली अनुशंगिक खर्चास कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ.नं | कर्जदार/जामिनदार | मिळकतदार | दाखला क्रमांक व दिनांक | झेड नोटीस र.रु. ३०/०४/२५ अखेर | मिळकत ठिकाण | मिळकत क्रमांक | क्षेत्र | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गणेश भिमराव विधाते<br>अबुबकर दगडु फकिर<br>गनी दगडु शेख | गणेश भिमराव विधाते | १२१०/२०२४ | १,३२,६५० | कारी | १२२२/३ | ०/२० आर पैकी हिश्याचे | ३०/०४/२०२५ |
| २ | रवि बाळासाहेब बोडके<br>रमजान बक्षुसाहेब पटेल<br>अबुबकर दगडु फकिर | बाळासाहेब अभिमन्यु बोडके | १२१५/२०२४ | १,३६,५३९ | कारी | ३७० | ०/४१ आर पैकी हिश्याचे | ३०/०४/२०२५ |

ही ताबा नोटीस दिली असे.
दिनांक : ३०/०४/२०२५

शिक्का

सही/-
विशेष वसुली व विक्री अधिकारी
दिलीप सोपल ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. पांगरी

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **SWETA RAJENDRA HATTI** has been changed to new name **SHWETA RAJENDRA HATTI**
**Affidavit No. 337, dated. 30/04/2025.**
Kindly Note the same.

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंदिरा गांधी स्टेडियम, चार पुतळा पाठीमागे, सोलापूर-४१३००१
क्रीडा कार्यालय सोलापूर, दुरध्वनी क्र.०२१७-२९०६०४
E-Mail ID - smcspoartoffice@gmail.com

जा.क्र./क्रीडा/४५ दिनांक ३०/०४/२०२५

**प्रथम फेर-ई-निविदा - जाहिर प्रसिध्दीकरण**

**ई-निविदा सुचना क्र. २०२५-२६**

सोलापूर महानगरपालिका सोलापूर क्रीडा कार्यालयाकडील श्री मार्कंडेय जलतरण तलाव सोलापूर येथील जलतरण तलाव अभिकर्तामार्फत भाडे तत्वावर ३६ महिने करिता देणे कामी ई-निविदा ही केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना व इतर शर्ती व अटी www.mahatenders.gov.in/ www.solapur muncipalcorporation.gov.in या संकेतस्थळावर दि. ०१/०५/२०२५ पासून पाहण्यासाठी उपलब्ध होत आहेत.

Tender ID : 2025_SMC_1175898_1

सही/- क्रीडाधिकारी
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी व आसपासचे लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, शहर बार्शी हद्दीतील मिळकती १) सि.स.नं.४१३०/अ/१ याचे क्षेत्रफळ १२२.७९ चौ.मी. २) सि.स.नं.४१३०/अ/२ याचे क्षेत्रफळ ६२.३७ चौ.मी. (समाईकातील वहीवाटीचे हक्कासह), ३) सि.स.नं.४१३०/अ/३ याचे क्षेत्रफळ ४१.१० चौ.मी., ४) सि.स.नं. ४१३०/अ/४ याचे क्षेत्रफळ १३६.४७ चौ.मी., ५) सि.स.नं.४१३०/अ/५ याचे क्षेत्रफळ ९.६६ चौ.मी. (समाईकातील वहीवाटीचे हक्कासह) या मिळकती एकास एक लगत असून त्याची एकत्रात चतुः सिमा पूर्वेस-सि.स.नं.४१३०/६ ची मिळकत, दक्षिणेस नगरपालिका रस्ता व सि.स.नं. ४१३०/अ जी, ४१३०/ब आणि सि.स.नं. ४१३०/क, पश्चिमेस सि.स.नं. ४०३०/ब, सि.स.नं. ४१३१/अ आणि सि.स.नं. ४१३२, उत्तरेस- सि.स.नं. ४१३३ ची जागा याचे वागणूक व पाणी दक्षिण बाजूचे रस्त्यास जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकती आतील सर्व बांधकाम आणि तदंगभूत वस्तुसह व मालकी, वहिवाटीचे हक्कासह.

सदर वर नमूद मिळकती ह्या १) सचिन शांताराम सहस्त्रबुध्दे, रा. पुणे, २) चेतन शांताराम सहस्त्रबुध्दे, रा. कासारवाडी रोड, बार्शी, ३) गिरीश शांताराम सहस्त्रबुध्दे, रा. पुणे यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची असून त्यानुसार सदर मिळकतीचे सिटी सर्व्हेचे उताऱ्यावर वर नमूद मालकांच्या नावाची मालकी, कब्जेवहिवाट सदरी नोंद असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीस आहे. वर नमूद मिळकती ह्या जागा मालकांनी आमचे अशिलांना विक्री करणेबाबत व्यवहार करून ठराव करून इसारादाखल रक्कम स्विकारलेली आहे व साठेखत लिहून दिलेले आहे. वर नमूद मालक यांनी सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलास दिलेला आहे. याउपरही वरील मिळकतीशी इतर कोणाचा खरेदीखत, साठेखत, कर्ज, इसार, इसारपावती, गहाण, दान, लिज, बोजा, वारसाहक्क, भाडेकरू हक्क, इजमेंटरी राईट इत्यादी प्रकारचा व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० (दहा) दिवसाचे आत त्यांनी खालील नमूद पत्त्यावर संपर्क साधून त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करुन द्यावी व पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाची तक्रार वा हरकत ना आलेस आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, असल्याचे प्रामाणिकपणे गृहीत धरुन तसेच कोणाचेही काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वरील मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील नंतर मागाहून कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता.२९/०४/२०२५.

सही/-
ॲड. सरफराझ मुश्ताक मुजावर
बी. ए. एल एल. बी.
ऑफीस बनाळे बिल्डींग, आशा टॉकीज जवळ, बार्शी, ता. बार्शी खरेदीदार
अशिलातर्फे ॲडव्होकेट

Classifieds

**नोकरीविषयक**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीणमध्ये**
**संपर्क : ९८५०७०२१७०**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# जिल्हा युवा पुरस्कार प्रसाद खोबरे यांना जाहीर

**सोलापूर दि.३० एप्रिल -**

सन २०२४-२५ या वर्षातील जिल्हा युवा पुरस्कार सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ठ कामगिरी करणारे शेळगी नवकल्याण नगर रविवार पेठ येथील प्रसाद श्रीहरी खोबरे यांना जिल्हा क्रीडा अधकिारी नरेंद्र पवार यांनी जाहीर केला आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या मार्फत दरवर्षी जिल्हयातील सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या युवकांना महाराष्ट्र दिनी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहनाच्या मुख्य कार्यक्रमामध्ये हा पुरस्कार देण्यात येतो. दहा हजार रुपये रोख प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

श्री. खोबरे यांचे शिक्षण एम.एस.सी. असून सन २०१५ पासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून आजपर्यंत स्व परिवर्तनातून समाज परिवर्तन या ध्येयाने समाजाप्रती असलेले उत्तर दायित्व पार पाडत आहेत. समाजातील दुर्बल वंचित उपेक्षित घटक यांना वैदयकीय मदत करणे. गरजूंची गरज त्याच्या उपयोगासाठी असणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे. झोपडपट्टी भागातील विदयार्थ्यांना मोफत वहयांचे वाटप करणे. दरवर्षी ऑगस्ट महिन्यात महिलांची वैदयकीय तपासणी शिबीर राबविणे, महाराष्ट्रातील सांगली जिल्हयात उध्दभवलेल्या पूर परिस्थिती आपत्ती व्यवस्थापनात मदत कार्य करणे यासारख्या सामाजिक क्षेत्रातील कार्याचा मूल्यमांपन करण्यात आले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

सिव्हील एम. ए. नं. १६/२०२५
नि.६

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**१) यलप्पा सोमण्णा पुजारी**
रा. आंदेवाडी (ज.), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**२) चन्नम्मा विठ्ठल पुजारी**
रा. तोळणूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**३) रेवणसिध्द सोमण्णा पुजारी**
रा. आंदेवाडी (ज.), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही - सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं.१६/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र प्रमाणे दाखल केला असून यातील अर्जदार नं. १ ते ३ यांची आई कै. महादेवी सोमण्णा पुजारी ह्या दि.१९/०८/२०१९ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच मयत महादेवी सोमण्णा पुजारी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक १०/०६/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ३०/४/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट

# विहिरीत पडलेल्या सापाला मिळाले जीवदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

डब्लूसीएएसच्या सदस्यांमुळे ४० फुट विहिरीत पडलेल्या घोणस विषारी सापाला मिळाले जीवदान मिळाले.

मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी बाणेगाव येथे रहात असलेले रहिवाशी अस्मिता तोडकरी यांच्या शेतातील विहिरीत एक साप पडल्याची माहिती रेखा कांबळे यांनी डब्लूसीएएसचे सदस्य सुरेश क्षीरसागर यांना फोनकरून कळवली. क्षीरसागर आणि संतोष धाकपाडे मंगळवारी दुपारी अडीच वाजता त्या सापाचे रेस्क्यू करण्यासाठी निघाले. डब्लूसीएएसचे सदस्यांनी विहिरीजवळ गेल्यावर पाहणी केली. साधारण ४० फूट खोल विहीर होती आणि त्या विहिरीत घोणस प्रजातीचा साधारण तीन ते साडेतीन फूट लांबीचा विषारी साप होता. विहिरीत उतरणे खूपच अवघड होते. डब्लूसीएएसच्या सदस्यांनी आपली युक्ती लावून एक पन्नास फूट लांबीची दोरी घेतली त्या दोरीला एक झाडाचा फाटा कट करून बांधून त्या फाट्याला विहिरीत टाकण्यात आले. साधारण दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर तो साप झाडाच्या फाट्यावर येऊन बसला. तो घोणस साप झाडाच्या फाट्यावरती येऊन बसल्यावर अलगदपणे त्या दोरीला आणि फाट्याला ओढत बाहेर काढले. त्या घोणस सापाला कोणत्याही प्रकारची इजा न होता सुखरूप पणे विहिरीतून बाहेर काढले आणि सोबत आणलेल्या एका कापडी पिशवीमध्ये त्या सापाला बंद केले.

घोणस साप विहिरीत पडल्यामुळे शेतकऱ्यांनी ते पाणी उपसून काढायचं ठरवले होते. कारण त्या सापाने त्या पाण्यामध्ये विष सोडले का असा त्यांचा भ्रम होता. डब्लूसीएएस च्या सदस्यांनी त्या शेतकऱ्यांना समजावून सांगितले की कोणताही साप, प्राणी, पक्षी जर त्या विहिरीमध्ये पडला असेल तर ते पाणी दूषित होत नाही किंवा साप विष सोडल अस नाही होत. त्या शेतकऱ्यांच्या मनामधून डब्लूसीएएस च्या सदस्याने गैरसमज दूर केला.

घोणस सापाला विहिरीतून काढल्यानंतर अवघ्या तीस मिनिटांच्या आतच त्या सापाला जवळच काही अंतरावर निसर्गाच्या सानिध्यात सोडून देण्यात आले. यावेळी डब्ल्यूसीएएस चे सदस्य सुरेश क्षीरसागर, संतोष धाकपाडे व शेतकरी बांधव आदीचे सहकार्य केले.

## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (यापूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड हे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 84885778 | मालमत्तेवर कर्ज | १. ऋषिराज डार्लिंग मोरे<br>२. वंदना डार्लिंग मोरे | 09/04/2025 | रुपये 4,95,905.86/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १९ चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण परिसर २५०० चौरस फूट, ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थितः चाळे, उपविभागः पंढरपूर, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि **पूर्व** : रस्ता, **पश्चिम** : शाळा व्यायाम, **उत्तर** : जगन्नाथ मोरे क्षेत्र, **दक्षिण** : रस्ता | | | | | |
| 2 | 101030851 | मालमत्तेवर कर्ज | १. सर्जेराव दिलीप मोरे<br>२. छाया दिलीप मोरे | 09/04/2025 | रुपये 5,13,250.14/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायतीचा सर्व तुकडा आणि पार्सल मिळकत क्रमांक ९१२/१, ५२८० चौ. फूट, ग्रामपंचायत मुंढेवाडीच्या हद्दीत स्थित, उपविभाग : पंढरपूर, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि **पूर्व** : रस्ता, **पश्चिम** : नानासो मोरे यांचे घर क्षेत्र, **उत्तर** : कांतिलाल मोरे यांचे घर क्षेत्र, **दक्षिण** : अनिल मोरे यांचे घर क्षेत्र. | | | | | |
| 3 | 97655898 | मालमत्तेवर कर्ज | १. शामीर शरीफ इनामदार<br>२. शबाना समीर इनामदार | 09/04/2025 | रुपये 5,16,290.77/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ९२६७ चे सर्व तुकडा आणि पार्सल, २८०८ चौ. फूट., ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थितः सरकोली, उप-विभागः पंढरपूर, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमाः **पूर्व** : मकबुल लतीफ इनामदार, **पश्चिम** : संजय श्रीकृष्ण भोसले, **उत्तर** : आदम लतीफ इनामदा, **दक्षिण** : रोड | | | | | |
| 4 | 120878810 | मालमत्तेवर कर्ज | १. सूरज हरी मदने<br>२. संध्या सुरज मदने | 09/04/2025 | रुपये 7,30,037.52/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** मालमत्ता क्रमांक ४०५ असलेल्या निवासी घराचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ, दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = १८००.०० चौ. फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ १८००.०० चौ. फूट, गावात स्थित : पुलुज, पोस्ट : पुलुजवाडी, ता.: पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा **पूर्व** : अण्णासो महादेव मदने यांची मालमत्ता, **उत्तर** : रस्ता, **पश्चिम** : अंगणवाडी, **दक्षिण** : रस्ता. | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

दिनांक : ०१/०५/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

उपनिबंधक सह. संस्था सोलापूर शहर सोलापूर
सिटी सर्व्हे नं.८४१३, दुसरा मजला जुने जिल्हाधिकरी कार्यालय आवार, सोलापूर-४१३००३

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व त्याखालील नियम १९६१ चे नियम ८६ (६) अन्वये

**जाहीर समन्स**

**शाहीर अमर शेख नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर दत्त नगर, सोलापूर --- अर्जदार**
**विरूध्द**
**(खाली तपशिलात नमुद केलेले थकबाकीदार सभासद) --- जाब देणार**

| अ.क्र | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ३११७/२०२४ | ५३१६४/- | १ | **सुरेश नागनाथ महिंद्रकर** रा.: २३७, भारतरत्न इंदिरा नगर, ७० फुट रोड, सोलापूर-४१३००३ |
| | | | २ | **परमेश्वर जंबय्या बंडा** रा.: ३४५/९, गड्डम वाडा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर - ४१३००६ |
| | | | ३ | **प्रमिला परमेश्वर बंडा** रा.: ३४५/९, गड्डम वाडा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर - ४१३००६ |
| २ | ३११६/२०२४ | ६७६१४/- | १ | **प्रमिला परमेश्वर बंडा** रा.: ३४५/९, गड्डम वाडा,न्यु पाच्छा पेठ, सोलापूर - ४१३००६ |
| | | | २ | **परमेश्वर जंबय्या बंडा** रा.: ३४५/९, गड्डम वाडा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर - ४१३००६ |
| | | | ३ | **सुरेश नागनाथ महिंद्रकर** रा.: २३७, भारतरत्न इंदिरा नगर, ७० फुट रोड, सोलापूर-४१३००३ |
| ३ | ३१२१/२०२४ | ५४५२६/- | १ | **परमेश्वर जंबय्या बंडा** रा.: ३४५/९, गड्डम वाडा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर -४१३००६ |
| | | | २ | **प्रमिला परमेश्वर बंडा** रा.: ३४५/९, गड्डम वाडा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर - ४१३००६ |
| | | | ३ | **सुरेश नागनाथ महिंद्रकर** रा.: २३७, भारतरत्न इंदिरा नगर, ७० फुट रोड, सोलापूर -४१३००३ |
| ४ | ३११८/२०२४ | १७४४८९/- | १ | **झाकिर उल्फतहुसेन शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| | | | २ | **आतिया झाकिर शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| | | | ३ | **शबाना सादिक शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| ५ | ३११९/२०२४ | १२६६४७/- | १ | **शबाना सादिक शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| | | | २ | **आतिया झाकिर शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| | | | ३ | **झाकिर उल्फतहुसेन शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| ६ | ३१२०/२०२४ | ९६०५७/- | १ | **आतिया झाकिर शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| | | | २ | **शबाना सादिक शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |
| | | | ३ | **झाकिर उल्फतहुसेन शेख** रा.: ६८बी, सहारा हॉल-१, होटगी रोड सोलापूर |

यात अर्जदार पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाबदार त्यांचे राहते पत्त्यावर सुनावणी नोटीस पाठविली असताना त्या व्यक्ती सदर पत्त्यावर राहत नसल्याने अथवा घर बंद असल्याचे नमुद करून नोटीस परत आली आहे, तरी सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, उपनिर्दीष्ट अर्जसंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः अभवा वकिलामार्फन दिनांक १३/०५/२५ रोजी दुपारी १२.३० वाजता कागदपत्रांसह **उपनिबंधक सहकारी संस्थो सोलापूर शहर सोलापूर सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला जुना जिल्हाधिकारी आवार सोलापूर - ४१३००३** येथे हजर राहावे या नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दि. २९/४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्देसह जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
उपनिबंधक सहकारी संस्था
सोलापूर शहर सोलापूर

www.tarunbharat.net
तरुण भारत




## महत्त्वाचे

### इटालियन ओपनमधून जोकोविचची माघार



**रोम** : तीन सामन्यांतील पराभवाच्या मालिकेनंतर सर्बियाच्या नोवाक जोकोविचने इटालियन ओपन टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. या निर्णयामुळे जोकोविच आपल्या २५ व्या ग्रॅण्ड स्लॅम चषक व एकूण १०० व्या स्पर्धेतील विजेतेपदाच्या शोधात असताना आगामी फ्रेंच ओपन स्पर्धेत किती चांगले खेळू शकेल याबद्दल शंका निर्माण झाली आहे. रोममधील पुढील महिन्यात होणाऱ्या क्ले-कोर्ट स्पर्धेत, जोकोविच सहभागी होणार नाही असे समाजमाध्यमावर पोस्ट केले. नोले असे त्याच्या टोपणनावाने ३७ वर्षीय सर्बियन स्टारचा उल्लेख असलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, पुढच्या वर्षी भेटू. जोकोविचला या हंगामात संघर्ष करावा लागला आहे. तो केवळ १२-६ असा विजय मिळवत आहे आणि त्याने आपल्या मागील सलग तीन स्पर्धा गमावल्या आहेत, यात मियामी ओपन, मॉण्टे कार्लोस मास्टर्स आणि माद्रिद ओपनचा समावेश आहे. स्पेनमध्ये मॅटेओ अर्नाल्डीकडून ६-३, ६-४ असा पराभव पत्करल्यानंतर जोकोविच म्हणाला होता की, २० वर्षांहून अधिक काळ व्यावसायिक टेनिसमध्ये मला जे अनुभवायला मिळाले त्यापेक्षा ही भावना पूर्णपणे वेगळी आहे. कोर्टवर अशा प्रकारच्या संवेदनांना तोंड देणे माझ्यासाठी मानसिकदृष्ट्या एक आव्हान आहे.

### अल-अहली आशियाई लीगच्या अंतिम फेरीत

**जेद्दाह** : अल-अहलीने अल-हिलालला ३-१ असे हरवून आशियाई चॅम्पियन्स लीगच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अल-अहलीच्या गृहनगरातील किंग अब्दुल्ला स्पोर्ट्स सिटी स्टेडियमवर ५० हजारहून अधिक चाहत्यांसमोर संपूर्ण सौदी अरेबियाचा उपांत्य सामना खेळवण्यात आला. रविवारी होणाऱ्या अंतिम फेरीत अल-अहलीची लढत सौदी अरेबियाचाच अल-नासर आणि जपानचा कावासाकी फ्रोंटेल यांच्यादरम्यानच्या सामन्यातील विजेत्याशी होईल. अल-अहली हा चांगला संघ होता, असे अल-हिलालचे प्रशिक्षक जॉर्ज जिझस म्हणाले. हा दोन चांगल्या संघांमधील सामना होता आणि आम्हाला खेळात काही चांगले कालावधी मिळाले असले तरी त्यांनी आमच्यापेक्षा चांगली कामगिरी केली, असेही ते म्हणाले. २०२३ मध्ये लिव्हरपूलहून क्लबमध्ये सहभागी झालेल्या फर्मिनोने गोल केला, त्यामुळे अल-अहलीला गोल करण्यास केवळ नऊ मिनिटे लागली. अर्ध्या तासापूर्वी, मॅन्चेस्टर सिटीचा माजी आक्रमक खेळाडू रियाद महारेझने इंग्लंडच्या टोनीला मदत केली व संघाला २-० असे आघाडी मिळवून दिली.

# राजस्थानचे मुंबईची घोडदौड रोखण्याचे लक्ष्य

**◆ जयपूर, ३० एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये गुरुवारी येथील सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सची विजयी घोडदौड रोखण्याचे ध्येय उराशी बाळगून राजस्थान रॉयल्स नव्या जोमाने मैदानात उतरणार आहे.

सध्या हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स दहा सामन्यांपैकी सहा सामने जिंकून १२ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे, तर संजू सॅमसनचा राजस्थान दहापैकी तीन सामने जिंकून ६ गुणांसह आठव्या स्थानावर आहे.

सोमवारी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने स्पर्धेतील सर्वोत्तम खेळी केल्यामुळे राजस्थान रॉयल्सला आयपीएलच्या गमावलेल्या संधींमध्ये आशेचा किरण सापडला आहे. यजमान संघाला अजूनही प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्याची गणितीय संधी आहे, परंतु व्यवस्थापनाने त्याचे नशीब स्वीकारले आहे. कर्णधार संजू सॅमसनला झालेल्या साईड स्ट्रेनमुळे सूर्यवंशीच्या पदार्पणाचा मार्ग मोकळा झाला आणि क्रिकेट जगताचा चर्चेचा विषय होण्यासाठी त्याला केवळ तीन डाव खेळावे लागले. सॅमसन शेवटचा सामना १६ एप्रिल रोजी खेळला होता व त्याच्या पुनरागमनाबद्दल कोणतीही स्पष्टता नाही, त्यामुळे सूर्यवंशी व यशस्वी जयस्वाल पुन्हा डावाची सुरुवात करू शकतील. गुजरात टायटन्सविरुद्धच्या आपल्या १६६ धावांच्या सलामी भागीदारीमुळे त्यांना २१० धावांचे लक्ष्य उभारता आले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेच्या गोलंदाजांना आव्हान दिल्यानंतर, जसप्रीत बुमराहविरुद्ध सूर्यवंशी कसा खेळतो हे बघणे मनोरंजक ठरेल. खालच्या क्रमात, शिमरॉन हेटमायरवर दबाव असेल, कारण या हंगामात तो फॉर्मात नाही व खेळपट्ट्या सुद्धा संथ झाल्या आहेत.राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांना अर्थात जोफ्रा आर्चर व संदीप शर्माला अधिक प्रभावीपणे आपले कर्तव्य बजवावे लागणार आहे.



वैभव सूर्यवंशी-जसप्रीत बुमराह जुगलबंदी

हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सला क्रमवारीत अव्वल स्थानाकडे मार्गक्रमण करणसाठी जसप्रीत बुमराहची चांगलीच मदत झाली आहे. सतता संथ गतीने सुरुवात करणाऱ्या मुंबई इंडियन्सने आता उसळी घेत पाच विजय मिळवले आहेत. त्यांची विजयी घोडदौड थांबवता येणार नाहीत असे दिसते, परंतु राजस्थानने त्यांना रोखण्याचे आव्हान स्विकारले आहे.

'ही स्पर्धा खूप कठीण आहे. आगेकूच करण्यासाठी आम्हाला चांगले क्रिकेट खेळावे लागेल, त्यासाठी नेहमीच तयारी करावी लागेल व विजयाची लय कायम ठेवावी लागेल, असे हार्दिक पांड्याने लखनौवर विजय मिळवल्यानंतर म्हटले होते.

गत सामन्यात पदार्पण करणाऱ्या कॉर्बिन बॉशची कामगिरी ही एक सकारात्मक बाब होती. त्याने २००च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या आणि एक बळी टिपला.

सूर्यकुमार यादव व रोहित शर्मासारखे खेळाडू आपल्या सर्वोत्तम कामगिरीसह मुंबई इंडियन्सला योग्य वेळी शिखरावर पोहोचत असल्याचे दिसून येत आहे, हे एक अशुभ संकेत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**राजस्थान रॉयल्स वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ** : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



हार्दिक पांड्या



संजू सॅमसन

# प्रज्ञानंदची जोरदार मुसंडी; दुसऱ्या स्थानावर झेप

### सुपरबेट रॅपिड आणि ब्लिट्झ

**◆ वॉर्सा (पोलंड), ३० एप्रिल**

ग्रॅण्ड चेस टूरचा भाग असलेल्या सुपरबेट रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धेत ब्लिट्झ विभागात भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदाने वाईट सुरुवातीतून जोरदार मुसंडी मारली आणि एकूण क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली.

प्रज्ञानंदाच्या प्रयत्नांमुळे तो दुसऱ्या दिवसाच्या खेळात चांगला राहिला. रॅपिड बुद्धिबळाच्या पहिल्या दोन दिवसांत या भारतीय खेळाडूने चांगली कामगिरी केली नव्हती, परंतु ब्लिट्झ विभागात त्याने कौशल्ये दाखवून जोरदार मुसंडी मारली. प्रत्येक खेळासाठी केवळ पाच मिनिटे आणि प्रत्येक चालीनंतर तीन सेकंदांची वाढ देऊन, प्रज्ञानंदाने आपले नेहमीचे गुंतागुंतीचे खेळ खेळले आणि सलग तीन विजयांसह शेवट केला.

त्याने सुरुवात रोमानियाच्या डीक बोगदान-डॅनियल आणि अमेरिकेच्या लेव्हॉन आरोनियन यांच्याकडून पराभवाने केली होती परंतु नंतर त्याने फ्रान्सच्या फिरोजा



अलिरेझा आणि मॅक्सिम वाचियर-लाग्राव्ह यांना हरवून सावरले. शेवटच्या तीन फेऱ्यांमध्ये प्रज्ञानंदाने माजी विश्वविजेत्या बल्गेरियाच्या वेसेलिन टोपालोव्ह, अरविंद आणि रोमानियाच्या डेव्हिड गॅव्हिलेस्कू याच्यावर मात केली व नऊ सामन्यांतून ५.५ गुण मिळवले.

भारतीय ग्रॅण्डमास्टर अरविंद चिदम्बरम् थोडासा निराश झाला आणि नऊ सामन्यांमधून केवळ ३.५ गुण मिळवू शकला. त्याला स्लोव्हेनियाचा व्लादिमीर फेडोसेव्हकडून पराभवाचा सामना करावा लागला. आता फेडोसेव्ह दुसऱ्या स्थानावर असलेल्या प्रज्ञानंदापेक्षा ३.५ गुणांनी आघाडीवर आहे. अरविंदने पहिल्या चार सामन्यांमधून २.५ गुणांसह सुरुवात केली आणि नंतर शेवटच्या पाच सामन्यांमधून केवळ एक गुण मिळवू शकला. ◂(वृत्तसंस्था)

# भारत-ऑस्ट्रेलिया महिला हॉकी कसोटी मालिका आजपासून



ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या हॉकी मालिकेसाठी भारतीय संघ सज्ज

**◆ पर्थ, ३० एप्रिल**

भारतीय महिला हॉकी संघ गुरुवारपासून येथे सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत आपले सर्वोत्तम संयोजन खेळवेल व काही बचावात्मक कमतरता दूर करेल. मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंह जूनमध्ये होणाऱ्या एफआयएच प्रो-लीग सामन्यांसाठी आपला मुख्य गट ओळखण्याची आशा बाळगतील.

ऑस्ट्रेलिया अ संघाकडून सलग दोन पराभवांसह दौऱ्याची सुरुवात केल्यानंतर, भारत अधिक मजबूत कामगिरीसह पुनरागमन करण्यास उत्सुक असेल.

पहिल्या दोन सामन्यांमध्ये बहुतेक खेळाडूंना खेळण्याची संधी मिळाली आहे व आता आम्ही खेळाडूंमधील सर्वोत्तम संयोजन वापरून पाहू, असे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी म्हटले आहे.

मी याची उत्सुकता बाळगत आहे, कारण अशा प्रकारे आम्ही युरोपमधील आगामी प्रो-लीग सामन्यांमध्ये स्पर्धा करू शकणाऱ्या खेळाडूंची ओळख पटवतो.

पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषकात जाण्यापूर्वी नवीन मुलींनी किमान ३५ सामने खेळले पाहिजेत. अशा स्पर्धांची तयारी करताना आपण हेच ध्येय लक्षात ठेवतो, असे ते पुढे म्हणाले.

भारत पहिल्या सामन्यात ३-५ असा पराभव पत्करावा लागला आणि दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध २-३ असा पराभव पत्करावा लागला. असा निकाल असूनही प्रशिक्षक संघाच्या प्रयत्नांबद्दल उत्साहित होते.

दोन्ही सामन्यांमध्ये आम्ही काही सोपे गोल गमावले व ते निराशाजनक होते, परंतु त्याशिवाय आम्ही खूप स्पर्धात्मक राहिलो आहोत. ही एक कसोटी मालिका आहे म्हणून ती जिंकणे किंवा हरणे याबद्दल नाही, ती अनुभवाबद्दल आहे, असे प्रशिक्षक म्हणाले.

संघातील काही खेळाडू पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी देशाबाहेर आले आहेत. या तरुणांना खेळण्याची संधी देत आहे जेणेकरून ते पुढची पिढी होण्यासाठी तयार असतील, असे ते म्हणाले.

सलीमा टेटे हिच्या नेतृत्वाखालील भारताच्या २६ सदस्यीय संघाला आता गुरुवार, शनिवार आणि रविवारी पुढील तीन सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाच्या वरिष्ठ संघाविरुद्ध मोठे आव्हान असेल. कौरच्या साथीला यांच्या उपकर्णधार नवनीत कौर असेल.

दोन्ही संघ शेवटच्या वेळी खेळले तेव्हा भारताने २०२३-२४ च्या एफआयएच हॉकी प्रो-लीगमध्ये १-० असा विजय मिळवला होता आणि तोही असाच निकाल मिळविण्याचा प्रयत्न करेल.

प्रत्येकजण आपले मन लावून काम करत आहे आणि संघात निरोगी स्पर्धा आहे. महिमा टेटे गतिमान, जलद आहे. पूजा, सुजाता, अजमिना आणि इतर सर्व तरुण खेळाडू मेहनत घेत आहे. ◂(वृत्तसंस्था)




पदक विजेता भारतीय मुष्टियोद्धे

# भारत २५ पदकांसह अव्वल

### आशियाई कनिष्ठ गट मुष्टियुद्ध

**◆ अम्मान, ३० एप्रिल**

येथे आयोजित १५ व १७ वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताने १९ सुवर्णपदकांसह एकूणे २५ पदके जिंकून पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे.

भारतीय महिलांनी १५ वजनी गटात १० सुवर्ण व चार कांस्यपदके जिंकलीत. प्रत्येक वजनी गटाच्या अंतिम लढती जिंकून भारतीय खेळाडूंनी आपले वर्चस्व गाजविले.

मुलींच्या १५ वर्षांखालील गटातील लढतीत कोमलने (३०-३३ किलो) कझाकस्तानच्या अय्यारू ओंगगारबेकवर ३-२ च्या फरकाने सहजतेने केली. त्यानंतर खुशी अहलावतने (३५ किलो) आपल्या प्रतिस्पर्ध्याला ४-१ ने हरवले. तमन्नाने (३७ किलो) दुसऱ्या फेरीत आरएससी जिंकून आपले स्थान निश्चित केले.

स्वी (४० किलो), मिल्की मीनम (४३ किलो), प्रिन्सी (५२ किलो), नव्या (५८ किलो), सुनैना (६१ किलो), तृष्णा मोहिते (६७ किलो) व वंशिका (७०+ किलो) या सर्वांनी आपापल्या लढती एकमताने जिंकल्या आणि मुलींच्या १५ वर्षांखालील संघाच्या अंतिम फेरीत क्लीन स्वीप केला.

चार भारतीय मुलांनी अंतिम फेरीत भाग घेतला. संस्कार विनोद (३५ किलो) साठी एका सुवर्णपदकाशिवाय तिघांनी रौप्यपदक जिंकले, त्यामुळे पूर्वीच्या सात कांस्यपदकांमध्ये भर पडली. अंतिम फेरीपूर्वी भारताने ४३ पदके निश्चित केली होती, यात १५ वर्षांखालील गटात २५ आणि १७ वर्षांखालील गटात १८ पदके समाविष्ट आहेत.

रुद्राक्ष सिंग खैदेम (४६ किलो), अभिजीत (६१ किलो) आणि लक्ष्य फोगट (६४ किलो) यांनी अनुक्रमे युक्रेन, उझबेकिस्तान आणि इराक विरुद्ध रौप्यपदक जिंकले.

आता ११ व्या दिवशी होणाऱ्या १७ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीकडे लक्ष केंद्रित केले आहे, जिथे सात भारतीय मुष्टियोद्धे सुवर्णपदकासाठी लढतील.

भारतीय बॉक्सिंगसाठी ही एक अविश्वसनीय संध्याकाळ होती. ''अकरा वेळा राष्ट्रगीत ऐकून आणि भारताला अव्वल स्थानावर पाहिल्याने आम्हाला सर्वांना अभिमान वाटला. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मी आमच्या २५ वर्षांखालील १५ पदक विजेत्यांचे मनापासून अभिनंदन करतो; हे आमचे भविष्यातील ऑलिंपिक चॅम्पियन आहेत आणि त्यांनी देशाला अभिमानाने भरले आहे,'' असे ते म्हणाले.पण, भारताची मोहीम अजून संपलेली नाही. १७ वर्षांखालील सात बॉक्सर शेवटच्या दिवशी अंतिम फेरीसाठी रिंगमध्ये उतरतील. ''अशा कामगिरीमुळे आमचा विश्वास दृढ होतो की येत्या काळात जगभरातील बॉक्सिंग क्षेत्रात भारताचे राष्ट्रगीत पुन्हा पुन्हा वाजेल,'' असे बीएफआयच्या अधिकाऱ्याने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# मध्य रेल्वे सोलापूरची घोडदौड



### रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : प्रवीण देशेट्टीचे शानदार शतक

**सोलूपर, दि. ३० एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयुटने रेल्वेच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन अ गट क्रिकेट स्पर्धेतील विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी झालेल्या सामन्यात रेल्वेने भंडारी स्पोर्टस् क्लबचा ८० धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना रेल्वेने सर्व बाद २३२ धावा केल्या. विजयी २३३ धावांचे लक्ष्य भंडारी स्पोर्टस्ला पेलवले नाही. त्यांचा डाव रेल्वेने १५२ धावांत गुंडाळला. शानदार शतक झळकाविणारा प्रवीण देशेट्टी सामन्याचा मानकरी ठरला. त्यास लियाकत शेख यांच्या हस्ते हे पारितोषिक देण्यात आले. प्रत्येक सामनावीर पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून अमोल अंगडी व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**मध्ये रेल्वे इन्स्टिट्युट, सोलापूर** : ३४.२ षटकांत सर्व बाद २३२ (प्रवीण देशेट्टी ११७, परमजित कदम ३६, अझहर अलगुर ३० धावा, अनिल सलगर ३ बळी, युवराज थेवर, वैभव लाड व आर्यन काळे प्रत्येकी २ बळी, सोमनाथ भरले १ बळी) वि. वि. **भंडारी स्पोर्ट्स क्लब** : ३०.२ षटकांत सर्व बाद १५२ (आर्यन काळे ३०, अनिल सलगर २२, हार्दिक मोटे २१ धावा, आशिष अवळे ४ बळी, अमन सय्यद ३ बळी, वेदांत काळे, अझहर अलगुर व संजय राठोड प्रत्येकी १ बळी).

# जिल्हा क्रीडा कार्यालयाचे ५मे पासून विविध खेळाचे प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३० एप्रिल-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रव्दारा मैदानी, कबडडी, फुटबॉल, कुस्ती, तलवारबाजी, खो-खो व धनुर्विद्या या खेळाचे क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन ५ ते २० मे या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका, शासकीय मैदान नेहरु नगर विजापुर रोड, वालचंद कॉलेज, श्रीकृष्ण कुस्ती केंद्र मरिआई चौक, इंडियन मॉडेल स्कूल, पार्क मैदान, दयानंद कॉलेज येथे आयोजित केले आहे. प्रशिक्षण शिबीराची वेळ सकाळी ६.३० ते ८.३० व सायंकाळी ४.३० ते ६.३० वाजेपर्यत असेल.

परिक्षा कालावधीनंतर उन्हाळयात दीर्घ सुट्टीमध्ये विदयार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त गुणांना वाव देण्याकरिता या क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षण शिबीराकरिता तज्ञ व अनुभवी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच सूर्यनमस्कार, सर्वांगसुंदर व्यायाम, योगासने, प्राणायाम, ॲरोबिक्स, मनोरंजनात्मक खेळ व व्यक्तीमत्व विकास या बांबीवर विशेष भर दिला जाणार आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. सोलापूर शहर व जिल्हयातील सहभागी होऊ इच्छिणा-यांना आपली नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका येथे मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड (मो. ७२१९१५५२५२) यांचेकडे नोंदवावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# द वॉरियर्स तायक्वांदो अकॅडमीस सहा पदके

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

नाशिक येथे सुरू असलेल्या सेकंड किड्स फेडरेशन कप या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये द वॉरियर्स तायक्वांदो अकॅडम ीच्या खेळाडूंनी महाराष्ट्राकडून प्रतिनिधित्व करताना २ सुवर्ण, ३ रौप्य व १ कांस्य अशी ६ पदकांची कमाई केली. त्यांना मुख्य प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे व जालिंदर साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सोलापूर तायक्वांदो असोसिएशनचे सचिव प्रमोद दौंडे, महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष संदीप ओबासे, महासचिव गफार पठाण, खजिनदार प्रसाद कुलकर्णी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



**कामगिरी**
**सुवर्ण** : सानिका गायकवाड, ओम विजय जगदाळे
**रौप्य** : सोहम शैलेंद्र साबळे, मोर्य योगेश केकडे, नित्या शिवप्रसाद तिर्थ.
**कांस्य** : श्रेयस सखाराम कांबळे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अक्कलकोट पाणी टंचाईसाठी ३ कोटी ४५ लाखाची तरतूद

## टंचाई कृती आराखडा तयार

### गटविकास अधिकारी कवितके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट, दि.३० एप्रिल-**

कोणत्याही परिस्थितीत तालुक्यात पाणीटंचाई जाणवणार नाही यासंदर्भात सज्जता ठेवण्यात आली असून यंदा ३ कोटी ४५ लाख २४ हजार रुपयांचा कृती आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती गटविकास अधिकारी शंकर कवतिके यांनी दिली.

येथे पाणी टंचाई कृती आराखड्याबाबत आमदार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या समवेत नुकतीच बैठक झाली. यावेळी तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवतिके, पाणीपुरवठा



उपअभियंता व्ही. डी.राठोड उपस्थित होते. श्री. राठोड यांनी यावेळी टंचाई कृती आराखडा सादर केला. त्यास मान्यता देत त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. तालुक्यात एकूण १२८ गावे आहेत. यंदा ऑक्टोबरपासूनच पाणीटंचाईवर मात करण्याची तयारी होती. ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२४ या कालावधीत ४२ गावातील विहिरी आणि विंधनविहीरी अधिग्रहण तसेच २४ ठिकाणी टँकर, बैलगाडीने पाणीपुरवठा खर्च ९४ लाख ६८ हजार खर्च, जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत ५४ गावात विहीर, विंधन विहीर अधिग्रहण तर २४ ठिकाणी टँकर ,बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा अंदाजे खर्च एक कोटी १६ लाख आणि एप्रिल ते जून २०२५ या कालावधीत ११० गावात विहीर आणि विंधन विहिरी अधिग्रहण तसेच ३० गावात टँकर, बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा यासाठी खर्च एक कोटी ७८ लाख २० हजार एकंदरीत तालुक्यातील २०६ गावात विहीर इंधन विहीर अधिग्रहण आणि ७८ ठिकाणी टँकर बैलगाडी द्वारे पाणीपुरवठा पाहता तीन कोटी ४५ लाख २४ हजाराचा पाणी टंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे. सध्या हालचिंचोळी, हालहळ्ळी, चपळगाव वाडी, दहिटणेवाडी, बोरोटी(खु) या ठिकाणी विहीर आणि विंधन विहीर यांचे अधिग्रहण करण्यात आले असून शावळ व कलहिप्परगे येथील प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहेत. तर सुलेरजवळगे येथे पाणी टंचाई निवारणासाठी दोन टँकर आणि वसंतराव नाईक नगर येथे एका टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. उन्हाचा वाढत चाललेला कडाका आणि झपाट्याने होत असलेले पाण्याचे बाष्पीभवन या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई कृती आराखड्यामुळे कोणत्याही परिस्थितीत पाणीटंचाईला तोंड देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती गटविकास अधिकारी कवतिके यांनी दिली.

## महत्वाचे...

### गोरडवाडी येथे बोगस डॉक्टरवर कारवाई

**सदाशिवनगर, दि. ३० एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील गोरडवाडी येथे आरोग्य विभाग व पंचायत समितीच्या पथकाने छापा टाकून बोगस डॉक्टरवर कारवाई करून माळशिरस पोलिसांत. तालुका वैद्यकीय अधिकारी प्रियंका शिंदे यांनी गुन्हा दाखल केला आहे. अभिषेक वाघमोडे रा तिरवंडी असे कारवाई केलेल्याचे नाव आहे.




गोरडवाडी येथे डॉक्टरने दवाखाना सुरु केला होता. या डॉक्टरच्या विरोधात आरोग्य विभागाकडे डॉक्टर बोगस असल्याचा एक निनावी अर्ज आला होता. या अर्जाची दखल घेऊन पंचायत समितीचे आरोग्य अधिकारी डॉ. प्रियंका शिंदे यांनी पंचायत समितीचे कर्मचारी शहाबाज शेख व चालक शहाजी चव्हाण यांना बरोबर घेऊन सदर डॉक्टरच्या दवाखान्यात पेंशंट म्हणून पाठविले. त्यावेळी डॉक्टरने बी पी तपासून तुम्हाला इंजेक्शन देवू का? गोळ्या देऊ असे विचारून त्याच्या जवळची गोळी दिली त्यावेळी चालक शहाजी चव्हाण याने डॉ शिंदे यांना फोन करून सदर इसम डॉक्टरची वेशभूषा परीधान करून बसलेला आहे असे सांगितले. त्यानंतर डॉ शिंदे व पोलिस कॉ सतिश रोकडे यांनी दवाखान्यात प्रवेश करून सदर डॉक्टरकडे रजिस्ट्रेशन डॉक्टरची डिग्री आहे का विचारले त्यावेळी सदर डॉक्टरने माझ्याकडे कोणत्याही प्रकारची ड्रिग्री नसून माझे हॉस्पीटल जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्याकडे बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार नौदणीकृत नाही असे सांगितले.त्यावेळी त्याला ताब्यात घेरून त्याच्या दवाखान्यातील औषधे इजिक्शनसलाईनच्या बाटल्या स्टेटसकोप बी पी मिसिन व इतर साहित्य मिळून आले. सदर सामान जप्त करुन सदर बोगस डॉ. अभिषेक वाघमोडे यांच्यावर माळशिरस पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### कासेगांवमध्ये बसव जयंती साजरी

**कासेगाव, दि. ३० एप्रिल -**

महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती पंढरपूर तालुक्यातील कासेगांवमध्ये साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वर महाराज यांचे १२ व्या शतकात आध्यात्मिक, वैचारिक, सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे ते एक महान परिवर्तनवादी युगपुरुष होते त्यांनी अनिष्ट प्रथा, रूढी परंपरा, जातीयता, अंधश्रद्धा, कर्मकांड यांचा विमोड करून सामाजिक व्यवस्था उभी करण्याचे उल्लेखनीय कार्य महात्मा बसवेश्वर महाराज यांनी केले. आपण आज भारतासह जगभरात लोकशाही अनुभवतो त्या लोकशाही व्यवस्थेचा पाया बाराव्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून घातला. महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. त्यानंतर लिंगायत समाजबांधवांच्या वतीने प्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमासाठी महालिंग लिगाडे,रेवणसिद्ध साखरे, मोहन खताडे, शशिकांत साखरे, अक्षय साठे, मधुकर साखरे, म्हमाजी साखरे, प्रतिक खराडे, नवनाथ साखरे, सागर लिगाडे, विरेंद्र शेंडे, ओंकार खराडे, उमेश गोटे, आकाश लिगाडे, निखिल कळकुंबे, गणेश भागानगरे उपस्थित होते.

### श्री दत्तात्रेय महाराजांचे मंदिर विकासासाठी नाटीकर यांचे आमरण उपोषण

**अक्कलकोट, दि. ३० एप्रिल-**

श्रीक्षेत्र देवल गाणगापुर येथील श्री दत्तात्रेय महाराजांचे मंदिर काशी विश्वनाथ मंदिराच्या मॉडेलवर विकसित करण्याच्या मागणीसाठी गेल्या १४ दिवसांपासून शिवकुमार नाटीकर यांनी आमरण उपोषणाला बसले असून त्यांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी गाणंगापूर येथील सर्व दुकान मालक, जनता व भाविक भक्तांच्या वतीने आज गुरवारी १ मे रोजी गाणगापुर कडकडीत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हिंदूंच्या मंदिरांच्या विकासाची किंचितही चिंता कर्नाटक सरकारला नसल्याने गेल्या १४ दिवसांपासून शिवकुमार नाटीकर यांनी आमरण उपोषणाला बसले असतानाही मंदिराचे अध्यक्ष, जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हा प्रभारी मंत्री आंदोलनस्थळी भेटी दिले नसल्याचा निषेधार्थ महाराष्ट्र आणि तेलंगणासह देशाच्या विविध भागांतील भाविकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

### मोटारीची दुचाकीला धडक; चिमुरडीचा मृत्यू

**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

बार्शी ते कुर्दुवाडी रस्त्यावर खांडवी गावाजवळ लकी हॉटेलच्या समोर सोमवारी सायंकाळी भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील मोटारीने दुचाकीला धडक दिल्याने पायल अतुल गायकवाड (वय ४) या चिमुकलीचा मृत्यू झाला असून, तिचे वडील अतुल अरविंद गायकवाड (वय ४४) गंभीर जखमी आहेत.




फिर्यादी विनोद अरविंद गायकवाड (वय ३७ वर्षे, रा. बार्शी) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबात सांगितले की, ते व त्यांचे भाऊ अतुल दुचाकीवरुन आपल्या गावाकडून (भुताष्टे, ता. माढा) बार्शीकडे येत होते. त्यावेळी भरधाव वेगातील मोटारीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातानंतर दोघेही रस्त्यावर फेकले गेले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तात्काळ बार्शीतील जगदाळे मामा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, पायल गायकवाड हिचा उपचारादरम्यान सायंकाळी ६.२० वाजता मृत्यू झाला. या प्रकरणी मोटारचालक पंकज तानाजी लोंढे (रा. पिंपळनेर, ता. माढा) याच्या विरोधात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बबनराव वजाळे यांचे निधन



**श्रीपूर, दि. ३० एप्रिल-**

येथील जिल्हा परिषद शाळेचे सेवा निवृत्त केंद्रीय मुख्याध्यापक बबनराव एकनाथ वजाळे (गुरुजी) यांचे वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, सात मुले व एक मुलगी असा परिवार आहे. श्रीपूर मधील आंबेडकर चळवळी मध्ये त्यांचे मोठे योगदान राहीले आहे.

# अमृत योजना व्यवसायासाठी नवसंजीवनी : तपकीरे

### बार्शीत ब्राह्मण महासंघातर्फे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.३० एप्रिल-**

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या सहकार्याने व पंढरपूर अर्बन बँकेच्या सहयोगाने अमृत योजनेच्या माध्यमातून नवयुवकांसाठी उद्योग उभारणीसाठी असणारी अमृत कर्ज योजना ही नव संजीवनी असल्याचे मत पंढरपूर अर्बन बँक शाखा बार्शीचे चेअरमन विशाल तपकीरे यांनी व्यक्त केले.

येथील ब्राह्मण महासंघातर्फे झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भगवंत सहकारी पुरवठा मंडळी संस्थेचे चेअरमन आनंद कुलकर्णी होते. यावेळी ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष दिनकर सापनाईकर, विनया कुलकर्णी, चिन्मय कुलकर्णी, रवींद्र माचवे, डॉ. हेमंत साने, अमिता कुलकर्णी हे होते. पहेलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात वीरमरण आलेल्या हिंदूंना आणि या महिन्यात




दुःखद निधन झालेल्या मिलिंद देशपांडे, भैरव काळे, कमलाकर कुलकर्णी, मधुकर बडवे, सतीश देशमुख, मनोहर जोशी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. स्वातंत्र्यवीर सावरकर, भगवान परशुराम व श्री भगवंताच्या प्रतिमेचे पूजन झाले. यावेळी विजया देशमुख, सर्वोत्तम देशमुख, ईश्वरलाल जोशी यांचा सन्मान झाला. वैद्यकीय पदवीधर डॉ. प्रवरा देशपांडे, डॉ. साक्षी काळे, डॉ. चैतन्य दिवाणजी यांचाही सत्कार करण्यात आला. ब्राह्मण युवकांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योगाची कास धरण्याचे आवाहन अध्यक्षिय भाषणातून आनंद कुलकर्णी यांनी केले. त्यांनी पाच हजार रुपयांची देणगी जाहीर केली. याप्रसंगी पंढरपूर बँकेचे चिन्मय कुलकर्णी यांचेही भाषण झाले. यावेळी भावसुमने हा हिंदी मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम अर्चना पानसे, निलेश घाटे, गीतांजली देशमुख, श्रेया देवळालकर यांनी सादर केला. यामध्ये एकाहून एक सुमधुर गीतांचा समावेश होता. प्रसाद सहस्रबुद्धे, दिपाली सहस्रबुद्धे, तुषार गदगी यांनी साथ संगत केली. निवेदन वैशाली पानसे आणि अंजली कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन अनिल काळे आणि व्यंकटेश कुलकर्णी यांनी केले. तर आभार मुकुंदराज कुलकर्णी यांनी मानले.

## सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचा वार्षिक निकाल जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ३० एप्रिल-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचा शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ चा इयत्ता सहावी, सातवी या वर्गाचा आकारिक मुल्यमापनानुसार श्रेणी पद्धतीने व इयत्ता पाचवी, आठवी, नववी व अकरावी या वर्गाचा निकाल जाहीर झाला. यामध्ये इयत्ता ५ वी मध्ये फाल्गुनी खडतरे, ओम काळेल प्रथम, प्रथमेश शिंदे द्वितीय, श्रावणी लवांडे, श्रीतेज रणदिवे तृतीय, इयत्ता ८ वी मध्ये प्राप्ती गोडसे प्रथम, सिद्धी घाडगे द्वितीय, आर्यन पवार तृतीय, इयत्ता ९ वी मध्ये जिज्ञासा घाडगे प्रथम, दिग्विजय पवार द्वितीय, शिवानी दिवसे तृतीय तर इयत्ता ११ वी कला शाखेमध्ये मनिषा बंडगर प्रथम, हर्षदा गेजगे द्वितीय, आरती गोडसे तृतीय, वाणिज्य शाखेमध्ये स्नेहल बोधगिरे प्रथम, लक्ष्मी गोडसे द्वितीय, वैष्णवी रणदिवे तृतीय, शास्त्र शाखेमध्ये प्रणव पुजारी प्रथम, धीरज जगताप द्वितीय, रुचश्री चव्हाण तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं. घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, संस्था कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके, सर्व संस्था कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ब्राम्हण समाजाने चौकट मोडून प्रगती करणे गरजेचे : देऊसकर

### श्रीपूर येथे ब्राम्हण सेवा संघातर्फे भगवान परशुराम जयंती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. ३० एप्रिल-**

ब्राम्हण समाजाने आता नोकरीच्या मानसिकतेतून बाहेर येत चौकट मोडून प्रगतीच्या दृष्टीने व्यवसाय, उद्योगामध्ये प्रगती साधावी तसेच अन्य समाजाशी असणारी नाळही घट्ट करण्याचे आवाहन प्रा. देऊसकर यांनी केले. येथील ब्राम्हण सेवा संघाच्या भगवान परशुराम जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक बबनराव कुलकर्णी होते. प्रथम




भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . या प्रसंगी पांडुरंग कारखान्याचे मुख्य रसायन तज्ञ एम . आर . कुलकर्णी , डॉ . सुधीर पोफळे, ब्रिमा सागरचे प्रोडक्शन व्हा .मॅनेंजर नरेश पाठक ,भाऊसाहेब कुलकर्णी उपस्थित होते. यानंतर प्रास्ताविकात प्रा . नितीन देशपांडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आपण भगवान परशुराम जयंतीचे उत्सव साजरा करत आहोत उद्देश एकच या निमित्ताने सर्व समाज एक येवून विविध विषयांवर विचार मंथन होऊन अडी अडचणी सोडवणे असल्याचे सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रवीण पेन्डसे , गणेश कुलकर्णी , अभिजीत आहेरसिंग , श्रीपाद सुमंत , कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन प्रा . नितिन देशपांडे यांनी तर आभार प्रविण कुलकर्णी यांनी मानले .

# 'दामाजी'चे ऊस तोडणी करार सुरु

### चेअरमन शिवानंद पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.३० एप्रिल-**

संत दामाजी कारखान्याचे गळीत हंगाम सन २०२५-२६ करिता ऊस तोडणी वाहतुक यंत्रणेचे करार करुन घेणेचा शुभारंभ अक्षय तृतीयेचे मुहूर्तावर चेअरमन शिवानंद पाटील यांच्या हस्ते झाला.

यावेळी व्हा. चेअरमन तानाजी खरात, संचालक बसवराज पाटील, भारत बेदरे, प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय, शेती अधिकारी कृष्णात ठवरे, चिफ अकौंटंट रमेश गणेशकर, कार्यालय अधिक्षक दगडु फटे, उप शेतीअधिकारी पंडित गायकवाड, केनयार्ड सुपरवायझर प्रकाश पाटील, हेड



टाईम किपर आप्पा शिनगारे, सर्व गटाचे ओव्हरसिअर, ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार सुनिल जाधव, बंडु करे, बलभिम पाटील, संतोष पाटील, अर्जुन घोडके, दिनेश गाडे, मारुती पाटील, बबन कुकडे, संभाजी जगताप, विठठ्ल पाटील, बिरु पाटील, तोडणी यंत्र ठेकेदार किरण लुगडे, महादेव लोखंडे आदी उपस्थित होते. यावेळी चेअरमन पाटील म्हणाले, यंदाच्या हंगामाकरिता कार्यक्षेत्रात ८४०० हेक्टर क्षेत्रावर नोंद असलेला ऊस आहे. या हंगामासाठी ५ ते ६ लाख मे. टन गळीताचे उद्दीष्ट आहे. ऊस तोडणी वाहतूक यंत्रणेच्या कराराचा आज मुहुर्त झाला असुन लवकरच ॲडव्हान्स वाटप करुन गळीतासाठी सक्षम अशी ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा भरती करण्यात येईल. यासाठी २०० ट्रॅक्टर, १७५ डंपिंग, २५० बैलगाडी व ७ तोडणी यंत्र अशा तोडणी वाहतूक यंत्रणेचे करार नियोजन आहे. मशिनरी दुरुस्तीची कामे वेळेत होत आहेत. त्यामुळे ऊस तोडणी वाहतुकीचे करार करावेत असे आवाहन त्यांनी केले.

# अक्कलकोट वनक्षेत्रात वन्यजीवास पाण्याची सोय

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ३० एप्रिल**

अक्कलकोट तालुक्यातील वनक्षेत्रात वनविभागाकडून वन्य प्राण्यांना पिण्यासाठी पाण्याची सोय करण्यात आली आहे. वनक्षेत्रातील वन्य प्राण्यांना पिण्यासाठी पाणवठ्यात पाणी टाकण्यात आल्याची माहिती मैंदर्गी नियत क्षेत्राच्या अधिकारी रेणुका सोनटक्के यांनी दिली.

अक्कलकोट तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढली असून याच्या झळा या जनमानसासोबत वनक्षेत्रातील पशुपक्षांना बसत आहेत .कडक उन्हामुळे विहिरी व तलाव आटले आहेत. वन्य प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून तालुक्यातील बारा पाणवठ्यामध्ये टँकरद्वारे पाणी सोडण्यात आले आहे. सदरचे पाणवठे हे सोलापूर वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित कुमार गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली भरण्यात आले. गवताळ वनक्षेत्र असल्याने कोल्हे, लांडगे, काळवीट, नीलगाय, साळींदर, रानडुक्कर तसेच विविध प्रकारचे पक्षी हे पाणी पितात. सोलापूर वनपरिक्षेत्राकडून तालुक्यातील वनक्षेत्रात पाण्याची सोय केल्याने प्राण्यांची भटकंतीय़ांबणार आहे. फेब्रुवारी महिन्यापासून वनक्षेत्रातील पाणवठ्यांमध्ये पाणी सोडण्यात येते. ही माहिती वन परिमंडळ अधिकारी रुपेश कांबळे, मैंदर्गी नियतक्षेत्र अधिकारी रेणुका सोनटक्के वागदरी नियतक्षेत्र अधिकारी रमेश कुंभार यांनी दिली.



7 66183

# शब्द संयमाने वापरले तर जीवनातला आनंद वाढेल

## भगवंत व्याख्यानमालेत उद्बोधक विचार मंथन-पुष्प तिसरे

### उपजिल्हाधिकारी व लेखिका धानोरकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

जीवनामध्ये कोणत्या बाबींना किती महत्त्व द्यायचे हे कळले पाहिजे त्याचबरोबर शब्दांचा वापर विचारपूर्वक आणि संयमाने केला तर जीवन आनंदाने जगता येईल, असे मत संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी व लेखिका अंजली धानोरकर यांनी व्यक्त केले. येथील मातृभूमी प्रतिष्ठान व भगवंत मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भगवंत व्याख्यानमालेच्या सातव्या वर्षी 'जगूया मजेत' या विषयावर त्या बोलत होत्या.



यावेळी उपविभागीय अधिकारी सुधाकर पडदुणे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, बारा असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. रणजीत गुंड, बांधकाम उपअभियंता आकाश नलावडे, तहसीलदार एफ.आर. शेख, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष ठोंबरे, सचिव प्रताप जगदाळे व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्ष संतोष ठोंबरे यांनी प्रास्ताविकातून भविष्यात महिलांसाठीही उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. यावेळी धानोरकर म्हणाल्या, समाजामध्ये आपल्याला मिळालेल्या कमाईतून गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करणारे अदृश्य खांब उभे असतात म्हणूनच अजून आकाश कोसळलेले नाही. समाजामध्ये सेवा कार्य करण्यास मोठा वाव आहे. प्रशासनात वावरताना समाजातील अनेक प्रश्न हाताळता आले याचे समाधान वाटते. जीवनामध्ये अनेक वेळा अनेक गोष्टींना अवास्तव महत्त्व दिल्यामुळे आपले दुःख वाढते. त्यामुळे नकारात्मक बाबींकडे दुर्लक्ष करता आले पाहिजे. आपला अहंकार कुरवाळत जगणारी माणसे इतरांच्या ही जीवनाला ग्रहण लावत असतात. पण अशा व्यक्तींना कसे हाताळायचे याचे शहाणपण अंगी आले पाहिजे. अनेकवेळा निरर्थक वितंड वाद होतात त्यामुळे जीवनातल्या आनंदाला ओहोटी लागते. एखाद्या व्यक्तीला एखाद्या व्यक्तीला अपमानित केल्यामुळे अनेक अनर्थकांनी प्रसंग घडतात याच्या अनेक उदाहरणे पुरणकाळात आहेत. त्यामुळे कोणालाही त्यामुळे कोणालाही हिणवू, चिडवू नये. जीवनामध्ये संयमाला खूप महत्त्व असून आपले शब्दही प्रसंगी अमृत आणि विष देखील बनू शकतात याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. शब्द म्हणजे केवळ अक्षरांचा समूह नसून शब्दप्रसंगी आयुष्य उध्वस्त करतात आणि आयुष्य उभे करतात याची जाणीव ठेवून शब्दांचा वापर खूप विचारपूर्वक केला पाहिजे. बोलून विचारात पडण्यापेक्षा विचार करुन बोलावे, जीवन मजेत जगण्यासाठी संयम ही यशाची गुरुकिल्ली बनू शकते याचा पुनरुचार धानोरकर यांनी केला. यावेळी पडदुणे यांनी अध्यक्ष समारोपात मातृभूमी प्रतिष्ठानच्या कार्याबाबत गौरवोद्गार काढले. यावेळी सृष्टी ठोंबरे यांनी परिचय करुन दिला तर शहाजी फुरडे यांनी आभार व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### एमआयडीसी पोलिसांकडून २० मोबाईल जप्त

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

एमआयडीसी पोलीसांनी गहाळ झालेले विविध कंपनीचे एकुण ४ लाख रुपये किंमतीचे २० अँड्रॉइड मोबाईल्स सी ई आय आर पोर्टलव्दारे व तांत्रिक पध्दतीने डी.बी. पथकाने शोधून काढले आहेत.एमआयडीसी पोलीस ठाणे येथे मोबाईल गहाळ झालेबाबत तक्रारी वाढल्याने दाखल झालेल्या गहाळ मोबाईलचा शोध घेणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकास आदेशीत केले होते. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक भरत चंदनशिव यांच्या पथकातील मंगेश गायकवाड व शैलेश स्वामी यांनी प्राप्त म ोबाईलचे सी डी , एस डी आर व लोकेशनचे विश्लेषण करून तसेच सी ई आय आर पोर्टलव्दारे सन २०२४ व सन २०२५ मधील विविध कंपनीचे ४ लाख रुपये किंमतीचे एकुण २० अॅन्ड्रॉईड मोबाईल (हॅन्डसेट) सोलापूर शहर, सोलापूर जिल्हा व परराज्यातुन हस्तगत केले.

### पूर्ववैमनस्यातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ येथे पूर्व वैमन्यातून तरुणाला सात ते आठ जणांच्या जमावाने मारहाण केली. हा प्रकार बुधवारी सकाळी दहा पंधरा वाजता गावातील समाज मंदिराजवळ घडला. संतोष दिलीप कांबळे (वय ३७ रा बीबीदारफळ ता. उ. सोलापूर) असे मारहाण करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. संतोष याची यशवंत व चम्या मोरे यांच्यासोबत यापूर्वी तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर यशवंत व चम्या असे दोघे संतोष वर चिडून होते. दरम्यान बुधवारी सकाळी सव्वादहा वाजता संतोष हा गावातील समाज मंदिर जवळ थांबला होता. त्यावेळी यशवंत आणि चम्या व त्यांचे इतर साथीदार तेथे आले. त्यांनी पूर्वीच्या भांडणाच्या रागातून संतोष यास लाथाबुक्क्यांनी तसेच अज्ञात वस्तूने मारहाण केली. सर्वांगास मुकामार लागल्याने संतोष स्वतः दुपारी बारा पंधरा वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### शेतातील फवारणीचे औषध तोंडात गेल्याने मुलगा अस्वस्थ

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

शेतातील पिकावर फवारणी करण्याच्या औषधाच्या बाटलीचे टोपण तोंडाने काढत असताना औषध तोंडात गेल्याने सोळा वर्षाचा मुलगा अत्यवस्थ झाला. साईनाथ तानाजी कुंभार (वय १६ रा कामती ता मोहोळ) असे मुलाचे नाव आहे. बुधवारी सकाळी ८:३० च्या सुम ारास साईनाथ हा कामती परिसरातील शेतात गेला होता. तेथे पिकावर फवारणी करण्याची असल्याने त्याने फवारणीच्या बाटलीचे झाकण तोंडाने उघडले. त्यावेळी ते फवारणीचे औषध त्याच्या तोंडात गेल्याने त्याला उलट्यांचा त्रास होऊ लागला. त्याच्यावर कामती येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून आजोबा शिवाजी कुंभार यांनी सकाळी दहा वीस वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### टेम्पोने दिलेल्या धडकेत ट्रक चालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

आयशर टेम्पोने धडक दिल्याने ट्रक चालकाचा मृत्यू झाला. हा प्रकार सोलापूर पुणे महामार्गावरील शेटफळ जवळील पेट्रोल पंप परिसरात घडला. मुरली कटवा रामन (वय ३६ रा. तामिळनाडू ) असे मृत पावलेल्या चालकाचे नाव आहे. मुरली हा सोलापूरहून पुण्याच्या दिशेने ट्रक चालवीत जात होता. दरम्यान शेटफळ जवळील पेट्रोल पंपाच्या समोरील रस्त्यावर तो ट्रक थांबून खाली थांबला होता. त्यावेळी तेथून जात असलेल्या आयशर टेम्पोच्या चालकाने त्यास धडक दिली. यामध्ये गंभीर जखमी होऊन ट्रक चालक मुरली हा मृत पावला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### बांबूने तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

भांडण केल्याच्या कारणावरून बांबूने मारहाण करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत व्यंकटेश नरसिंगराव सिंगराल (वय ४२, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन विनायक नारबंडी (ा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० एप्रिल रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास घोंगडे वस्ती भाजी मार्केट येथील मल्लणा हेअर सलून या दुकानासमोर व्यंकटेश सिंगराल यास विनायक नारबंडी याने मित्र दिगंबर गज्जम याच्याशी का भांडण केले म्हणून शिवीगाळ करून लाकडी बांबूने मारहाण केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंके पुढील तपास करीत आहेत.

# शहरात महात्मा बसवेश्वर मिरवणूक उत्साहात





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

कल्याणमंटपच्या माध्यमातून सर्वधर्मसमभाव सत्यात आणणारे व सर्व समाजाला सोबत घेऊन धर्म प्रचार व प्रसाराचे कार्य करणारे समाजसुधारक जगद् ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त श्री महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जन्मोत्सव महामंडळाच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली.

मध्यवर्ती महामंडळाची बाळीवेस म ल्लिकार्जुन मंदिरपासून निघालेली मिरवणूक चाटी गल्ली, कुंभार वेस मार्गे बसवेश्वर सर्कल येथे पोहोचली. प्रारंभी पालखीतील बसवमुर्तीचे पुजन महामंडळाचे उत्सव अध्यक्ष मनिष काळजे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी महात्मा बसवेश्वरांचे जयजयकार करण्यात आले. यावेळी बसवभक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पूजेचे पौरोहित्य व्याख्यानकेसरी बसवराज शास्त्री हिरेमठ व वे.मु.होळीमठ यांनी केले.

तत्पूर्वी महात्मा बसवेश्वरांची पूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन केले. यावेळी मंडळाचे उत्सव अध्यक्ष मनीष काळजे, कार्याध्यक्ष संतोष केंगनाळकर, ट्रस्टी अध्यक्ष चिदानंद वनारोटे, केदारनाथ उंबरजे, जगदीश पाटील, गणेश चिंचोली, आनंद मुस्तारे, रेवणसिद्ध आवजे, मल्लिनाथ सोलापुरे, सचिन शिवशक्ती, गुरुशांत मोकाशी, गौरव जक्कापुरे, शिवसेनेचे अजय दासरी, दिलीप पाटील यांच्यासह बसवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्यावतीने महात्मा बसवेश्वर महाराज जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर येथे महात्मा बसवेश्वर महाराज जयंती निमित प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या (पी.बी. ग्रुप) वतीने अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस राष्ट्रीय कर्मचारी सेना (एकनाथ शिंदे गट) विभागीय कार्यशाळा, सोलापूर शहर अध्यक्ष अजित मोकाशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रबुद्ध भारत तरुण मंडळ( पी.बी. ग्रुप) प्रमुख मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, भारत बाबरे, अरविंद गायकवाड,नागनाथ साबळे, विजय इंगळे, रमेश उबाळे, संदीप कापुरे, अजय इंगळे, जयराज सांगे, भीमा मस्के, रोहन तळभंडारे आदी उपस्थित होते.

# निरोगी राहण्यासाठी गोमय वस्तू वापरा : आ. देशमुख



## गोमय उत्पादन विक्री केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल**

धकाधकीच्या व धावपळीच्या युगात माणूस विविध रोगांनी व आजारांनी त्रस्त आहे. गोमय उत्पादन वापर केल्यास त्या आजारांवर मात करता येते. म्हणून गोमय उत्पादन वस्तु वापरण्याचे आवाहन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

महाराष्ट्र पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३० एप्रिल गोमय उत्पादन विक्री दिवस म्हणून सोलापूर मध्यवर्ती बस स्थानक येथे साजरा करण्यात आला

सोलापूर मध्यवर्ती बस स्थानक श्री गणेश मंदिर येथे वडकबाळ येथील आदर्श कामधेनु संशोधन संस्था संचलित श्री कट्टेव्वादेवी गोशाळा यांचे गोमय उत्पादन विक्री केंद्राचे उद्घाटन आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. विशाल येवले डॉ. धनाजी गिड्डे, केतनभाई शहा, महेशभाई भंडारी, राज्य परीवहन विभागीय नियंत्रक अम ेल गोंजारी, सोलापूर आगार प्रमुख नागनाथ जाधव, विश्व हिंदू परिषद जिल्हा अध्यक्ष ह.भ.प डोंगरे महाराज, पंचगव्य प्रचारक परमेश्वर तळेकर, पंचगवे तज्ञ पांडुरंग कुलकर्णी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गोसेवा जिल्हाप्रमुख संगमेश्वर शरणार्थी उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा उमा बिराजदार यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुद्रप्पा बिराजदार यांनी केले. स्टॉलमध्ये अनेक गोमय उत्पादने घेण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती. शासनाच्या या उपक्रमामुळे लोकांपर्यंत गोमय उत्पादने पोहचवण्यासाठी सहकार्य झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम साठे, विजय यादव, गणेश गुदमनी, अविनाश हजारे, अश्विनी बिराजदार, सुरेखा व्यवहारे, भडकुंबे, शिल्पा गुंजेगावकर, सरिता वैद्य आदी गोभक्त प्रेमींचे सहकार्य लाभले.



# मूलभूत गरजा पूर्ण करणे हे आमचे कर्तव्य

## किसन जाधव; प्रभाग २२ येथे ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

प्रभाग क्रमांक २२ येथील नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे आमचे कर्तव्य आहे आणि ड्रेनेज कामामुळे परिसरातील आरोग्य आणि स्वच्छता निश्चितच सुधारणार आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी दिली.

महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्था परिक्षेत्रात अधिसूची विशिष्ट नागरिक सेवा व सुविधा पुरविणे २०२४-२५ अंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यातून कार्यसम्राट नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड आणि किसन जाधव यांच्या प्रयत्नातून प्रभाग क्रमांक २२ येथील लिमयेवाडी व अंतर्गत परिसरात १९ लाख ४८ हजार ६३९ रुपये खर्चित ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, नितीन जाधव, दीपक जाधव, किशोर जाधव, अनिल गायकवाड, अशोक पुजारी जाधव, प्रवीण जाधव, बाळकृष्ण जाधव, अनुप उपाडे, अंबादास गायकवाड, शिवा जाधव, सिद्धार्थ जाधव, कमला गायकवाड, रेश्मा जाधव, सुनीता मावशी, गंगुबाई जाधव, रेखा जाधव, सोनाली जाधव, नसरीन पटेल, रसिका कसबे, सुरेखा गायकवाड, सरस्वती गायकवाड, ज्योती गायकवाड, स्नेहल जाधव, सरिता शर्मा, रेणू गायकवाड, मंगल गायकवाड, विद्या डेविड, गीता जाधव, कोमल उपाडे, गंगाबाई उपाडे, लता जाधव, अनिता माने, नयुमा शेख,रमजान शेख, जुबेदा शेख, मदिना शेख, सुधा गायकवाड, अंबाबाई जाधव उपस्थित होते.

# अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर आसरा समांतर उड्डाणपूलाचे भूमिपूजन

## महापालिकेची पाईपलाईन स्थलांतरित न करता होणार पूल

## आ. सुभाष देशमुख यांच्या दीड वर्षांच्या पाठपुराव्याला यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

आसरा येथील उड्डाण पुलासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी यांचे दीड वर्षाचे प्रयत्न अखेर उपयोगी पडले. बुधवारी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर या समांतर पुलाचे भूमिपूजन झाले आहे आणि लगेचच काम ालाही सुरुवात होणार आहे. काम दर्जेदार करा आणि लवकरात लवकर पूर्ण करा, अशा सूचना यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी अधिकारी आणि ठेकेदारांना दिल्या.

आसरा समांतर उड्डाण पुलासाठी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी २०२३ मध्ये ३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र या पुलाचे काम करताना महापालिकेच्या जलवाहिनीचा अडथळा येणार होता. ती जलवाहिनी स्थलांतरित करण्यासाठी तब्बल दहा ते बारा कोटींची आवश्यकता होती. मात्र पैसे नाहीत म्हणून महापालिकेने हे काम करण्यास नकार दिला. त्यानंतर रेल्वे प्रशासनानेही हात वर केले होते. आमदार देशमुख यांनी राज्य शासनाकडून हे १२ कोटी रुपये मिळवण्यासाठी प्रस्ताव पाठवला होता मात्र येथेही विलंब झाला. त्यामुळे हे आसरा पुलाचे काम रखडले होते.

मात्र त्यानंतर आमदार देशमुख यांनी पाईपलाईन स्थलांतरित न करता पूल कसा करता येईल याबाबत रेल्वे अधिकारी, महापालिका अधिकारी , नॅशनल हायवे यांच्यासह अनेकांच्या बैठका घेतल्या. त्यासाठी एक समितीही स्थापन केली. त्यानुसार महापालिकेची पाईपलाईन स्थलांतरित न करता हा पूल कसा करता येईल याचा प्लान तयार केला.

याच दरम्यान त्या ठेकेदाराला मुदतवाढ दिली. यासाठी संपूर्ण दीड वर्षांचा कालावधी गेला. यादरम्यान मंत्रालय स्तरावर बैठका घेतल्या. केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचा सल्लाही घेतला. महापालिकेची पाईपलाईन हस्तांतर न करता पूल बांधण्याचा प्लान तयार झाल्यावर आमदार देशमुख यांनी भूमिपूजन करतो मात्र कामाला लगेच सुरुवात करावी अशी अट ठेवली. ती अट अधिकारी आणि ठेकेदारांनी मान्य केले.

या कार्यक्रमाला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलीस निरीक्षक दादाराव गायकवाड, महावितरणचे इंजिनिअर प्रदीप मोरे, मोहन अलाट, म हारेलचे मनीष गांजारे, पीपी इन्फ्राचे रोहन पाटील, विशाल गायकवाड, नगरसेविका संगीता जाधव, अश्विनी चव्हाण, मनीषा हुच्चे श्रीशैल स्वामी संकेत किल्लेदार महेश देवकर नागरिक उपस्थित होते.

### मुदतीच्या आधी काम केले तर आनंदच!

भूमिपूजन कार्यक्रमानंतर ठेकेदारांनी आमदार सुभाष देशमुख यांना काम कसे होईल? याची सविस्तर माहिती दिली. काम चांगले आणि दर्जेदार करा याशिवाय लवकरात लवकर करा, अशा सक्त सूचना दिल्या. दिलेल्या मुदतीच्याआधी काम पूर्ण केले तर आनंदच होईल असेही आमदार सुभाष देशमुख म्हणाले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पैशाच्या कारणावरून मारहाण; एकाविरूध्द गुन्हा

### होटगी नाका येथील अग्निशामक दलाच्या केंद्रातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

महानगरपालिकेच्या अग्निशामक दलातील चालकास पैशाच्या कारणावरून मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या रोजंदारी चालकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना होटगी नाका येथील अग्निशामक दलाच्या केंद्रात घडली आहे. याबाबत दत्तात्रय सुरेश कट्टीमनी (वय ४५, रा. रूम नं. १, अग्निशामक दल सेवक निवासस्थान, जुना होटगी नाका) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शकील बालेसा होटगीकर (वय ५०, रा. सेटलमेंट कॉलनी, रामवाडी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोलापूर अग्निशामक दलामध्ये दत्तात्रय कट्टीमनी हे चालक पदावर कार्यरत आहेत अर शकील होटगीकर हे देखील रोजंदारीवर चालक पदावर कार्यरत आहे. कट्टीमनी व होटगीकर यांच्यात पैशाच्या कारणावरून वाद होता. २ एप्रिल रोजी कट्टीमनी हे दुपारी ४ ते रात्री १२ ड्युटीवर असताना शकील होटगीकर याने अग्निशामक दलाच्या केंद्रामध्ये येऊन रात्री सव्वा आकराच्या सुमारास कट्टीमनी यांस जातीवाचक शिवीगाळ करून त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली.पैशाच्या कारणातून तु माझे पैसे देणार आहे की नाही मी तुला सोडणार नाही असे म्हणून होटगीकर याने कट्टीमनी यांस जबर मारहाण करून पाण्याने भरलेली बादली कट्टीमनी यांच्या तोंडावर मारली. त्यामध्ये कट्टीमनी यांचा दात पडला. सहायक पोलिस आयुक्त यशवंत गवारी पुढील तपास करीत आहेत.

## ▸▸ महत्वाचे...

### रेल्वे विभागीय वापरकर्ता समितीवर केतन वोरा

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

येथील सूत व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते केतन मनसुखलाल वोरा यांची मध्य रेल्वे विभागीय वापरकर्ता समितीपदी निवड झाली आहे.



ही निवड २ वर्षाकरिता असून खासदार प्रणिती शिंदे यांच्या शिफारशीनुसार झाली आहे. त्यांची ही निवड तिसऱ्यांदा झाली असून यापूर्वी २०१७-१९ व २०२१-२३ कालावधीकरिता त्यांनी ह्या समितीवर कार्य केले आहे.

### जुना पूना नाका येथे टँकरच्या धडकेत कारचे नुकसान

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

जुना पूना नाका येथे टँकरच्या धडकेत कारचे सव्वा दोन लाखांचे नुकसान झाले. याप्रकरणी टँकरचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत दत्ता नामदेव कवाळे (वय ५१, रा. गुरुदेव नगर) यांच्या फिर्यादीवरुन नामदेव बाबूराव थिटे (वय ४०, रा. गुंजेगाव, ता. उत्तर सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.२३ एप्रिल रोजी दुपारी जुना पूना नाका येथील नामदेव थिटे यांनी त्यांच्या ताब्यातील टँकर क्र. एमएच १३ सीयु ८३७२ हा निष्काळजीपणे चालवून दत्ता कवाळे यांच्या एमएच १३ सीएस ६११५ क्रमांकाच्या कारला जोरदार धडक दिली. यामध्ये कारचे नुकसान झाल्याची पोलिस ठाण्यात नोंद आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### स्वागत नगरजवळ तरुणाला अज्ञात कारणातून मारहाण

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

कुमठा नाका परिसरातील स्वागत नगरजवळ थांबलेल्या तरुणाला दोघांनी अज्ञात कारणातून मारहाण केली. हा प्रकार मंगळवारी रात्री आठ पंधराच्या सुमारास घडला. रहीम कमरोद्दिन पठाण (वय २४ रा. दीक्षित नगर कुमठा नाका सोलापूर) असे मारहाण करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. रहिम हा कुमठा नाका परिसरातील स्वागत नगर येथे मंगळवारी रात्री आठ पंधराच्या सुमारास थांबला होता. त्यावेळी तेथे आलेल्या अरबाज शेख व इतर तीन यांनी अज्ञात कारणातून लाकडाने व पाइपने मारहाण केली. यामध्ये चेहऱ्याला जखम झाली. तसेच डोक्याला मार लागल्याने सासऱ्याने रात्री ८:४५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### वळण घेणाऱ्या दुचाकीला दुचाकीची धडक

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

होम मैदान ते रंगभवन चौकाच्या दिशेने जाताना समोरील दुचाकी अचानक वळल्याने त्यास दुचाकीची धडक बसली. या अपघातात महिला दुचाकीस्वार जखमी झाली. सुनिता विनोद कांबळे (वय ४३, रा. शाहूनगर मजरेवाडी सोलापूर) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी ५:३० च्या सुमारास सुनिता या नवी पेठ येथून मजरेवाडी येथील त्यांच्या घराच्या दिशेने दुचाकीवरून जात होत्या. दरम्यान होम मैदान समोरील रस्त्यावरून रंगमवन चौकाच्या दिशेने जाताना, अचानक समोरील दुचाकी स्वाराने दुचाकी वळवली. यामुळे सुनिता चालवीत असलेल्या दुचाकीची धडक बसली. या अपघातात सुनीता यांच्या डोक्याला जखम झाल्याने मुलगा रोहित याने शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### दुचाकी घसरल्याने पडून एक जण जखमी

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर विद्यापीठ येथून शहराच्या दिशेने येताना टाटा मोटर्स समोर दुचाकी घसरल्याने पडून एक जण जखमी झाला. हा प्रकार बुधवारी रात्री १२:३० च्या सुमारास घडला. अखिल गफूर शेख (वय ४० रा मुकुंद नगर भवानी पेठ सोलापूर) असे दुचाकी घसरल्याने जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी रात्री १२:३० च्या सुमारास अखिल हा दुचाकी चालवीत सोलापूर विद्यापीठ येथून जुना पुना नाका या दिशेने येत होता. दरम्यान टाटा मोटर समोरील रस्त्यावर तो चालवीत असलेली दुचाकी अचानक घसरली. यामुळे खाली पडल्याने अखिल याच्या डोक्याला मार लागला. जखमी अवस्थेत मित्र अजरोद्दीन याने रात्री एक पंधरा वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.





पंढरपूर : अक्षय्यतृतीयेनिमित्त विठ्ठल-रुक्मीणीला आमरसाचा नैवेद्य दाखविण्यात आला. महाप्रसादालयात आमरस प्रसादाचा लाभ घेताना भाविक.

# अक्षय्यतृतीयेनिमित्त विठुरायाला आमरसाचा नैवेद्य; पंढरीत भाविकांच्या ताटातही आंब्याचा गोडवा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल-**

अक्षय्य तृतीयेनिमित्त बुधवारी पंढरीच्या विठुरायाच्या महाप्रसादातील पंचपक्वान्नात खास आंब्याच्या रसाचा समावेश झाला आहे. अक्षयतृतीये पासून ते वटसावित्री पौर्णिमे पर्यंत आता दररोज देवाच्या नैवेद्यात आंब्याचा रस असणार आहे. दरम्यान मंदिर समितीच्या अन्नछत्रातील सर्व भाविकांना देखील अक्षयतृतीये निमित्त आमरस पोळीचा महाबेत विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून देण्यात आला आहे.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर हिंदू धर्मात आंब्याचा प्रसाद महत्त्वाचा मानला गेला आहे. अक्षय तृतीये पासूनच पूर्वजांचे स्मरण करुन त्यांचे पूजन करुन त्यांना नैवेद्य दाखवून सर्वसामान्य नागरिक आंब्याचा रस खाण्यास सुरुवात करीत असतात. यामुळेच आजपासून विठुरायालाही महाप्रसादात आमरस देण्यात सुरुवात झाली आहे. दरम्यान आता देवाच्या बरोबर देवाच्या भक्तांनाही अन्नछत्रामध्ये आमरस



पोळीचा बेत मंदिर समितीच्या वतीने देण्यात येत आहे. पंढरीच्या भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळावा म्हणून शेकडो हात झटत असतात, आज आमरस बनविण्यासाठीही महिलांनी सकाळपासूनच तयारी केली होती.

महाप्रसादालयात भाविकांकडूनही आमरसाचा गोडवा आवडीने चाखला जात असून भक्तांनी देखील आंब्याचा रस मिळत असल्याने समाधान व्यक्त केलं आहे.

### देवाच्या महानैवेद्यात खिरीच्या जागी आमरसाचा समावेश

विठुरायाच्या परिपूर्ण महाप्रसादामध्ये लिंबू ,चटणी, कोशिंबीर, पातळ भाजी, सुकी भाजी, वरण-भात, कढी, वरण-भात, पुऱ्या, भजी तर पकवानामध्ये पुरणपोळी, साखर भात, श्रीखंड, बेसनाचे लाडू, शेवयाची खीर आणि आमरस याचा समावेश असतो. दरम्यान महाप्रसादातील शेवयाच्या खिरीची जागा अक्षयतृतीये पासून आमरसाने घेतली असून आता वटसावित्री पौर्णिमेपर्यंत देवाच्या महाप्रसादात दररोज आमरसाचा सम ावेश असणार आहे. रुक्मिणी मातेलाही अशाच पद्धतीचा पंचपकवांनाचा महानैवेद्य असून मातेच्या महाप्रसादात कटाची आमटी आणि कडबू हे वेगळे पदार्थ असतात.

### सूर्यदेवाचा पुन्हा कोप!

# सोलापूरचा पारा पुन्हा ४४ अंशाकडे!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

१५ एप्रिलपासून सोलापूर जिल्ह्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना आज दि. ३० एप्रिल रोजी सोलापुरात तापमानाचा पारा पुन्हा ४३.६ अंशाच्या घरात होता. गेल्या १५ दिवसांत ४२ अंशाच्या पुढेच पारा चढतो आहे. आजही सूर्यनारायण चांगलेच कोपल्याने दुपारी नागरिक अक्षरशः घामाघूम झाले असून, या उन्हाचा बाजारपेठेवरही परिणाम दिसून आला.



आज अक्षय्यतृतीया असल्याने अनेक नागरिकांनी सकाळी ११ च्या आत आणि सायंकाळी ४ नंतरच घराबाहेर पडणे पसंद केले. यामुळे सोलापूरच्या सराफ बाजारात सायंकाळच्या सुमारास नागरिकांची सोने खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी दिसून आली. एप्रिल महिना सुरू झाल्यापासून सोलापुरात पारा सातत्याने वाढत आहे. २३ एप्रिल रोजी तापमानाचा पारा ४३.८ अंशांवर पोहोचला होता. जो यंदाच्या हंगामातील उच्चांक होता. मात्र, बुधवारीही शहराचा तापमानाचा पारा ४३.६ अंशांवर स्थिरावला. उन्हाच्या झळा तीव्र झाल्याने शहरातील रस्ते, मुख्य बाजारपेठ दुपारच्या सुमारास ओस पडली होती. तरीही आज अक्षय्यतृतीया असल्याने परगावचे काही लोक कडक उन्हातही सोने, कपडे खरेदी करताना दिसून आहे. सोलापूरच्या स्थानिक नागरिकांनी मात्र सायंकाळीच घराबाहेर पडणे पसंद केले. विविध एमआयडीसीत काम करणाऱ्यांचे मात्र उन्हामुळे बेहाल झाले.

**मुबलक पाऊस पडूनही राज्यात टंचाईच्या झळा**

जागतिक तापमान वाढीमुळे दर वर्षीच ऊन जरा जास्त असते, तसे यंदाही. पण, तेच केवळ पाणी आटवणारे नसून, 'प्रगत' महाराष्ट्राला पावसाचे पाणी अजूनही नीट साठवता येत नसल्याने जनतेच्या घशाला कोरड आहे. गेल्या पावसाळ्यात राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. तरी बहुतांश भागांत, अगदी छोट्या-मोठ्या शहरांतही रोज पाणी देणे अशक्य आहे. यामुळे राज्यातील पाणी टँकर दिवसेंदिवस वाढू लागल्याचे चित्र आहे. विशेषत: मराठवाड्यात कडक उन्हामुळे आहे ते पाण्याचे स्त्रोत आटत असून, यामुळे पाणी टंचाईच्या जास्त झळा लागत असल्याची माहिती मिळत आहे.



## अण्णप्पा काडादी प्रशालेस द्वितीय पारितोषिक

### ▸▸ मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

के.एल.ई. सोसायटी संचलित अण्णप्पा काडादी हायस्कूलला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेतून उत्तर सोलापूर तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळाला.

प्रशालेस रुपये दोन लाखांचे, सन्मानपत्र व शाल देऊन प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख व उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेली यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्याध्यापक अनिल पाटील, उपमुख्याध्यापिका सुरेखा म्हमाणे, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा सन्मान स्वीकारला. प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी यांनी केला. विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार याने उपस्थित यांचे स्वागत केले. या यशाबद्दल के.एल.ई.सोसायटीचे चेअरमन डॉ. प्रभाकर कोरे सर्व सदस्य, शालेय समितीच्या अध्यक्षा सिंधुताई काडादी व सर्व स्थानिक सदस्य यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# बसव शरणी पुरस्काराने महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

श्री महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त श्री महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान जुळे सोलापूरच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना बसव शरणी पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले.

जगज्योती श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या बसवेश्वर प्रतिष्ठान सामाजिक संस्था जुळे सोलापूरच्या वतीने सैफुल येथील शिवबसव चौक येथे सोलापुरातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना बसवशरणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



यावेळी डॉ. कांचन उकरंडे, डॉ. स्मिता चाकोते, पोलीस उपनिरीक्षक संगीता पाटील, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, शिवसेनेचे महिला उपनेत्या अस्मिता गायकवाड, विजय शाबादी, ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख रविकांत कांबळे, माजी आमदार शिवशरण पाटील, उत्सव अध्यक्ष मेहुल भुरे यांच्यासह अन्य प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंडळाचे पदाधिकारी विश्वनाथ आमने, खंडू सलगरकर, सचिन कोटाने, रितेश किलजे , संकेत गोटे, शशिकांत वसंतपुरे, परमेश्वर माळगे, अजिंक्य उप्पीन यांच्यासह परिसरातील नागरिक आणि महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान**

पत्रकार प्रमिला चोरगी, मंजुषा दोरकर, पोलीस अधिकारी संगीता पाटील, डॉ. अक्षता हळीगळी, विजयाश्री मच्छाले, सुवर्णा बेले, अर्चना कलखांबकर, सरिता वाघमारे, जयश्री कौचाळे, भाग्यश्री केदार, भौरम्मा हुंडेकरी, सरिता अंकुशे, शलाका कुलकर्णी, बेनझीर काझी.

● अकलूजमध्ये जांभूळ शेतीचा जिल्ह्यातील यशस्वी प्रयोग

# मोहिते-पाटलांनी पिकविले औषधी बहुगुणी पांढरे जांभूळ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३० एप्रिल-**

अकलूज येथे पांढऱ्या रंगाच्या जांभूळ शेतीचा जिल्ह्यातील पहिला प्रयोग यशस्वी झाला आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शेतात थाई (थायलंड) पांढरे जांभूळ या वाणाच्या झाडांना पांढरी जांभळे लगडली आहेत. या जांभळास मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी विविध शहरांतून या जांभळास मोठी मागणी आहे.



मागील काही वर्षांपूर्वी जम्बो जांभूळ या वाणाच्या जांभळाची शेती काही शेतकऱ्यांनी केली होतीफ परंतु पुढे त्यामध्ये फारसे यश आले नाही. अशा परिस्थितीत विजयसिंह मोहिते-पाटील यांनी सन २०२२ मध्ये आपल्या सव्वा एकर क्षेत्रात १५ बाय १२ फूट एवढे अंतर ठेवून २८४ थाई पांढऱ्या जांभळाची रोपे लावली. पहिल्या वर्षापासून जांभळे लागायची. यंदा तिसऱ्या वर्षी या जांभळाची झाडे फळांनी चांगलीच लगडली आहेत. यंदा त्यांना प्रति झाड ४० ते ५० किलो एवढे पांढरे जांभूळ मिळण्याची अपेक्षा आहे. पाचव्या वर्षांपासून प्रति झाड १०० किलो पेक्षा जास्त जांभूळ उत्पादन देईल, असे विजयसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

### थायलंडमध्ये विकसित झाला

विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शेतात लावलेली पांढऱ्या रंगाची जांभूळ हा वान थायलंडमध्ये विकसित झाला आहे. त्याची रोपे आम्हाला ओरिसा येथून शंभर रुपये प्रति रोप याप्रमाणे मिळाली. जांभळाच्या या वाणास अतिशय कमी प्रमाणात कीटक व बुरशीनाशके लागतात. साधारणपणे ऑक्टोबर महिन्यात बहार धरला की तो एप्रिल अखेरीस काढणीस येतो त्यामुळे ऐन उन्हाळ्यात याला चांगली मागणी व चव असते. झाडाची छाटणी करण्याची आवश्यकता नाही. केवळ उंची जांभळं तोडण्याएवढी मर्यादित ठेवण्याची कसरत करावी लागते.

- **रणजित पाटील,** कृषीतज्ञ, दहिगाव

### औषधी गुणधर्म असल्याने महत्त्व

आम्ही सोमवारी २०० किलो पांढरी जांभळे पुणे येथील मार्केटला पाठवली होती त्यास सुमारे दोनशे रुपये प्रमाणे दर मिळाला आहे. झाडावरती आणखी गाभोळी व कच्ची जांभळे मोठ्या प्रमाणात आहेत ती लवकरच काढणीस येतील.यामध्ये औषधी गुणधर्म असल्याने याला खूप महत्त्व आहे .

- **विजयसिंह मोहिते-पाटील,** माजी उपमुख्यमंत्री, अकलूज

### समाजसेवा केल्याचे समाधान

शेतीमध्ये नवीन नवीन प्रयोग करून उत्पादन वाढवणे हे आज काळाची गरज आहे तरुणाई पुढे हा आदर्श मोठा आहे पांढरे जांभूळ बागे मधून उत्पन्न मिळेलच परंतु या माध्यमातून आयुर्वेदिक उपचार व एक समाजसेवा केल्याचे समाधान मिळणार आहे.

- **नंदिनीदेवी मोहिते-पाटील,** शेतीनिष्ठ शेतकरी



महाराष्ट्र दिनानिमित्त

## आज पालकमंत्री गोरेंच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते गुरुवार, दि. १ मे रोजी सकाळी ८ वाजता पोलीस परेड ग्राउंड, पोलीस आयुक्त मुख्यालय, सोलापूर येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी तसेच नागरिक यांनी या ध्वजारोहण कार्यक्रमास सकाळी ७.३० वाजण्यापूर्वी पोलीस परेड ग्राउंड येथे उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

# डॉ. आदित्य नमबियारचा केरळमध्ये झाला अंत्यविधी

### डॉक्टरांचा मोबाईल जप्त व मित्रांकडे चौकशी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**

सोलापूरतील शासकीय रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टराच्या आत्महत्येप्रकरणी सदर बझार पोलिसांनी मयत डॉक्टराचा मोबईल जप्त केला असून काही मित्रांकडे चौकशी केली.

सोलापूरातील शासकीय रुग्णालयात शिकाऊ डॉक्टर असलेल्या आदित्य नमबियार नावाच्या डॉक्टराने त्याच्या राहत्या फ्लॅटमध्ये आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली आहे. याप्रकरणी सदर बझार पोलिसांकडून तपास सुरु आहे.

आदित्य याने अलीकडेच एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण केलं होतं. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अलीकडेच आदित्यनं शिकाऊ डॉक्टर म्हणून आपल्या कार्याला सुरुवात केली होती. तो सोलापूरात भाड्यानं घर घेऊन राहत होता. दरम्यान, त्याने आपल्या राहत्या घरात गळा कापून घेत आत्म हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच सदर बझार पोलिसांनी



पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला. शवविच्छेदन झाल्यानंतर आदित्यचा मृतदेह त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आला असून त्याच्यावर केरळ येथील मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान सदर बझार पोलिसांनी आदित्यच्या फ्लॅटमधून त्याचा मोबाईल जप्त केला असून त्याच्या कॉलसंबंधिची माहिती मागविण्यात आलेली आहे. तसेच फ्लॅटमधून आणखीही काही वस्तु जप्त करण्यात आलेल्या असून बुधवारी पोलिसांनी आदित्यच्या काही मित्रांकडे त्याच्याबाबत चौकशी केली असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक तरंगे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०३

**खोटे नाटे कर्म करिता काय मिळे । दुजियाचे जळे अंत:करण ।।**
**दुजियाचा शाप होईल तो कोप । बदले ते रुप दु:ख भोगी ।।**
**सेना म्हणे घेती पायीं हा दगड । मरता वेळी मूढ पस्ताविती ।।**

दुसऱ्याला दु:ख, यातना देऊन राक्षसी आनंद भोगणारे लोक समाजात आहेत. समाजातच काय तर काही लोक कुटुंबातल्या कुटुंबातही त्रास देणारे असतात. म्हणूनच अनेकांना अकारण त्रास होत असलेला आपण पाहतो.



अर्थात, स्वत:च्या सुखासाठी प्रयत्न करणारे जसे लोक आहेत, तसे दुस-याला दु:ख मिळावे म्हणून प्रयत्न करणारेही लोक समाजात असतात. कांहीही खोटेनाटे करून लोकांची फसवणूक करायची, दुस-याचे अंत:करण जाळायचे म्हणजे एक प्रकरचा विचित्रपणाच होय. असा विचित्रपणा करण्यात आनंद मानणे म्हणजे मानवतेला कलंकित करणे होय. असे लोक एका अंगाने स्वत:च्या पायावर दगड मारुन घेतात. हे सांगतांना,

**सेनाजी, खोटे नाटे कर्म करिता काय मिळे ।**
**दुजियाचे जळे अंत:करण ।।**
**दुजियाचा शाप होईल तो कोप । बदले ते रुप दु:ख भोगी ।।**
**सेना म्हणे घेती पायीं हा दगड । मरता वेळी मूढ पस्ताविती ।।**

असे म्हणतात. ज्याला त्रास दिला जातो, तो मनातल्या मनात का होईना शाप देत असतो. त्याचा शाप म्हणा की कर्माचे भोग म्हणा पण भोगावेच लागते. श्री ज्ञानेश्वर माऊलींनी कर्मभोगाच्या अनुषंगाने,

**केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसे ।**
**न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना ।।**

असे म्हटले आहे. अर्थात, कर्ज फेडल्याशिवाय फिटत नाही, तसे कर्माचे भोग भोगावेच लागतात. केलेल्या कर्माचे फळ माणसाने असा आनंद घ्यावा की ज्यामुळे दुस-यालही आनंद मिळावा किंवा दुस-यांना आनंद मिळाला नाही तरी चालेल; पण दु:ख तरी होता कामा नये. स्वत: दु:ख, यातना सहन करुन दुस-यांना आनंद दयावा असा संतांचाही अटटहास नसतो. मात्र आपण आनंद घेण्यासाठी दुस-याला दु:खी करायचे, हे संतांना अजिबात मान्य नाही. संत नेहमी मानवतेच्या दृष्टीकोणातून बोलतात, माणसाने मानवता सोडू नये, म्हणून त्याला वेळोवेळी संत सत्याची जाणीव करून देतात. काही लोक बाहेरच्यांना तर त्रास देतातच; पण घरातल्या घरातही त्रास देत असतात. निसर्ग नियमांप्रमाणे अशांचीही सत्ता, तारुण्य, संपत्ती कधीतरी संपणारच असते. भोग कोणालाही चुकत नाहीत. म्हणून आपण जाणुनबुजुन तरी कोणाला त्रास देऊ नये. खरे म्हणजे दुस-याला त्रास देऊन आनंद भोगायचा आणि त्या त्रासाचा शाप घेऊन किंवा कर्माचे भोग म्हणून पुढे चालून आपण दु:खी व्हायचे म्हणजे वेडेपणा नव्हे तर काय. असा वेडेपणा समोरच्याच्या मनाला तर जखमा करतोच; पण स्वत:लाही जखमांची अनुभूती देतो. अशा जखमा आपल्याकडून होऊ नयेत, ही सेनाजींची अपेक्षा आपण पूर्ण करायला हवी. महाराजांची ही अपेक्षा पूर्ण करणे म्हणजे आनंद मिळवणे होय.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - महाराष्ट्र दिन, |
| दि. १ मे २०२५ | कामगार दिन, चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८१ | मराठी राजभाषा दिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्थी (११.२३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मृग (१४.२०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (०८.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२२.१४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :** जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

# शहर व जिल्ह्यात गळफासाने दोन आत्महत्या

## करली नगर, दक्षिण सोलापुरातील मुस्ती येथील घटना : एकाचा मृत्यू


**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**

बोळकोठे नगर शेजारील करली नगर येथील मामाच्या घरी अज्ञात कारणातून तरुणाने गळफास लावून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार मंगळवारी रात्री ११:३५ च्या सुमारास उघडकीस आला.

प्रवीण नागनाथ चव्हाण (वय ३२ रा साईबाबा चौक सोलापूर )असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या तरुणाचे नाव आहे. प्रवीण याचा मामा करली नगरात राहण्याचा आहे. रात्री प्रवीण मामाच्या घरी गेला होता. तेथे रात्री ११:३५ च्या सुमारास त्याने फॅनच्या हूकाला ओढणीच्या साह्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आल्याने त्यांनी प्रवीण याची गळफासातून सुटका केली. त्यानंतर त्यास रात्री ११:३५ च्या सुमारास भाऊ सुनील याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. तो अर्धशुद्धीवर असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### पॅन्टच्या सहाय्याने झाडाच्या फांदीला गळफास

दुसऱ्या घटनेत अज्ञात कारणातून तरुणाने मुस्ती पासून तीन किलोमीटर अंतरावर पॅन्ट च्या साह्याने झाडाच्या फांदीला गळफास घेऊन आत्महत्या केली. प्रकार मंगळवारी रात्री ८:३० च्या सुमारास उघडकीस आला. अर्जुन अशोक राठोड (वय वय २७ रा मुस्ती ता द सोलापूर ) असे



आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. मुस्ती गावापासून तीन किलोमीटर अंतरावर मुस्ती धोत्री रोडवरील झाडाच्या फांदीला पॅन्ट च्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत अर्जुन दिसून आला. ही बाब माहीत होताच नातेवाईकांनी त्यास गळफासातून सोडवले. त्यानंतर भाऊ भीमा राठोड यांनी रात्री दहा तीस च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच अर्जुन मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. दोन्ही घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# नीलकंठ बँकेच्या चेअरमनपदी सीए धनराज नोगजा




## व्हाईस चेअरमनपदी पद्मा भुतडा यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

नीलकंठ को-ऑप बँक लि., सोलापूर या बँकेच्या संचालक मंडळाची सभा बँकेच्या प्रधान कार्यालयात यु.यु.पवार प्राधिकृत अध्यासी अधिकारी यांच्या अध्येक्षतेखाली चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीसाठी आयोजित करण्यात आली होती. चेअरमनपदासाठी सीए धनराज नोगजा यांनी नामनिर्देशन पत्र सादर केले. त्यास सूचक म्हणून जमनादास भुतडा यांनी तर अनुमोदक म्हणून कौस्तुभ करवा यांनी स्वाक्षरी केली. सीए धनराज नोगजा यांचे एक आणि एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्यामुळे त्यांची बँकेच्या चेअरमनपदी एकमताने बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केले. व्हा.चेअरमनपदासाठी पद्मा भुतडा यांनी नामनिर्देशन पत्र सादर केले. त्यास सूचक म्हणून चंद्रकांत तापडिया यांनी तर अनुमोदक म्हणून आनंद झंवर यांनी स्वाक्षरी केली. पद्मा भुतडा यांचे एक आणि एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्यामुळे त्यांची बँकेच्या व्हाईस चेअरमनपदी एकमताने बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केले.

यावेळी सीए धनराज नोगजा, पद्मा भुतडा, माजी चेअरमन उपाध्ये, संचालक चंद्रकांत तापडिया, व्यवस्थापन मंडळ चेअरमन कौस्तुभ करवा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बँकेचे संचालक प्रदीपकुमार शिंगवी, जमनादास भुतडा, नंदकुमार भोसले, सचिन कोठारी, अभिजित चिल्लाळ, वीं. महेश अग्रवाल, सीए आनंद झंवर व सौ. नंदा भट्टड हे उपस्थित होते. यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महावीर जाधव, शाखाधिकारी आनंद बलदवा उपस्थित होते.

# शिवाजी नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. पवार यांचा आज सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. मधुकर पवार उद्या (गुरुवारी) सेवानिवृत्त होत असून यानिमित्त त्यांचा मराठा समाज सेवा मंडळाच्यावतीने महाविद्यालयाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते व उच्च शिक्षण विभाग सोलापूरचे विभागीय सहसंचालक प्रा. डॉ .उमेश काकडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे .याप्रसंगी तुळजापूरचे ज्येष्ठ साहित्यिक



प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, सोलापूर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार ,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पुण्याचे प्रकल्प संचालक संजय कदम आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्राचार्य डॉ. पवार यांनी ३२ वर्षे प्राध्यापक आणि एक वर्ष प्राचार्य म्हणून छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये सेवा केली. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडियाने हिंदी चित्रपटांची सृष्टी केली व्यापक

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडियाने सोनी मॅक्स १ वाहिनी लॉन्च करून हिंदी चित्रपट प्रसारण क्षेत्रातील आपली उपस्थिती आणखी व्यापक केली आहे.ही नवी वाहिनी देशभरातील लिनियर टीव्ही प्रेक्षकांसाठी सिनेमॅटिक अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डिझाईन करण्यात आली आहे.'फिल्मों का ऐसा चस्का, जो देखे हक्का बक्का' असे या ब्रँडचे वचन सोबत घेऊन ही वाहिनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारे आणि त्यांचे मनोरंजन करणारे चित्रपट घेऊन आली आहे. सर्व मोठ्या डीटीएच आणि केबल प्लॅटफॉर्म्स वर १ मे २०२५ पासून लाईव्ह होत असलेली सोनी मॅक्स १ ही वाहिनी हिंदी चित्रपट प्रेमींसाठी सर्वात पसंतीची वाहिनी बनण्यास सज्ज आहे. तुषार शाह, बिझनेस हेड म्हणाले, कुटुंबातील प्रत्येक सदस्यासाठी मनोरंजन प्रदान करण्याचे सोनी मॅक्स १ चे लक्ष्य आहे.

## पुरोहित, कीर्तनकार यांच्यासाठी उद्या चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

बालविवाह मुक्त भारत अभियान अनुषंगाने महात्मा फुले समाजसेवा मंडळातर्फे (करमाळा) पुरोहित, कीर्तनकारांसाठी शुक्रवार दि. २ मे रोजी सायंकाळी ४ वाजता सोलापुरातील रामलाल चौक नजीकच्या साईप्रसाद हॉटेलमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रमोद झिंजाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.


# वीरशैव व्हिजनतर्फे महात्मा बसवेश्वरांना अभिवादन



**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त बसवेश्वर सर्कल (कोंतम चौक) येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, उत्सव समिती सचिव अविनाश हत्तरकी, मनोज पाटील, अमित कलशेट्टी, गौरीशंकर अतनुरे, सोमनाथ चौधरी, सिद्धेश्वर कोरे, गंगाधर झुरळे उपस्थित होते.

# 'सिंहगड'मध्ये शिक्षक-पालक-विद्यार्थी मेळावा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवारी (ता. २६) प्रथम वर्षातील वर्षातील शिक्षक-पालक-विद्यार्थी मेळावा पार पडला. प्रतिसाद आणि संख्या पाहता दोन सत्रात मेळावा पार पडला.

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमास सुरुवात होऊन सात महिने झाले. ही सभा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ संशोधक, माजी कुलगुरू डॉ. एस. एच. पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळेस प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, विभाग प्रमुख प्रा. के. एस. पाटील यांची उपस्थिती होती. या दुसऱ्या पालक सभेचे समन्वयक म्हणून डॉ. ए.ए. कांबळे यांनी काम पाहिले. शनिवारी सकाळी दहा आणि दुपारी अडीच वाजता अशा दोन सत्रात पार पडली. यावेळेस पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रगतीवर समाधान व्यक्त केले. अबोल आणि शांत असलेला विद्यार्थी सिंहगड महाविद्यालय प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यात कमालीचा बदल झाल्याचे पालकांमधून सांगण्यात आले. साकेत कांबळे या विद्यार्थ्यांनी इतर ॲक्टिव्हिटी स्पर्धेत भाग घेऊन यश मिळवल्याने त्यांच्या आईने पालक सभेत पाल्याविषयी मनोगत व्यक्त करत पाल्यातील बदलाबाबत समाधान व्यक्त केले. जयदीप कदम, मनस्वी पुजारी, साकेत कांबळे आदी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन धनश्री चव्हाण, किरण सुरवसे यांनी तर आभार प्रा. ममता चौगुले यांनी मानले.

### प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा सन्मान

विद्यापीठ प्रथम वर्षाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या निकालाच्या क्रमवारीत पहिल्या ११ मध्ये सिंहगड महाविद्यालयाच्या सय्यद झेद (९२.६७ टक्के), प्रगती जाधव (९०.३३ टक्के), शुभम पेठे ( ९० टक्के) या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आठ विद्यार्थ्यांनी १० पैकी १० जीपीए मिळवले आहे. ३७४ पैकी १६७ जणांनी डिस्टिंक्शनसह प्रथम श्रेणी मिळवली आहे. ४३ विद्यार्थ्यांनी ओ ग्रेड (उत्कृष्ट श्रेणी) मिळवला आहे. विद्यापीठ क्रमवारीत पहिल्या ११ मध्ये ३ विद्यार्थी सिंहगड सोलापूरचे आहेत. या पालक सभेत या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत सन्मान केला.



# महात्मा बसवेश्वर महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये महात्मा बसवेश्वर महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मुख्यलिपिक महेजबीन शेख, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, निलोपर सय्यद, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, हर्षद चिंचणसुरे, सचिन जाधवर, ताहीर बिराजदार, भगवान गायकवाड, भालचंद्र साखरे, सायली ढोले, सचिन साखरे आदी उपस्थित होते.



# श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये बसवेश्वर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर येथे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. पर्यवेक्षक रमेश दिंडोरे व प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक अण्णाराया तुप्पद यांच्या हस्ते जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी संतोष स्वामी यांनी आपल्या मनोगतातून महात्मा बसवेश्वरांच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमास मारुती माने, बाबुराव कलशेट्टी, गंगाराम घोडके, विद्याधर हुलगेरी, अनिलकुमार गावडे, रमेश आगवणे, अनिता हौदे, सुकेशनी गंगौडा उपस्थित होते.



# नेताजी प्रशालेस मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तृतीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेस पंचायत समिती उत्तर सोलापूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा व सुंदर शाळा' या अभियानांतर्गत आयोजित उपक्रमातून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज येथे झालेल्या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, विस्तार अधिकारी बापूराव जमादार, शिक्षक संघटनेचे नेते ज. रा. मोरे, वडाळ्याचे सरपंच राजेंद्र साठे आदी मान्यवरांच्या हस्ते मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांना सन्मान चिन्ह, शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार, खजिनदार ललिता कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे आदींनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# सेवासदन महाविद्यालयातील भक्ती कल्पवृक्ष हिचे जेईई परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

येथील सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी भक्ती कल्पवृक्ष हिने जेईई मेन परीक्षेत ९३.२५ टक्के गुण प्राप्त करून यश संपादन केले आहे. ती जेईई ॲडव्हॉन्स परीक्षेसाठी पात्र झाली आहे. भक्तीच्या या यशाबद्दल सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातर्फे तिचा सत्कार करण्यात आला. अभ्यासातील सातत्य आणि सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाल्याचे भक्तीने सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी म्हणाले की, भक्तीचे कठोर परिश्रम आणि महाविद्यालयातील अनुभव संपन्न शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश मिळालेले आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी भक्ती कल्पवृक्ष हिने मिळवलेले यश इतर विद्यार्थिनीं-साठी प्रेरणादायक आहे. याच कार्यक्रमात अकरावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचा अकरावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. पौर्णिमा चव्हाण (९३ टक्के) गुण मिळवून विज्ञान विभागातून आणि महाविद्यालयातून प्रथम आली आहे. तर कला विभागातून साक्षी काळे (८५ टक्के) आणि वाणिज्य विभागातून प्रगती गायकवाड (८४ टक्के) यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे. यावेळी सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिव वीणा पतकी, कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. पद्मकुमार उपाध्ये, शंकर कल्पवृक्ष उपस्थित होते. प्रा. सविता मादळे यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

## महत्वाचे...



### कुसमोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची मिरवणुकीने सांगता

**पिलीव, दि.३० एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची मिरवणुकीने सांगता झाली. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची कुसमोड गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते, जिवन जानकर, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, आरटीआय तालुकाध्यक्ष मिलींद सरतापे, शिवराज पुकळे, प्रमोद भैस, प्रविण वाघमारे, कुसमोडचे सरपंच शहाजी लेंगरे, उपसरपंच रेखा पालखे, माजी सरपंच तुषार लवटे, माजी सरपंच महावीर धायगुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सुरेश सातपुते, माजी उपसरपंच संजय पाटील, विजय कचरे, लक्ष्मण पवार, उत्तम मोरे, आरपीआय तालुका उपाध्यक्ष अमोल वाघमारे, कुसमोडचे आरपीआय अध्यक्ष राहुल सातपुते, सतीश गायकवाड, शंकर सातपुते, माऊली सातपुते, सागर सातपुते, अक्षय सातपुते, पपू मोरे, राकेश सातपुते, माजी सरपंच सारिका सातपुते, तसेच भिम शक्ती युवा मंच कुसमोडचे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात पार पडली.




### स्वामी भक्तांना स्वामी पुण्यतिथी काळात प्रसाद वाटप

**अक्कलकोट, दि ३० एप्रिल-**

क्रिकेटियर धवल कुलकर्णी व मडीखांबे परिवार गेली १७ वर्ष स्वामी भक्तानां स्वामी पुण्यतिथी काळात प्रसाद वाटपाचा उपक्रम राबवित आहेत भाविकांची सेवा हीच स्वामी सेवा असे गौरवोद्गार पुणे येथील स्वामी भक्त नरेश अहिर यांनी काढले. स्वामी समर्थ महाराज यांच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त क्रिकेटियर धवल सुनिल कुलकर्णी व मडीखांबे मित्र परिवार यांच्यावतीने प्रसाद वाटप प्रसंगी नरेश अहिर बोलत होते. यावेळी प्राचार्य नागनाथ जेऊरे, सोनवणे, खैराटचे सरपंच सिद्धाराम मठपती, पंकज मडीखांबे, प्रशांत मडीखांबे, पुटूराज मडीखांबे, साई गायकवाड, शाम बाळशंकर, फणसे काका, विजयकुमार बाळशंकर, साटम, शिलामणी बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रतिमेचे पूजन करून प्रसाद वाटप साटम नागनाथ जेऊरे फणसे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विजय बाळशंकर, सागर सुतार, कमलेश सोनकांबळे, प्रविण मडीखांबे, दत्ता शिंदे, प्रग्याज्ञ मडीखांबे, प्रतीक मडीखांबे, प्रियांश मडीखांबे उपस्थित होते.


### बार्शीत गांजा विक्री करताना दोघांना अटक; शहर पोलिसांची कारवाई

**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

बार्शी शहरात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यावर बार्शी शहर पोलिसांनी पुन्हा कारवाई करत गांजाची विक्री करताना दोघांना पकडले असून ही कारवाई २९ एप्रिल रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सुभाषनगर परिसरातील मिरगणे विटभट्टी परिसरात करण्यात आली. उपविभागीय पोलीस अधीक्षक जालिंदर नालकुल, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे आणि पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे सहाय्यक फौजदार अजित शिवाजी वरपे आणि त्यांच्या पथकाने अचानक धाड टाकत दोघांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सचिन कुमार मिरगणे (वय ३३, रा. १४ नंबर शाळेमागे, सुभाषनगर, बार्शी) आणि पांडुरंग सोमनाथ सोनवणे (वय ४०, रा. मांडेगाव, ता. बार्शी) अशी आहेत. हे दोघेही मजुरीचे काम करतात. छाप्यामध्ये आरोपींच्या ताब्यातून एकूण ४६२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये सचिन मिरगणे याच्याकडून प्लास्टीक पिशव्यांमध्ये भरलेला ३२० ग्रॅम गांजा आणि पांडुरंग सोनवणे याच्याकडून पिशव्यांमध्ये भरलेला ४२ ग्रॅम गांजा असा एकूण ९,०५०/- रुपयांचा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला. हे दोघेही हा गांजा विक्रीसाठी घेऊन बसले होते, असे पोलिसांनी फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अंतर्गत कलम ८(क), २०(ब)(२)(ब), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर करत आहेत.

### नातेपुते न.पं.च्या मुख्याधिकारीपदी विकास शिंगाडे यांनी घेतला पदभार

**नातेपुते, दि. ३० एप्रिल-**




नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांची बदली झाल्यानंतर माळशिरस नगर पंचायतीचे मुख्याधिकारी डॉ. कल्याण हुलगे यांचे प्रभारी मुख्याधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर दि.२२ एप्रिल रोजी विकास शांताराम शिंगाडे यांची मुख्याधिकारी म्हणून नातेपुते नगरपंचायत येथे नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी ते सहाय्यक कक्ष अधिकारी मंत्रालय, मुंबई या ठिकाणी कार्यरत असणारे तसेच डहाणू नगरपरिषद या ठिकाणी मुख्याधिकारी म्हणून काम केलेले व कोरची नगरपंचायत गडचिरोली येथे मुख्याधिकारी आणी चामोर्शी नगरपंचायत मुख्याधिकारी म्हणून काम केलेले विकास शिंगाडे हे अनुभवी अधिकारी आता नातेपुते नगरपंचायत येथे मुख्याधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

# कॉरिडॉर बाधितांशी आज व उद्या जिल्हाधिकारी करणार चर्चा

### कॉरिडॉरबाबत चर्चेसाठी प्रशासनाकडून सतर्कता

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल-**





येथील प्रस्तावित कॉरिडॉरबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हेच आता मैदानात उतरले असून या प्रकल्पातील बांधितांशी ते स्वत:च चर्चा करणार आहेत. या चर्चेसाठी बाधितांचे सहा गट तयार करण्यात आले आहेत. येत्या १ व २ मे रोजी बैठका होणार आहेत. एका गटात शंभर बाधितांचा समावेश करण्यात आला असून एका दिवसात तीन गटाशी असे दोन दिवसात जिल्हाधिकारी सहा गटांशी म्हणजेच एकुण ५८० ते ६०० बाधितांशी चर्चा करणार आहेत.

यावेळी कॉरिडोर मधील बाधितांच्या सर्व शंकाचे निरसन करण्यात येणार आहे. त्यामध्ये किती जागा जाणार, मोबदला किती व कसा मिळणार या सर्वांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांकडून १ व २ मे रोजी होणाऱ्या बैठकीतून बाधितांना दिली जाणार आहे. सर्व बाधितांना त्याबाबतचे पत्र दिले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. पंढरपूरच्या कॉरिडॉरचा विषय दोन वर्षापासून रेंगाळला आहे. दरम्यान येथील कॉरिडोरबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच आग्रही असल्याचे अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी लोकसभेच्या निवडणूकीनंतर मुंबईतील भाजपाच्या कोअर कमिटी बैठकीत सांगितले होते. तेव्हापासून रेंगाळलेल्या कॉरिडोरच्या विषयाने पुन्हा गती घेतली आहे. पंतप्रधान मोंदी यांचा ड्रीमप्रोजेक्ट यशस्वीपणे राबविण्याची जबाबदारी ही सहाजिकच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस पंढरपूरच्या कॉरिडोर विषयी स्वत: लक्ष देवून आधिकाऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. मागील महिन्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनास कॉरिडोरचे प्रेझेंटेशन पाहून गो अहेड असे सांगितले होते. मुळात मुख्यमंत्रीच पंढरपूरचा कायापायलट करण्यावर ठाम आहेत. कारण उज्जैन, वारणसीच्या धर्तीवर वारकरी सांप्रदायाचे माहेरघर असलेल्या पंढरीनगरीचा विकास व्हावा, येथे येणाऱ्या वारकऱ्यांना येथील वास्तव्यात कोणत्यांही समस्या येऊ नयेत यासाठीच कॉरिडोरचा घाट घालण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ६०, ८० ऐवजी शंभर मीटरचाच कॉरिडोर राबविण्यावर ठाम असल्याचे विश्वसनीय सुत्रांनी सांगितले. कारण दर दहा ते पंधरा वर्षानंतर शहरातील रस्ता रुंदीकरणाची डोकेदुखी होवू नये. जे काही करायचे आहे ते एकदाच शंभर मीटर पर्यंतचा कॉरिडोर करा अशा आग्रही सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून कॉरिडोर राबविण्या बाबतचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्राथमिक माहितीनुसार चौफाळा ते महाद्वार घाट या परिसरातील ५७५ नागरिक यामध्ये बाधित होत आहेत. या बाधितांमध्ये शंभर जणांचा एक गट असे एकुण सहा गट तयार करण्यात आलेले आहेत. प्रत्येक गटातील बाधितांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे पत्र व त्यामध्ये किती वाजता बोलावले आहे ती वेळ नमूद केली आहे. या बाधित नागरिकांच्या गटांच्या १ व २ मे रोजी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महविद्यालयात बैठकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या बैठकांच्या माध्यमातून स्वत: जिल्हाधिकारीच बाधितांशी चर्चा करणार आहेत. दरम्यान शहरातील भूसंपादन कसे केले जाते याचा अभ्यास, माहिती देखील घेतली असून कोणाचेही आर्थिक व अन्य नुकसान न करता आणि विकासात्मक प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आलेली आहे.

**✔ रोषाला सामोरे जावे लागू नये म्हणून गटांची निर्मिती**
प्रस्तावित कॉरिडोरमधील सुमारे सहाशे बाधितांचा रोष गृहित धरुन, सर्व बाधित एकत्रित येवून गोंधळ होवू नये यासाठी शंभर बाधितांचा एक गट असे एकुण सहाशे बाधितांचे सहा गट तयार करण्यात आले आहेत.

**✔ विद्यार्थ्यांमार्फत केले जाणार सर्व्हेक्षण**
येथील कर्मवीर महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांमार्फत सर्वेक्षण केले जाणार आहे. यामध्ये किती बाधित होणार आहे याची संख्या, बाधितांचे किती व काय नुकसान होणार आहे. यामध्ये दुकाने, घर याचे किती नुकसान होणार आणि अन्य माहिती या विद्यार्थ्यांमार्फत संकलित केली जाणार आहे.

**✔ वाराणसीमधील पथकाला केले जाणार पाचारण**
वाराणसी येथील अधिकाऱ्यांचे एक पथक पुढील आठवड्यात पंढरपूरला येणार आहे. ते देखील कॉंरिडोरबाबत मार्गदर्शन करणार आहे. वाराणसीच्या धर्तीवरच येथील कॉंरिडोरचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

**✔ पत्र किंवा नोटीस असणाऱ्यांनाच बैठकीसाठी प्रवेश**
बैठकांसाठी ज्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे पत्र (नोटीस) मिळालेले आहे त्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. बैठकीला येताना संबंधितांनी हे पत्र अथवा नोटीस आणणे बंधनकारक आहे अशा देखील सुचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आलेल्या आहेत.

**✔ संघटना, नेते, पदाधिकाऱ्यांना प्रवेश नाही**
कॉरिडॉरबाबतच्या या बैठकांमध्ये जिल्हाधिकारी हे केवळ बांधितांशीच चर्चा करणार आहेत. त्यामुळे या बैठकांना विविध संघटना, राजकीय नेते, पदाधिकाऱ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

## यंदाच्या हंगामासाठी आवताडे शुगरच्या ऊस तोडणी कराराचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मांगळवेढा, दि. ३० एप्रिल-**



अक्षय्य तृतीयेच्या मंगल मुहूर्तावर आज आवताडे शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि. नंदूर येथे २०२५-२०२६ या गळीत हंगामासाठी ऊस तोडणी व वाहतूक करारचा शुभारंभ कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा युवक नेते सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते झाला.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांचे नेतृत्वाखाली कारखान्याने आत्तापर्यंत ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून कारखान्याने आत्तापर्यंत वाहतूक ठेकेदार व शेतकरी यांचे विश्वासावर गाळप केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे. याप्रसंगी वाहन मालक बंडू काशिनाथ यादव, तात्यासो औदुंबर वाघमोडे, संजय नाना फटे, दामाजी शामराव बंडगर, हरिदास महादेव सरगर, आण्णाप्पा चंद्रम ऐवळे, रविकांत हत्तीकर आणि पंढरी नामदेव ऐवळे यांचे करार जोडून करारचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, संत चोखामेळा नगरचे माजी उपसरपंच सुहास पवार, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहिद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, डिस्टिलरी मॅनेजर संभाजी फाळके, चिफ अकाऊंटट बजीरंग जाधव, एच.आर मॅनेंजर डी. बी. बळवंतराव, हार्वेस्टर मालक दादासो गायकवाड, महेश निकम, अंबादास लवटे, बिरा लोखंडे, संतोष लोखंडे, संदीप पवार, राम चंद्र पाटील उपस्थित होते.

## होटगी स्टेशनच्या सरपंचपदी नीलम भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल -**



होटगी स्टेशन येथील ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी उपसरपंच सुभाष पाटोळे व निसार अहमद कांबळे गटाच्या नीलम भोसले यांची निवड करण्यात आली.

सरपंच पदासाठी नीलम भोसले आणि अश्विनी कडचे यांचे दोन उमेदवारी अर्ज आल्यामुळे मतदान घेण्यात आले. यामध्ये अश्विनी कडचे यांना तीन तर नीलम भोसले यांना सात मते मिळाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी रियाज भाईजान यांनी नीलम भोसले यांची सरपंचपदी निवड झाल्याचे जाहीर केली. सरपंच जगन्नाथ गायकवाड यांच्यावर अविश्वास ठराव मंजूर झाल्याने सरपंच पद रिक्त होते. त्याठिकाणी मतदानाद्वारे भोसले यांची सरपंच म्हणून निवड करण्यात आले. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कांतु राठोड यांनी काम पाहिले. यावेळी उपसरपंच व सोलापूर कृषी बाजार समितीचे नूतन संचालक सुभाष पाटोळे, निसार अहमद कांबळे, गायत्री ठक्के, मिना पोरे, मोहतबी शेख, फातीमा नदाफ, जिजाबाई धायगोडे, जगनाथ गायकवाड आदि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर सत्कार करून जल्लोष करण्यात आले. यावेळी नंदा कोकरे, अविनाश दोडतले, लालाशेठ कांबळे, संतोष गायकवाड, लाला शेख, नबी शेख, कुणाल ठन्के, लक्ष्मण भोसले, जाबीर कांबळे, तम्मा ढेरे आदि उपस्थित होते.

### माळशिरस तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी सुहास कोल्हे

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ३० एप्रिल-**



माळशिरस तालुक्यातील माळशिरस शिक्षक सहकारी पतसंस्थेची नुकतीच अकलुज येथे चेअरमन विजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आली होती. यामध्ये जुनी पेन्शन संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष सुहास कोल्हे व मिनाज मुलाणी या दोघांची तज्ञ संचालक पदी निवड करण्यात आली. यावेळी सर्व संचालक, अल्पसंख्याक तसेच शिक्षक नेते तसेच रमेश सरक, संजय करमाळकर, राजू गोरवे उपस्थित होते.



## पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ माळशिरस बंद

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ३० एप्रिल-**

पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे व युवासेना प्रमुख खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुकाप्रमुख सतीश सपकाळ यांनी रविवारी माळशिरस तालुका बंदची हाक दिली होती. यामध्ये तालुक्यातील माळशिरस, नातेपुते, अकलूज, वेळापूर येथील सर्व व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे बंदमध्ये सहभागी होऊन भ्याड हल्ल्याचा निषेध नोंदवला.

तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून अकलूज, नातेपुते, माळशिरस, वेळापूर पोलीस ठाणे यांचे वतीने चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांनी भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त केला. एक दिवस देशासाठी पहलगाम येथे झालेल्या हुतात्म्यांसाठी म्हणत सर्व व्यापारी बंधूनी उस्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल तसेच नातेपुते, माळशिरस, वेळापूर अकलूज या पोलीस ठाण्यांचे पोलिस अधिकाऱ्यांचे आभार मानले.

## मंगळवेढा बसस्थानकावर प्रवाशांचे मोबाईल लांबविले

### चोरट्याच्या शोधासाठी बस चक्क पोलीस ठाण्यात दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० एप्रिल-**



मंगळवेढा बस स्थानकामध्ये एस.टी.मध्ये चढत असताना दोन प्रवाशांचे मोबाईल चोरट्याने हातोहात चोरुन नेण्याचा प्रकार घडल्याने प्रवाशांच्या आग्रहास्तव एस.टी.चालकाला चोरट्याचा शोध घेण्यासाठी चक्क मंगळवेढा पोलीस ठाण्यात बस आणण्याची वेळ आली.

मंगळवेढा बसस्थानकावरुन सायंकाळी ५.३० वाजता सुटणारी बस क्रमांक एम.एच.१४ बी.टी.२१५१ या बस मध्ये इंग्लिश स्कूल प्रशालेतील फार्मसीची विद्यार्थिनी दिक्षा पवार ही शाळा सुटल्यानंतर मंगळवेढा-मानेवाडी या बसने आपल्या मुळ गावी भोसे येथे निघाली होती. बसमध्ये चढत असताना बॅगेत ठेवलेला २२ हजार रुपये किंमतीचा विव्हो कंपनीचा मोबाईल चोरटयाने हातोहात लंपास केला. तर याचवेळी विष्णू गवळी हे मंगळवेढ्यातील रहिवाशी पुणे गाडीत चढत असताना त्यांच्या खिशातील १० हजार रुपये किंमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल चोरट्याने गायब केला. हे दोन्ही मोबाईल गायब झाल्यानंतर प्रवाशी वर्गात एकच खळबळ उडाली चालकाने तात्काळ बस पोलीस स्टेशन आवारात आणून घडला प्रकार पोलीसांना कथन केला. पोलीसांनी संपूर्ण गाडीमध्ये मोबाईलची तपासणी प्रवाशी वर्गाकडे केली मात्र तो मिळून आला नाही. दरम्यान यापुर्वीही अनेकवेळा बसस्थानकामधून प्रवाशांचे मोबाईल गेल्याच्या घटना घडल्या आहेत. पोलिस कसून तपास करण्यात तसदी घेत नसल्याचा आरोप प्रवाशांचा आहे. बसस्थानकामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे आहेत मात्र बसमध्ये चढताना कॅमेरात ते कैद होत नसल्यामुळे चोरटे सहीसलामत चोरी करुन निघून जात आहेत. बसस्थानकावर पोलीसांची गस्त अथवा नेमणूक अपेक्षित असताना येथे कधीही पोलीस बसस्थानकावर ड्यूटी बजावत असल्याचे दिसून येत नसल्याचा आरोप यावेळी अनेक प्रवाशांनी व्यक्त केला.

## संजवाडच्या पाटील कुटुंबासाठी असाही योगायोग

# आई व मुलासाठी सोमवार 'लकी डे'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

प्रत्येकाच्या आयुष्यात कधी आणि कसा योगायोग जुळून येईल हे काही सांगता येत नाही. राजकराणात तर योगायोग जुळून येणे म्हणजे दुग्धशर्करा योगच म्हणावे लागेल, असाच दुग्धशर्करा योग संजवाडमधील पाटील कुटुंबियासाठी आणि तितकाच गावकऱ्यासाठी जुळून आला. पाटील कुटुंबातील आई सरपंच तर मुलगा बाजार समिती संचालक होण्याचा योगायोग जूळून आला. त्यामुळे संजवाडमधील पाटील घराण्यासाठी सोमवार हा 'लकी डे' ठरला.

सोमवारी २८ एप्रिल रोजी सकाळी रिक्त झालेल्या संजवाडच्या सरपंचपदावर प्रथम बेबीताई सुर्यकांत पाटील यांची निवड झाली. त्यानंतर दुपारी सोलापूर कृषी उत्पन्न





बाजार समितीच्या निवडणूकीत सोसायटी गटातून उदय सुर्यकांत पाटील हे संचालक म्हणून निवडून आले.

त्यांच्या निवडणुकीचा निकालही सोमवारीच लागला. एकाच गावातील आई आणि मुलगा सत्ताधारी बनण्याचा दुर्लभ राजकीय योगायोग जुळून आल्याने संपूर्ण संजवाड गावकऱ्यासह दक्षिण सोलापूर तालुक्यातून पाटील



कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संजवाड येथे सरपंच सुतार यांनी राजीनामा दिल्याने संपूर्ण गावकऱ्यांनी एकत्र येऊन शांत स्वभावाच्या व सर्वसमावेशक व्यक्तीमत्वाच्या बेबीताई पाटील यांची सरपंचपदावर बिनविरोध निवड केली. त्यानंतर संपूर्ण एप्रिल महिन्यात सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीने राजकीय वातावरण तापले होते. माजी जिल्हा परीषद सदस्य सुरेश हसापूरे यांचे 'निष्ठावंत' म्हणून उदय पाटील यांना सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणूकीत उदय पाटील यांनी ८०० हून अधिक मताधिक्याने विजय मिळविला. त्यामुळे आई सरपंच तर मुलगा बाजार समिती संचालक होण्याचा योगायोग पहावयास मिळाला. विशेष म्हणजे प्रकाश सूर्यकांत पाटील हे सोसायटीचे विद्यमान चेअरमन आहेत.

> **संपूर्ण गावकऱ्यांनी एकत्र येऊन आई बेबी पाटील यांना बिनविरोध सरपंच म्हणून निवड केली. तर आमचे नेते सुरेश हसापूरे यांच्या कृपाशिर्वादामुळे भाऊ उदय पाटील यांना सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पद मिळाले. दोनही पद सोमवार २८ एप्रिल रोजी योगायोगाने मिळाले आहेत.**
>
> **- प्रकाश पाटील,**
> चेअरमन सोसायटी, संजवाड

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्षय्य तृतीयानिमित्त श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० एप्रिल-**

हिंदू वर्षातील महत्वाचे साडेतीन मुहुर्तापैकी अक्षय तृतीया एक मुहूर्त आहे. हिंदू धर्मात या सणाला विशेष महत्त्व असतं. त्यानिमित्ताने श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

यामध्ये श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, लक्ष्मीहार सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकारांचा समावेश आहे. तसेच परंपरेनुसार अक्षय तृतीया पासून वटपोर्णिमे पर्यंत श्रींच्या महानैवेद्यामध्ये शेवयाची खीर ऐवजी आमरसाचा समावेश करण्यात येत आहे. याशिवाय, श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्राच्या दुपारच्या भोजनप्रसादामध्ये देखील आमरसाचा समावेश करण्यात आला होता. तसेच आनंद (गुजरात) येथील विठ्ठल भक्ताने श्री रुक्मिणी मातेस पाच ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र अर्पण केल्याचे श्रोत्री यांनी सांगितले.





### महत्वाचे...



बार्शी : येथील ग्रामदैवत श्री अंबरीष वरद भगवंत-लक्ष्मी यांना अक्षय्य तृतियेनिमित्त आंब्याची सजावट करण्यात आली होती.



### नितीन कुलकर्णी यांना राष्ट्रसेवा पुरस्कार

**पंढरपूर,दि.३० एप्रिल -**

पद्मश्री मनीभाई देसाई ट्रस्टच्या वतीने पंढरपूर तालुक्यातील रोपळे गावचे सुपुत्र नितीन कुलकर्णी यांना यावर्षीचा दिव्यांग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय राष्ट्रसेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ते पुणे जिल्हा परिषदेत दिव्यांग विभागामध्ये निम वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. पुणे जिल्हा हे कार्यक्षेत्र असले तरी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ते दिव्यांग क्षेत्रात मार्गदर्शनपर कार्य करीत असतात. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. हिंदुरत्न डॉक्टर रवींद्र भोळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला आमदार राहुल कुल, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, रावेर मतदारसंघाचे आमदार राहुल जावळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. पुरस्कारा व सन्मान मिळणे मोठी बाब आहे. त्यातून कामासाठी प्रेरणा मिळते आणि आणखी जबाबदारी वाढते. माझे समाजसेवेचे हे व्रत अखंडितपणे चालू राहील. अशा भावना नितीन कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या.



### भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालयात पहलगाम येथील हल्ल्याचा निषेध

**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालयात (बीआयटी कॉलेज ) जम्मू काश्मीर येथील पहलगाम या ठिकणी पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यमुखी पडलेल्या २६ निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच या घटनेचा निषेध करण्यात आला व केंद्र सरकारने याचा बदला लवकरात लवकर घ्यावा व पाकिस्तानला योग्य तो धडा शिकवावा, अशी भावना प्रत्येकानी बोलून दाखवली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित शिराळ उपस्थित होते.



### प्रज्वल मोळकची लार्सन अँड टुब्रो कंपनीत निवड

**सांगोला, दि. ३० एप्रिल-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील प्रज्वल मोळक या विद्यार्थ्याची तळेगाव, पुणे येथील लार्सन अँड टुब्रो डिफेन्स या कंपनीत निवड झाल्याचे प्राचार्य डॉ.आर. ए.देशमुख यांनी सांगितले. सदर विद्यार्थ्याला ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.पी.सी.चव्हाण, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंगचे विभागप्रमुख प्रा. आनंद गायकवाड, प्रा. ऋषीकेश गयाळी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, विश्वस्त मंडळ, डॉ. आर. ए. देशमुख, प्रा. पी. सी. चव्हाण यांनी अभिनंदन केले.

# 'बसवेश्वर महाराज की जय'च्या गजरात मिरवणुका


## विविध ठिकाणी महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

राजेशाहीत लोकशाही प्रस्थापित करणारे युगपुरुष क्रांतीसूर्य महामानव श्री जगद्जोती महात्मा बसवेश्वर यांची ८९४ वी जयंती जिल्ह्यात विविध संस्था, मंडळ व संघटनांतर्फे विविध उप्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून रॅली व मिरवणूक काढण्यात आली.

### मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालय

मोडनिंब (ता.माढा) येथे जगद्जोती महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालय परिसरात वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने आयोजन करण्यात आले. सुरुवातीला महात्मा बसवेश्वर मूर्तीला पुष्पहार अर्पण करून प्रतिष्ठापना करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालय, विविध संघटनेतर्फे अभिवादनासह पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी सरपंच लक्ष्मी पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे कैलास तोडकरी, उपसरपंच अमित कोळी, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, दत्तात्रय सुर्वे, नागनाथ ओहोळ, सदाशिव पाटोळे, संजीव शिंदे, गणेश महाडीक, महालिंगेश्वर देवस्थानचे किरण तोडकरी, अॅड. विजयसिंह गिड्डे, हनुमंत कुंभार, विजय खेलबुडे, किरण खडके, राजेश पाटणे, विश्वतेज खेलबुडे, नवनाथ मोहिते, संतोष पाटील, अनिल सावंत, चांगदेव वरवडे, भारत घोलप, ऋत्विक तोडकरी, शैलेश गुरव, अतुल गाडे उपस्थित होते. परिमल तोडकरी, कौस्तुभ तोडकरी, राजू झाडबुके, राजू घोडके, प्रणव साखरे, संदेश तोडकरी, अमोल तोडकरी, नारायण झाडबुके, विशाल तोडकरी, सूरज तोडकरी, कैलास गुजरे, बालाजी घोडके आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक आणि आभार किरण तोडकरी यांनी मानले.





### वीरशैव लिंगायत समाज संघटनेतर्फे मिरवणूक

वीरशैव लिंगायत समाज संघटना माळशिरस यांच्यावतीने महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शिवनगर येथून सकाळी रॅली व मिरवणूकीला सुरूवात करून शहरातील सर्व पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सोमेश्वर मंदिर येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यांला हार घालून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य योगेश गुजरे यांनी महात्मा बसवेश्वर महाराज यांचा जीवनपट सांगितला. यावेळी माजी आमदार राम सातपुते, डॉ. अप्पासाहेब देशमुख यांनी आपआपले विचार व्यक्त केले. यावेळी समस्त वीरशैव लिंगायत समाजातर्फे राम सातपुते लिंगायत स्मशानभूमीच्या जागे संदर्भात मागणी करून निवेदन देण्यात आले. जयंती महोत्सव समितीवतीने सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी माजी आमदार.राम सातपुते,माजी नगराध्यक्ष .डॉ.आप्पासाहेब देशमुख, नगरसेवक वैभव जानकर, दादा शिंदे, सुरेश टेळे, बाळासाहेब वावरे, बाळासाहेब सरगर, आण्णासाहेब आंबले, प्रा. योगेश गुजरे, अजित गुजरे, आकाश कापसे आदी उपस्थित होते.



### बोरी उमरगेत बसवेश्वर महाराजांची मूर्तीची प्रतिष्ठापना

महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती व अक्षय्य तृतीयानिमित्त बोरी उमरगे येथे अडत व्यापारी राहुल तेलूनगी यांच्या नेतृत्वाखाली श्री बसवेश्वर महाराजांची मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. श्री दक्षिण मुखी जागृत हनुमान देवस्थानमध्ये अक्षय्य तृतीया निमित्त सकाळी मिरवणूकीद्वारे श्री बसवेश्वर महाराजांची मूर्तीची अभिषेक स्वामी यांच्याकडून विधिवत पूजा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी ईरय्या स्वामी, पत्रकार बसवराज बिराजदार, विठ्ठल घोडके, संगप्पा हतगुंदे, नरसिंग उमरजे, मल्लिनाथ पाटील, गोरखनाथ पाटील, लक्ष्मीपुत्र तोरणे यांच्या हस्ते श्री ची महापूजा करण्यात आली. गुरूवार दि.१ मे रोजी सोलापूर सा.बां. विभागाचे वरिष्ठ लिपीक कृष्णात बिराजदार यांच्या हस्ते महापूजा होणार असून संध्याकाळी छावा सिनेमा प्रदर्शित करण्यात येणार असल्याची माहिती बसवसेना प्रतिष्ठान अध्यक्ष अमृत बिराजदार यांनी दिली. शुक्रवार २ मे रोजी संध्याकाळी विविध वाद्य समवेत मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविराज तेल्लूणगी यांनी सांगितले. प्रकाश तेल्लूणगी, सागर पाटील नागनाथ वागदरी, चनप्पा बिराजदार, शिवराज बिराजदार, मल्लिनाथ बाके, रविराज हतगुंदे, शिवरज हतगुंदे, शिवशरण बिराजदार, सिद्धिलिंग पाटील, गुरुनाथ बिराजदार, राजू स्वामी, यल्लप्पा बेळमगे,विकास बिराजदार, आकाश हतगुंदे, सागर बिराजदार आदींनी परिश्रम घेतले.

### अकलूज : वीरशैव समाज

येथील वीरशैव समाजच्या वतीने वीरशैव लिंगा धर्माचे संस्थापक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. महादेव मंदिर येथे बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व अभिषेक समाजाचे कार्यकर्ते प्रभाकर बिराजदार यांनी पूजन केले. त्यानंतर बसवेश्वर चौक येथे बसवेश्वराच्या पुतळ्यास माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील व पांडुरंगराव देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल. त्याचप्रमाणे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंग मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनीही महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले. यावेळी समाजाच्या अध्यक्ष विलास शिरसागर, संतोष शेटे, उदय शेट, ओंकार कुंभार, त्रिंबक गुळवे, नागेश नसते, राजू आर्वे, राजू उडवे, पप्पू आंधळकर, नितीन हारवे, चंद्रकांत शेटे, अशोक शेटे, सुहास उरवणे, संदीप कुंभार, सोनि कानडे, वीर सेवा महिला भजनी मंडळ युवक संघटना शिवा संघटना बसवेश्वर प्रतिष्ठानचे शिवनेरी संघटना शिवशक्ती सार्वजनिक संघटनाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. सायंकाळी बसवेश्वरांच्या प्रतिमेचे मिरवणूक काढण्यात आली. रथाचे व प्रतिमेचे पूजन चंद्रशेखर शेटे यांनी केले. वीरशैव लिंगायत समाजाच्या महिलांनी ढोलीबाजा सादर करत मिरवणुकीत सहभागी झाल्या तर समाज बांधव पांढऱ्या शुभ्र कपड्यांमध्ये सहभागी होऊन मानव धर्माचा विजय असो वीर वीरशैव धर्माचा विजय असो महात्मा बसवेश्वर की जय अशा घोषणा देत मिरवणूक अकलूज मधील प्रमुख मार्गावरून निघून रात्री आठ वाजता महादेव मंदिर येथे मिरवणूक तिचे विसर्जन झाले त्यात नंतर महाप्रसादाची वाटप करण्यात आले. संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज जयंती समारंभ समिती व चर्मकार समाजाच्या वतीने महात्मा बसवेश्वरांचे जयंती साजरी करण्यात आली डॉक्टर दिलीप गुजर व आबा शिंदे यांनी बसवेश्वरांच्या प्रथमेश पुष्पहार घालून दर्शन घेतले.





### सांगोला महाविद्यालय, सांगोला

सांगोला महाविद्यालयात बुधवार दि. ३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. बबन गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. अमोल पवार, बाबासो इंगोले यांनी केले.



### अकलूज येथे महात्मा बसवेश्वर विशेष अंकाचे प्रकाशन

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त अकलूज येथे हिंदू वीरशैव लिंगायत मंच व दैनिक मुंबई तरुण भारतने प्रकाशित केलेल्या जगतज्योती समाज सुधारक महात्मा बसवेश्वर विशेष अंकाचे प्रकाशन अकलूजचे माजी सरपंच किशोर सिंह माने-पाटील व पांडुरंग भाऊ देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित व त्यांच्या विचाराची महती सांगणारा हा विशेषांक मुंबई तरुण भारतने प्रकाशित केला. यामध्ये अकलूजचे निवेदक व लेखक सुहास उरवणे यांचा महात्मा बसवेश्वर आणि श्रमप्रतिष्ठा हा लेख आहे. अकलूजचे सोनी कानडे यांचा आजच्या काळात बसवेश्वरांचे अनुकरणीय विचार हा लेखही आहे. प्रमुख पाहुणे किशोर सिंह माने-पाटील व पांडुरंग देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी दै. तरुण भारतचे चंद्रकांत कुंभार, वीरशैव लिंगायतचे अध्यक्ष विलास क्षीरसागर, संतोष देवशेटे, उदय शेटे, नागेश नष्टे, त्रिंबक गुळवे, चंद्रकांत शेटे, नितीन आर्वे, राजू आर्वे, राजू गुळवे, पिंटू वैद्य, पप्पू आंधळकर, विजय टोगले, शीला वागुले, ज्योती कुंभार उपस्थित होते.

### वीरशैव सभा संघटना, पंढरपूर यांच्यातर्फे अभिवादन

महाराष्ट्र वीरशैव सभा संघटनेच्या वतीने शहरामध्ये सोलापूर जिल्हाध्यक्ष अॅड. राज भादुले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आद्य समाजसुधारक, समतानायक, जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र वीरशैव सभेचे शहराध्यक्ष विशाल आर्वे, तालुकाध्यक्ष धनंजय मेनकुदळे, मर्चंट बँकेचे संचालक भगीरथ म्हमाणे, अमरजीत पाटील, शाम गोगाव, माजी नगरसेवक निलराज डोंबे, मन्मथ स्वामी मठ कार्यकारी मंडळ अध्यक्ष युवराज डोंबे, महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष राजकुमार जेठे , युवराज मुचलंबे, बसवराज मरळे, आनंद मेनकुदळे उपस्थित होते. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर अॅड. राज भादुले व अमरजीत पाटील यांनी मनोगत व्यक्त करत असताना महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याला उजाळा दिला.




## अकलूजच्या मराठा अधिवेशनासाठी माढ्यातून जाणार हजारो कार्यकर्ते

### 3 दिवसांचे अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३० एप्रिल-**

मराठा सेवा संघाचे महाअधिवेशन १०, ११ व १२ मे रोजी अकलूज येथे होणार असून या अधिवेशनात माढा तालुक्यातील मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडचे शेकडो पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या संदर्भात नियोजनासाठी कुर्डूवाडी येथे मराठा सेवा संघाची बैठक झाली.



शनिवार १० मे रोजी अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून संध्याकाळी जागर विचारांचा, जागर संस्कृतीचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. रविवार ११ मे रोजी व्याख्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. १२ मे बुद्धपौर्णिमा दिवशी नवोदित कवींचे काव्यसंमेलन, परिसंवाद, विशेष व्याख्याने होणार आहेत तर समारोप व कृतज्ञता समारोहाने या अधिवेशनाची सांगता होईल. या महाअधिवेशनात सहभागी होण्याचे आवाहन मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटिल, संभाजी ब्रिगडचे राज्य संघटक दिनेश जगदाळे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष दत्ताजी शिंदे यांनी केले आहे. यावेळी मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक राजाभाऊ व्यवहारे, सर्जेराव भोसले, सुहास टोणपे, विजयकुमार परबत, निता खटके, मनोज पवार, मेजर अरूण जगताप, प्रा.डॉ. महादेव थोरात, दत्तात्रय गरदडे, शेखर सुर्वे, विनोद शिंदे, संतोष वीर,दिलीप चव्हाण, सचिन महिंगडे, देविदास कन्हेरे, शंकर उबाळे, शंकर नागणे, अविनाश पाटील, अविनाश नांगरे, निरज उबाळे, शिवाजीराव शिंदे उपस्थित होते.